



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, मंगळवार १२ मे २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०




सोमनाथ मंदिराच्या प्राणप्रतिष्ठेला 75वर्षे

## मोदींच्या हस्ते पार पडला कुंभाभिषेक सोहळा

**गिर सोमनाथ/वृत्तसंस्था-** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमनाथ मंदिरात आयोजित अमृत महोत्सव कार्यक्रमात सहभाग घेतला. पंतप्रधान मोदींनी मंदिरात पूजा केली. भगवान शिवाच्या १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या सोमनाथ मंदिराच्या भव्य कळसाला देशभरातील ११ पवित्र तीर्थक्षेत्रांतील पाण्याने अभिषेक करण्यात आला. या अभिषेकासाठी एका विशेष कलशाचा वापर करण्यात आला. या सोहळ्या दरम्यान, ११ तीर्थक्षेत्रांतील पवित्र पाणी मंदिराच्या ९० मीटर उंच कळसावर ओतण्यात आले. या विशेष कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी अनेक राज्यांतील कलाकार आणि दूरदूरच्या भागांतील प्रेक्षक आले होते. सोमनाथ मंदिरातील सोमनाथ अमृत महोत्सवात सहभागी होण्यापूर्वी पंतप्रधान मोदींनी एका रोड शोमध्ये भाग घेतला. यावेळी गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल आणि उपमुख्यमंत्री हर्ष संघवी हेही उपस्थित होते. मंदिराच्या पुनर्बांधणीनंतर झालेल्या उद्घाटनाच्या ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. विशेष महापूजा, कुंभाभिषेक आणि ध्वजारोहण समारंभांमध्ये सहभागी होउन या कार्यक्रमादरम्यान ते एक स्मारक टपाल तिकीट आणि नाणे देखील प्रकाशित केले. हा कार्यक्रम मंदिराच्या पुनर्बांधणी आणि पुनर्प्रतिष्ठापनेला ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त आयोजित सोमनाथ अमृत पर्व-२०२६ मोहिमेचा एक भाग आहे. स्वातंर्त्यानंतरच्या पहिल्या ज्योतिर्लिंग मंदिराच्या पुनर्बांधणीचा ७५ वा वर्धापनदिन साजरा करण्यासाठी हा चार दिवसीय कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. सोमनाथ मंदिर हे सनातन वारशाच्या पुनरुज्जीवनाचे प्रतीक मानले जाते. भारताचे पहिले उपपंतप्रधान सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रस्तावानुसार त्याची पुनर्बांधणी करण्यात आली.




### पंतप्रधान मोदींचे देशाला पुन्हा काटकसरीचे आवाहन

# सोने खरेदी टाळा, पेट्रोल-डिझेल वाचवा अन् वर्क फ्रॉम होम करा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पेट्रोल आणि डिझेलचा शक्य तेवढा कमी वापर करा, वर्षभर सोन्याची खरेदी करु नका आणि घरु नच काम करण्यास (वर्क फ्राम होम) प्राधान्य द्या, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुन्हा एकदा देशातील नागरिकांना केले. रविवारी तेंलगणा आणि कर्नाटकातून नागरिकांना साद घातल्यानंतर पंतप्रधानांनी आज गुजरातमध्ये बोलत असताना नागरिकांना काटकसर करण्याचे आवाहन केले. काही शाळांनी देखील ऑनलाईन क्लासेस घेण्याबाबत विचार करावा आणि कार्यालयांनी व्हर्च्युल मिटिंगवर भर द्यावा, असेही पंतप्रधान मोदी म्हणाले.

**सोनं खरेदी करणे टाळा, खाद्यतेलाचा कमी वापर करा-**

सोन्याच्या आयातीवर देशातील खूप पैसे विदेशात जातात. परिस्थिती पूर्ववत होत नाही तोपर्यंत सोनं खरेदी करणे टाळावं, सोन्याची गरज नाही. सध्या व्होकल फार लोकलला बळ देण्याची वेळ आली आहे. स्थानिक व्यवसायांना प्राधान्य द्यायला हवं. डिझेल पंपा ऐवजी सौर ऊर्जेवर चालणा-या पंप वापरण्यास प्राधान्य द्यायला हवं. रासायनिक खातांचा वापर न करता, नैसर्गिक शेती करण्यावर भर द्यायला हवा. नागरिकांनी खाद्यतेलाचा वापर देखील कमी करावा, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. संकट काळात सरकारने केलेल्या आवाहनांना जनतेने नेहमीच सहकार्य केले आहे. आज देखील नागरिकांना हे कर्तव्य पार पाडण्याची वेळ आली आहे.

**मेट्रोचा वापर करण्याचे आवाहन-**देशाचे सर्वात जास्त परकीय चलन कच्च्या तेलाच्या खरेदीवर खर्च होते. त्यामुळे शक्य तेवढा पेट्रोल -डिझेलचा वापर कमी करा. मेट्रोचा वापर करा. कार असणा-या लोकांनी इतरांना लिफ्ट द्या. खाद्यतेलाच्या वापराबाबतही काटकसर करण्याची गरज असल्याचे पंतप्रधान मोदी म्हणाले. यामुळे देश आणि आरोग्याला देखील फायदा होईल, असे मोदी म्हणाले. कर्नाटक आणि तेलंगणामधून देखील देशातील नागरिकांना आवाहन केल्याचे मोदी म्हणाले.

**परदेशात लग्न, पर्यटनाची फॅशन-**लग्नासाठी, लग्नानंतर आणि पर्यटनासाठी परदेशात जाण्याची फॅशन झाली आहे. यामुळे देखील मोठ्या प्रमाणावर परकीय चलन विदेशात जात आहे. लग्नासाठी भारतासारखे उत्तम स्थान आहे असं मला वाटत नाही. भारताच्या मातीत लग्न केलं तर पूर्वज देखील आशीर्वाद देतील. गुजरातमध्ये तर अशी अनेक ठिकाणं आहेत. स्टॅच्यु ऑफ युनिटी लग्नासाठी उत्तम स्थळ असल्याचेही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुचवले. सरदार वल्लभ भाई पाटेल यांचा जगातील सर्वात मोठा पुतळा आहे. आणि देशात असा व्यक्ती सापडणार नाही ज्याला याचा अभिमान असणार नाही. मी तुम्हाला फार छोटं काम सांगितलं आहे. पण, १४० कोटी नागरिकांची छोटी छोटी पावलं देखील मोठा परिणाम करतात, असे नरेंद्र मोदी म्हणाले.

## मोदींनी केलेले आवाहन योग्यच!

**नागपूर/प्रतिनिधी-**नरेंद्र मोदी यांनी ११ मे रोजी भाषणात त्यांनी जनतेला पेट्रोलियम उत्पादनांचा वापर संयमाने करण्याचे आवाहन केले आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. नरेंद्र मोदींच्या आवाहनाबद्दल देवेंद्र फडणवीस यांना विचारले असता ते म्हणाले की, पंतप्रधानांनी जे सांगितलं ते अतिशय योग्य आहे. आपल्याला कल्पना आहे की, खूप मोठ्या प्रमाणात अमेरिका, इस्त्रायल आणि इराणच्या युद्धामुळे जगामध्ये तेल व गॅसची कमतरता आहे. जगात अनेक देशात लॉकडाउन लागलेला आहे. पाकिस्तानसारख्या देशात पेट्रोल मिळत नाही आणि जे मिळते त्याचा भाव त्यांनी ४५० रुपये केलेला आहे. अशाही परिस्थितीत पंतप्रधानांमुळे भारतामध्ये तेल आणि गॅस आपल्याला उपलब्ध होतोय. पण अशावेळी आपण जर त्याचा योग्य उपयोग केला नाही आणि त्याचा नाश केला किंवा मोठ्या प्रमाणात अधिकचा उपयोग केला, तर आपल्यालाही अडचणींचा सामना करावा लागू शकतो.



आवश्यकतेनुसारच उपयोग करा, असं पंतप्रधानांनी सांगितलं आहे आणि ते सर्वांनी पाळावं, असं आमचं आवाहन आहे. नरेंद्र मोदी म्हणाले की, भारत परदेशातून मोठ्या प्रमाणात पेट्रोलियम उत्पादनांची आयात करतो. अशा परिस्थितीत जर लोकांनी त्यांच्या प्रत्यक्ष गरजेपेक्षा जास्त प्रमाणात पेट्रोल, डिझेल आणि गॅसचा वापर केला, तर त्याचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर थेट आणि प्रतिकूल परिणाम होईल. कारण जग सध्या एका मोठ्या उर्जा संकटाचा सामना करत आहे आणि आखाती देशातील सध्याच्या तणावामुळे या चिंतेमध्ये आणखीच भर पडली आहे. त्यामुळे पेट्रोलियम उत्पादनांचा वापर करताना विचारपूर्वक करावा, असे आवाहन करतानाच मोदी यांनी स्पष्ट केले की, अशा प्रकारचा संयम केवळ परकीय चलन वाचवण्यासाठीच मदत करणार नाही, तर युद्ध आणि जागतिक संकटांचे परिणाम कमी करण्यासही हातभार लावेल.

### प्रधानमंत्र्यांच्या आवाहनानंतर खर्चांमध्ये संयम

## कृत्रिम बुद्धिमत्ता मंत्री ॲड.आशिष शेलार यांचा कान्स दौरा रद्द

**मुंबई/प्रतिनिधी :** देश सध्या कठीण परिस्थितीतून जात असताना राष्ट्रहिताला सर्वोच्च प्राधान्य देण्याचे आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केले आहे. त्या आवाहनाला प्रतिसाद देत सांस्कृतिक कार्य तथा इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता मंत्री ॲड.आशिष शेलार यांनी यंदाच्या फ्रान्स येथील कान्स फिल्म फेस्टिव्हलला न जाण्याचा निर्णय घेतला आहे.सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड शेलार यांनी सांगितले की, कठीण काळात देशहिताला सर्वोच्च प्राधान्य देत विभागीय खर्चांमध्ये संयम ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच अधिकाधिक बैठका व्हर्च्युअल माध्यमातून घेण्यात येणार असून संसाधनांचा मर्यादित वापर करण्यावर भर दिला जाणार आहे. दरम्यान, कान्स चित्रपट महोत्सवात सहभागी होणा-या मराठी



चित्रपट तसेच त्यासंदर्भातील आवश्यक समन्वय आणि सहकार्यासाठी संबंधित यंत्रणा नियोजित पद्धतीने कार्यरत राहतील, तसेच मराठी सिनेमाला प्रोत्साहन देण्यासाठी जिथे आवश्यकता असेल तिथे ऑनलाईन सहभागी होईन, असेही सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.शेलार यांनी सांगितले.

## हैदराबादमध्ये भीषण अपघात; 5 ठार

**हैदराबाद :** हिमाचलमध्ये भरधाव कार दरीत कोसळून ६ जणांचा मृत्यू झाल्याची घटना ताजी असताना हैदराबादमध्येही भीषण अपघाताची घटना घडली. हैदराबादमध्ये १५ लाखांच्या बाईकने कारला धडक दिली. दुचाकी आणि कारच्या धडकेत एकाच कुटुंबातील तिघांसहित ५ जणांचा मृत्यू झाला. १५ लाखांच्या महागड्या दुचाकीने दिलेल्या धडकेत कारचा चक्काचूर झाला. हैदराबादच्या मेहबूबनगर पालकोडा बायपास रोडवर मध्यरात्री अपघाताचा थरार घडला. अपघात घडल्याची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेउन पोस्टमार्टमसाठी रुग्णालयात पाठवले. पोलिसांनी अपघाताचा तपास सुरू केला आहे. पालकोंडा बायपास रोडवर युवकांच्या दुचाकीच्या शर्यतीदरम्यान स्पोर्ट्स बाइक आणि कारची धडक झाली. मिळालेल्या माहितीनुसार, पालकोंडा बायपास रोडवर सोमवारी रात्री १२.३० वाजता कार धिम्या गतीने वळण घेत होती. दुसरीकडे काही तरुणांची बाईकची शर्यत सुरू होती. एका स्पोर्ट्स बाइकने कारला धडक दिली. बाइकच्या धडकेत कारचा चक्काचूर झाला. अपघातात कारमधील हैदराबादमधील एकाच कुटुंबातील तीन जणांचा जागीच मृत्यू झाला. ३० वर्षीय अर्शा बेगम, ७ वर्षीय उजेपा आणि २ वर्षीय उमरचा अपघाती मृत्यू झाला. बाइकवरील दोघांचा मृत्यू झाला. २५ वर्षीय याकूब अफजल अशी एकाची ओळख झाली आहे. दुस-याची ओळख पटवण्याचं काम पोलिसांनी सुरू केलं आहे.

## शेअर बाजार गडगडला

### मोदींच्या आवाहनाचे काही तासांतच पडसाद

**नवी दिल्ली/ वृत्तसंस्था-** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी देशवासियांना महत्वाचं आवाहन केले. पुढील वर्षभर सोनं खरेदी करू नका, परदेशात प्रवास टाळा, पेट्रोल-डिझेलचा वापर बेताने करा, असे मोदी म्हणाले. त्यावरून विविध क्षेत्रातून उलटसुलट प्रतिक्रिया येउ लागल्या आहेत. आता मोदींच्या या आवाहनाचे पडसाद शेअर बाजारातही उमटले आहेत. शेअर बाजार उघडताच पंतप्रधानांच्या आवाहनाला रेड सिग्नल दाखविला आहे. बाजाराची



सुरूवातच नकारात्मक झाली. निफ्टी २५० अंकांनी खाली गेला. तर सेंसेक्स एक हजार अंकांनी कोसळला. शेअर बाजारातील या घसरणीमागे मोदींच्या आवाहनासोबतच

➪(पान २ वर)

## सराफा व्यवसाय अडचणीत?

### ऑल इंडिया जेम्स अँड ज्वेलरी असोशिएशनने व्यक्त केली चिंता

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** मध्य पूर्वेतील वाढत्या तणावाचा जागतिक अर्थव्यवस्थेवर परिणाम होत आहे आणि आता भारतावरही त्याचा परिणाम होउ शकतो, अशी संभाव्य भीती लक्ष्यात घेता पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देशवासियांना काही महत्वपूर्ण आवाहन केले आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आवाहन केल्यानंतर भारतात सराफा व्यवसायावर मोठा परिणाम होइल, अशी शंका ज्वेलरी व्यावसायिकांची देशातील सर्वांत मोठी संघटना असलेल्या ऑल इंडिया जेम ॲप ज्वेलरी कौन्सिलने व्यक्त केली आहे. भारतात सोने



म्हणजे धार्मिक संस्कृती आणि त्याला स्वतःच असे वेगळे महत्व आहे. लोकांना सोने खरेदी बंद केले तर एक कोटी लोकांच्या रोजगारावर परिणाम होईल. मात्र, राष्ट्रहित लक्षात घेउन पंतप्रधानांचं आवाहन त्याला आमचे समर्थन आहे. पण लोकांनी सोनं खरेदी न करणे कठीण आहे.

**कारागीरांना सर्वाधिक फटका-**ज्वेलरी उद्योगाचं जीडीपीमध्ये सात टक्के योगदान आहे. महाराष्ट्र आणि पश्चिमम बंगाल येथील कारागीरांना याचा सर्वाधिक फटका बसेल. देशात दरवर्षी ७०० टन सोन्याची आयात होते. युक्रेन रशिया वॉर दरम्यान युक्रेनच्या नागरिकांनी सोने विक्री करून स्वतःला उभारले असेही ऑल इंडिया जेम ॲप ज्वेलरी डोमेस्टिक कौन्सीलचे अध्यक्ष राजेश रोकडे म्हणाले.

## ‘नीट 2026’ चा पेपर फुटला?

**जयपूर/वृत्तसंस्था :** वैद्यकीय प्रवेशासाठी अत्यंत महत्त्वाची असलेल्या नीट परीक्षेवर पुन्हा एकदा पेपरफुटीचे सावट निर्माण झाले आहे. ३ मे रोजी झालेल्या या परीक्षेतील प्रश्नांशी मिळता-जुळता असलेला संभाव्य प्रश्नसंच परीक्षेपूर्वीच सोशल मीडियावर फिरत असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.





या प्रकरणी राजस्थान पोलिसांच्या विशेष कृती दलाने सखोल चौकशी सुरू केली असून, नॅशनल टेस्टिंग एजन्सीने देखील या प्रकरणाची दखल घेतली आहे. राजस्थानचे अतिरिक्त पोलीस महासंचालक विशाल बन्सल यांनी दिलेल्या माहितीनुसार, परीक्षेच्या काही दिवस आधी सुमारे ४०० प्रश्नांचा एक संभाव्य प्रश्नसंच व्हायरल झाला होता. या संचातील जीवशास्त्र आणि रसायनशास्त्र विषयांचे १०० हून अधिक प्रश्न प्रत्यक्ष परीक्षेत विचारलेल्या प्रश्नांशी तंतोतंत जुळणारे आहेत. हा केवळ योगायोग आहे की एखादे मोठे रॅकेट, याचा तपास पोलीस करत आहेत. यासाठी राजस्थानमधील अनेक शहरे आणि डेहराडूनमध्ये चौकशी सुरू आहे.

**लातूरपर्यंत धागेदोरे-** राजस्थानप्रमाणेच महाराष्ट्रातील लातूरमधील एका नामांकित कोचिंग अकॅडमीचे काही व्हिडिओ आणि टेस्ट-सीरीजचे पेपर्स सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले होते. या संदर्भात लातूरचे पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी सांगितले की, अद्याप स्थानिक स्तरावर कोणताही अधिकृत तपास सुरू करण्यात आलेला नाही. मात्र, या प्रकरणाचे धागेदोरे लातूरपर्यंत पोहोचल्याच्या चर्चेने पालकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. ➪(पान २ वर)

### लाडक्या बहिणींसाठी खुशखबर!

## खात्यात जमा होणार 4500 रुपये

**मुंबई/प्रतिनिधी-**राज्य सरकारच्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून पडताळणी प्रक्रियेनंतर लाखो लाभार्थी महिला अपात्र ठरल्या असताना, पात्र महिलांसाठी आता दिलासादायक बातमी समोर येत आहे. ई-



केवायसी प्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण करणा-या महिलांच्या बँक खात्यात रखडलेल्या तीन महिन्यांच्या अनुदानाचे एकत्रित ४५०० रुपये लवकरच जमा होण्याची शक्यता व्यक्तकेली जात आहे. शासनस्तरावर याबाबत हालचाली सुरू असून अधिकृत निर्णयाची प्रतीक्षा आहे. महायुती सरकारने जून २०२४ मध्ये सुरू केलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा उद्देश आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिलांना दरमहा १५०० रुपयांचे थेट आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देणे हा होता. सुरुवातीला या योजनेला राज्यभरातून मोठा प्रतिसाद मिळाला होता. सुमारे दोन कोटी ४७ लाख महिलांनी नोंदणी केली होती. मात्र, अर्जांची छाननी ➪(पान २ वर)

## पंतप्रधानांचा ‘मिशन युरोप’ आणि ‘मिडल ईस्ट’ दौरा

### ५ देशांच्या दौ-यातून भारताची जागतिक ताकद वाढवणार!

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या १५ मे ते २० मे २०२६ या काळात पाच महत्त्वाच्या देशांच्या अधिकृत दौ-यावर जाणार आहेत. परराष्ट्र मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, या सहा दिवसांच्या दौ-यात पंतप्रधान संयुक्त अरब अमिराती, नेदरलँड, स्वीडन, नार्वे आणि इटलीला भेट देणार आहेत. भारताचे वाढते जागतिक महत्त्व आणि आर्थिक संबंधांच्या दृष्टीने हा दौरा अत्यंत महत्वपूर्ण मानला जात आहे.

**पहिला टप्पाः संयुक्त अरब अमिराती - १५ मे** -दौ-याची सुरुवात पंतप्रधान मोदी १५ मे रोजी युएईपासून करतील. येथे ते युएईचे



राष्ट्राध्यक्ष शेख मोहम्मद बिन झायेद अल नाह्यान यांची भेट घेतील. भारत आणि युएईमधील व्यापार, उर्जा सुरक्षा आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील भागीदारीवर या बैठकीत चर्चा होईल. आखाती देशांशी भारताचे संबंध अधिक दृढ करण्यावर पंतप्रधान मोदींचा भर असेल.

**दुसरा टप्पाः नेदरलँड -१५ ते १७ मे-**नेदरलँडचे पंतप्रधान राब जेटन यांच्या निमंत्रणावरून पंतप्रधान मोदी १५ ते १७ मे दरम्यान नेदरलँडच्या दौ-यावर असतील. नेदरलँड हा युरोपमधील भारताचा एक महत्त्वाचा व्यापारी भागीदार आहे. जल व्यवस्थापन, कृषी तंत्रज्ञान आणि सेमीकंडक्टर उद्योगातील सहकार्यावर येथे स्वाक्ष-या होण्याची शक्यता आहे. नेदरलँड हा भारताचा युरोपमधील मोठा व्यापारी मार्ग असून दोन्ही देशांत २७.८ अब्ज डालर्सचा व्यापार होतो. ५५.६ अब्ज डालर्सच्या गुंतवणुकीसह नेदरलँड हा भारताचा चौथा मोठा गुंतवणूकदार आहे.

**तिसरा टप्पाः स्वीडन- १७ ते १८ मे**

स्वीडनचे पंतप्रधान उल्फ क्रिस्टरसन यांच्या निमंत्रणावरून पंतप्रधान १७ मे रोजी स्वीडनमधील गाटेनबर्ग येथे➪(पान २ वर)

## भाजपने जिंकलेल्या 'त्या' 31 जागांचे निकाल बदलणार?

### SIR वरुन कोर्टात गेलेल्या ममता बॅनर्जींना दाद मागता येणार

**कोलकाता/वृत्तसंस्था :** पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत अनपेक्षित पराभवानंतर सत्ता गमावलेल्या ममता बॅनर्जी आणि त्यांच्या तृणमूल काँग्रेसने आता सुप्रीम कोर्टात धाव घेतली आहे. मतदार यादीतील नावे वगळण्याच्या प्रक्रियेमुळे ३१ जागांच्या निकालावर थेट परिणाम झाल्याचा दावा टीएमसीने केला आहे. यावर सुनावणी करताना सुप्रीम कोर्टाने ममता बॅनर्जी आणि अन्य उमेदवारांना यासंदर्भात स्वतंत्र याचिका दाखल करण्याची मुभा दिली आहे.निवडणुकीपूर्वी राबवण्यात आलेल्या स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन



प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर मतदारांची नावे वगळण्यात आली होती. तृणमूल काँग्रेसचा आरोप आहे की, भाजपच्या विजयी उमेदवारांच्या मतांचे अंतर आणि वगळलेली नावे यांचा हिशोब मांडला, तर मोठी गडबड झाल्याचे दिसून येते. टीएमसीचे वकील कल्याण बॅनर्जी यांनी सांगितले की, तब्बल ३१ विधानसभा मतदारसंघांमध्ये भाजपच्या विजयाचे अंतर हे एसआयआर प्रक्रियेत वगळलेल्या मतदारांच्या संख्येपेक्षा कमी आहे. एका जागेचे उदाहरण देताना त्यांनी सांगितले की, तिथे टीएमसी उमेदवाराचा पराभव केवळ ८६२ मतांनी झाला, मात्र त्याच मतदारसंघात ५,४३२ मतदारांची नावे यादीतून वगळण्यात आली होती. जर ही ➪(पान २ वर)

## फेरमोजणीत भाजप उमेदवाराचा विजय ठरला तात्पुरता

### काँग्रेस उमेदवाराला सुप्रीम कोर्टाने पुन्हा केले आमदार

**बंगळुरू/वृत्तसंस्था :** कर्नाटकच्या श्रृंगेरी विधानसभा मतदारसंघातील आमदारकीच्या निवडणुकीत एक नवा ट्विस्ट आला आहे. सुप्रीम कोर्टाने काँग्रेस नेते टी. डी. राजेगौडा यांना मोठा दिलासा दिला असून त्यांची आमदारकी तूर्तास कायम ठेवली आहे.



महत्त्वाचे म्हणजे, मतांच्या फेरमोजणीत भाजप उमेदवार डी. एन. जीवराज यांना विजयी घोषित करण्यात आले होते. मात्र आता कोर्टाच्या हस्तक्षेपामुळे हा विजय तात्पुरता ठरला आहे.या प्रकरणाची सुनावणी जस्टिस संजय कुमार आणि जस्टिस के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठासमोर झाली. सुनावणी दरम्यान, भाजप उमेदवाराच्या बाजूने झालेल्या फेरमोजणीच्या प्रक्रियेवर ताशेरे ओढताना कोर्टाने अत्यंत कडक शब्दांत टिप्पणी केली. ‘आम्ही तुम्हाला अशा प्रकारे लोकशाहीचे अपहरण करू देउ शकत नाही,‘ असं कोर्टाने म्हटलं. यासोबतच कोर्टाने फेरमोजणीपूर्वीची स्थिती कायम ठेवण्याचे आदेश दिले. यामुळे राजेगौडा हेच श्रृंगेरीचे आमदार म्हणून कायम राहतील.

**नेमका वाद काय आहे?**

२०२३ च्या कर्नाटक विधानसभा निवडणुकीत काँग्रेसच्या टी. डी. राजेगौडा यांनी भाजपच्या डी. एन. जीवराज यांचा केवळ २०१ मतांनी पराभव केला होता. जीवराज यांनी या निकालाला कर्नाटक हायकोर्टात आव्हान दिले. हायकोर्टाने ६ एप्रिल रोजी २७९ बाद झालेल्या पोस्टल बॅलेटची पुन्हा पडताळणी करण्याचे आदेश दिले होते. ३ मे रोजी निवडणूक ➪(पान २ वर)



# पैशांच्या वादातून तरुणाची हत्या

# शहर हादरले! २४ तासांत दोन खून

**■ चार आरोपी पोलिसांच्या ताब्यात**
**■ फ्रेजरपुरा व खोलापुरी गेट हद्दीतील घटना**

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती शहरात अवघ्या २४ तासांच्या कालावधीत दोन खुनाच्या घटना घडल्याने खळबळ उडाली आहे. फ्रेजरपुरा आणि खोलापुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या या घटनांमध्ये पोलिसांनी तातडीने कारवाई करत एका अल्पवयीन मुलासह चार आरोपींना ताब्यात घेतले आहे. शहरातील वाढत्या गुन्हेगारीमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत सोमवारी पहाटे पैशांच्या व्यवहारातून झालेल्या वादात ३८ वर्षीय व्यक्तीची निर्घृण हत्या करण्यात आली. मृतकाचे नाव सय्यद नाजिम सय्यद सालार (रा. शुक्रवार बाजार, अमरावती) असे आहे. या प्रकरणी पोलिसांनी निशान रवींद्र भोवते (वय २७, रा. शुक्रवार बाजार) व यशराज रवींद्र कोरी (वय २६, रा. राजापेठ) या दोघांना अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमवारी पहाटे सुमारे १.३० वाजताच्या सुमारास सय्यद नाजिम हा आरोपींच्या घरासमोर गेला होता. यावेळी जुन्या आर्थिक व्यवहारावरून त्यांच्यात जोरदार वाद झाला. वाद विकोपाला गेल्यानंतर आरोपींनी संतापाच्या भरात नाजिमवर धारदार शस्त्राने हल्ला केला. या हल्ल्यात त्याचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच फ्रेजरपुरा पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. शेख तौसिफ शेख इकबाल यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला. तपासादरम्यान आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून, पैशांच्या वादातूनच खून



केल्याची कबुली त्यांनी पोलिसांना दिली. प्राथमिक तपासात मृतक सय्यद नाजिम याच्याविरुद्ध यापूर्वी खूनासह अनेक गंभीर गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे. तर अटक करण्यात आलेल्या आरोपींचा पूर्वी कोणताही गुन्हेगारी इतिहास नसल्याचे पोलिस तपासात आढळून आले आहे. घटनेनंतर कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. सध्या परिस्थिती नियंत्रणात असून परिसर शांत असल्याचे पोलिस प्रशासनाने स्पष्ट केले.

**पार्वती नगर हत्याकांडाचा काही तासांत उलगडा-** खोलापुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पार्वती नगर परिसरात रवि ईश्वर राजुरकर (वय ५०, रा. स्वाभिमान नगर, अकोली रोड) यांच्या खूनप्रकरणाचा पोलिसांनी काही तासांत छडा लावला. या प्रकरणात एका अल्पवयीन मुलासह दोन जणांना ताब्यात घेण्यात आले आहे. अटक आरोपीचे नाव आकाश जगन्नाथ खोरगडे (वय २५) असे आहे. रविवारी १० मे रोजी पार्वती नगर रेल्वे क्रॉसिंगजवळ एका व्यक्तीचा मृतदेह आढळल्याची माहिती पोलीस नियंत्रण कक्षाला मिळाली होती. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील पथक घटनास्थळी दाखल झाले. तपासादरम्यान मृत व्यक्तीची ओळख रवि राजुरकर अशी पटली. यानंतर गुन्हे शाखेने गुप्त माहितीच्या आधारे तपासाची चक्रे वेगाने फिरवली. मृतकाशी जुन्या वादातून शेजारी राहणाऱ्या युवकाचे वाद सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार स्वाभिमान नगर परिसरातून आकाश खोरगडे व एका अल्पवयीन मुलाला ताब्यात घेण्यात आले. कसून चौकशीदरम्यान आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली. जुन्या रागातून आधी मृतकाशी मारहाण करण्यात आली आणि त्यानंतर मातीच्या घागरीने डोक्यावर वार करून हत्या केल्याचे आरोपींनी सांगितले. ही कारवाई पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक मनीष वाकोडे, महेश इंगोले, दशरथ आडे, पीएसआय गजानन सोनुने तसेच सुनील लासुरकर, फिरोज खान, सतीश देशमुख आणि दीपक सुंदरकर यांनी केली. पुढील तपासासाठी आरोपींना खोलापुरी गेट पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

## शक्तिपीठ महामार्ग संदर्भातील आदेशाची होळी

**परभणी** : राज्य सरकारने दि. ५ मे रोजी शक्ती पीठ महामार्ग संदर्भात आदेश काढलो आहेत. या महामार्गाला जिल्ह्यातील शेतक-यांचा तीव्र विरोध होत आहे. राज्य सरकारने काढलेल्या या आदेशाची स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने सोमवार, दि.११ मे रोजी होळी करून निषेध नोंदविण्यात आला. शक्तीपीठ महामार्गामुळे जिल्ह्यातील अनेक शेतक-यांची सुपीक जमीन जात आहे. त्यामुळे या महामार्गाला शेतक-यांचा तीव्र विरोध आहे. या महामार्ग संदर्भात राज्य सरकारने ५ मे रोजी आदेश काढले आहेत. या पार्श्वभुमीवर स्वाभिमानी शेतकरी



संघटनेच्या पदाधिका-यांनी सोमवारी तीव्र संताप व्यक्त करीत या आदेशाची होळी करून निषेध नोंदविला. यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष किशोर ढगे यांच्यासह पदाधिकारी व शक्तिपीठ बाधित शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## एकल महिला धोरणासाठी राज्यस्तरीय सर्वेक्षण आवश्यक

### महिला व बाल विकास राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर

**मुंबई, दि. ११ :** राज्यातील एकल महिलांच्या विविध प्रश्नांचा सर्वंकष विचार करून प्रभावी धोरण तयार करण्यासाठी राज्यस्तरीय सर्वेक्षण करणे आवश्यक असून, सध्या उपलब्ध असलेल्या सर्वेक्षणांचा उपयोगही धोरण निर्मितीसाठी करण्यात यावा, असे निर्देश महिला व बाल विकास राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांनी दिले.

निर्मल भवन येथील एमएसआरडीसी कार्यालयात राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली एकल महिला धोरणासंदर्भात आढावा बैठक झाली. यावेळी धोरणाच्या विविध बाबींवर सविस्तर चर्चा करण्यात आली.महिला व बाल विकास राज्यमंत्री बोर्डीकर म्हणाल्या की, एकल महिलांच्या सामाजिक, आर्थिक आणि शासकीय योजनांशी संबंधित प्रश्नांचा विचार करून धोरण अधिक परिणामकारक करण्यात यावे. यासाठी समितीमध्ये आणखी सदस्यांचा समावेश करण्यात यावा.

## ६० वर्षीय इसमाकडून अल्पवयीन मुलीचा विनयभंग

### ■ आरोपीविरुध्द गुन्हा दाखल ■

**खल्लार/प्रतिनिधीः- दर्यापूर तालुक्यातील एका गावात ११ वर्षीय अल्पवयीन मुलीवर ६० वर्षीय इसमाकडून विनयभंगाचा प्रयत्न झाल्याची धक्कादायक घटना (दि. ९) सायंकाळी सात वाजताच्या सुमारास घडली असून या प्रकरणातील आरोपी अरुण धांडगे (वय ६०) विरुद्ध येवदा पोलिस स्टेशन मध्ये पोक्सो कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.मिळालेल्या माहितीनुसार आरोपीने अल्पवयीन मुलीशी गैरवर्तन करत तिचा विनयभंग करण्याचा प्रयत्न केल्याची तक्रार पीडितेकडून देण्यात आली. घटनेच्या गांभीर्याची तात्काळ दखल घेत येवदा पोलिसांनी आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमांसह पोक्सो कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. आज (दि.१०) दुपारी फॉरेन्सिक टीमला सुद्धा पाचारण करण्यात आले होते. या घटनेमुळे संतापाचे वातावरण निर्माण झाले असून आरोपीवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. ग्रामिण भागात महिला व मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून अशा घटनांना आळा घालण्यासाठी पोलिस प्रशासनाने अधिक कठोर पावले उचलावित अशी मागणी व्यक्त होत आहे. या प्रकरणाचा पुढील तपास येवदा ठाणेदार प्रफुल गाडेकर,यांच्या मार्गदर्शनात पोहेकॉ जऊळकर करीत आहे.**

पान १ व १० वरून

## शेअर बाजार गडगडला

इराण युध्दावर तोडगा काढण्याचे प्रयत्न फोल ठरत असल्याचे कारणही आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणसोबतच्या शांती वार्ताचा प्रस्ताव फेटाळून लावला आहे.

अमेरिकेच्या भूमिकेमुळे कच्च्या तेलाच्या किंमती आणखी वाढलू लागल्या आहेत. त्यामुळे जागतिक बाजारात चिंता व्यक्त केली जात आहे. त्याचा परिणाम शेअर बाजारावर होत आहे. सोमवारी गोल्ड स्ट?क्समध्ये सुरू वातीला ९ टक्क्यांची घसरण झाली. तसेच इंटरग्लोब एव्हिएशनचे शेअर्सही सुरू वातीलाच ४ टक्क्यांनी घसरले. पंतप्रधान मोदींनी सोने खरेदी न करण्याचे आणि परदेशी प्रवास टाळण्याचे आवाहन केल्याचा हा परिणाम असल्याची चर्चा आहे.

शेअर बाजारात घसरणीसोबतच ड?लरच्या तुलनेत रु पयाचीही घसरण झाली. सुरू वातीलाच रु पया ४० पैशांनी घसरला.

कच्च्या तेलाच्या किंमती वाढल्याने रु पया कमजोर झाल्याचे चित्र आहे. कच्च्या तेलाच्या दरात सुमारे पाच टक्क्यांनी वाढ झाली आहे. पंतप्रधानांच्या आवाहनानंतर आता देशातील पेट्रोल-डिझेलचे दर वाढण्याची शक्यताही व्यक्त केली जात आहे.

## लाडक्या बहिणींसाठी खुशखबर!

आणि विविध निकषांच्या पडताळणीनंतर लाभार्थ्यांची संख्या हळूहळू कमी होत गेली. सध्या पात्र महिलांची संख्या १ कोटी ८९ लाखांवर स्थिरावल्याचे सांगितले जात आहे. शासनाने ई-केवायसी, उत्पन्न मर्यादा, सरकारी नोकरी आणि इतर निकषांच्या आधारे सखोल तपासणी सुरू केली. या प्रक्रियेदरम्यान अनेक धक्कादायक बाबी उघड झाल्या. काही महिलांनी चुकीची माहिती देउन लाभ घेतल्याचे निदर्शनास आले, तर काही प्रकरणांमध्ये सरकारी सेवेत असतानाही स्वतःला अपात्र निकषांबाहेर दाखवून अनुदान मिळविल्याचे समोर आले.काही कुटुंबांचे उत्पन्न शासनाने निश्चित केलेल्या मर्यादेपेक्षा अधिक असल्याचेही आढळले. विशेष म्हणजे, काही ठिकाणी पुरु षांनी महिलांच्या नावाने अर्ज करून लाभ घेतल्याची प्रकरणेही उघडकीस आली आहेत. या पार्श्वभूमीवर, शासनाने कठोर भूमिका घेत मोठ्या प्रमाणावर लाभार्थ्यांची फेरतपासणी केली. मार्चअखेरपर्यंत तब्बल ६८ लाख महिलांना अपात्र ठरविण्यात आले होते. मात्र, शासनाने ई-केवायसी पूर्ण करण्यासाठी मुदतवाढ दिल्यानंतर एप्रिल महिन्यात अनेक महिलांनी आपली कागदपत्रे अद्ययावत केली. सुमारे १४ लाख महिलांनी आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून आपण पात्र असल्याचे सिद्ध केले. त्यामुळे अपात्र लाभार्थ्यांची संख्या घटून आता सुमारे ५४ लाखांवर आली आहे.

**शासनाकडे मुदतवाढीची मागणी-** दरम्यान, ई-केवायसी प्रक्रिया वेळेत पूर्ण न झालेल्या महिलांकडून शासनाकडे पुन्हा मुदतवाढ देण्याची मागणी केली जात आहे. योजनेतील पात्र महिलांना तीन महिन्यांचे रखडलेले हप्ते एकाच वेळी मिळाल्यास आर्थिक अडचणीत असलेल्या हजारो कुटुंबांना मोठा दिलासा मिळू शकतो. त्यामुळे आता शासनाच्या पुढील निर्णयाकडे राज्यातील लाखो महिलांचे लक्ष लागले आहे. तसेच ज्यांनी ई-केवायसी मुदतीत पूर्ण केली आहे, त्यांना रखडलेल्या अनुदानाचे हप्ते मिळण्याची प्रतीक्षा आहे.

## पंतप्रधानांचा 'मिशन युरोप'

पोहोचतील. संरक्षण उत्पादन, शाश्वत उर्जा आणि नावीन्यपूर्ण क्षेत्रातील भारत-स्वीडन भागीदारी वाढवण्यासाठी ही भेट महत्त्वाची आहे. स्वीडनची भारतात २.८ अब्ज डालर्सची गुंतवणूक आहे

**चौथा टप्पाः नार्वे आणि भारत-नार्डिक शिखर परिषद-१८ ते १९ मे-**१८ आणि १९ मे रोजी पंतप्रधान नार्वेमध्ये असतील. येथे ते तिस-या भारत-न?र्डिक शिखर परिषदेत सहभागी होतील. ओस्लो येथे होणा-या या परिषदेत न?र्वे, डेन्मार्क, फिनलंड, आइसलँड आणि स्वीडन या ५ देशांचे पंतप्रधान सहभागी होतील. ब्लू इक?न?मी, हवामान बदल आणि ग्रीन हायड्रोजन या विषयांवर भारत या देशांशी संवाद साधेल.

**पाचवा टप्पाः इटली दौरा- १९ ते २० मे-** दौ-याच्या शेवटच्या टप्प्यात पंतप्रधान मोदी इटलीला भेट देतील. इटलीच्या पंतप्रधान जार्जिया मेलोनी यांच्याशी त्यांची द्विपक्षीय चर्चा होईल. भारत आणि इटलीमध्ये सध्या स्ट्रॅटेजिक पार्टनरशिपवर भर दिला जात आहे. संरक्षण, व्यापार आणि सांस्कृतिक देवाणघेवाण या विषयांवर दोन्ही देशांमध्ये महत्त्वाची चर्चा होईल.

**या दौ-याचे जागतिक महत्त्व-**युरोपीय देशांकडून भारतात गुंतवणूक वाढवण्यासाठी हा दौरा एक मोठी संधी आहे. तसेच स्वीडन आणि इटली यांसारख्या देशांसोबतचे संरक्षण करार भारताच्या लष्करी सज्जतेसाठी महत्त्वाचे आहेत. यासोबतच सध्याच्या जागतिक इंधन संकट आणि रशिया-युक्रेन युद्धामुळे बदललेल्या भू-राजकीय परिस्थितीत भारताची भूमिका स्पष्ट करण्यासाठी मोदींचा हा दौरा महत्त्वाचा ठरेल.

## भाजपने जिंकलेल्या 'त्या' 31 जागांचे

नावे असती, तर निकाल वेगळा लागला असता. संपूर्ण राज्यात भाजप आणि टीएमसीमध्ये ३२ लाख मतांचा फरक आहे, तर मतदार यादीतून नाव वगळ्याप्रकरणी सुमारे ३५ लाख जणांचे अर्ज प्रलंबित आहेत.

**सुप्रीम कोर्टाचे महत्त्वपूर्ण निरीक्षण-** मुख्य न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती ज?यमाल्या बागची यांच्या खंडपीठाने या युक्तिवादाची दखल घेतली. न्यायालयाने म्हटले की, 'जर विजयाचे अंतर आणि वगळण्यात आलेली मते यामध्ये तफावत असेल, तर ममता बॅनर्जी आणि संबंधित ३१ जागांचे उमेदवार स्वतंत्र याचिका दाखल करू शकतात.' महत्त्वाचे म्हणजे, यात ममता बॅनर्जी यांच्या भवानीपूर मतदारसंघाचाही समावेश असण्याची शक्यता आहे.

**निवडणूक आयोगाचा विरोध-** दुसरीकडे, निवडणूक आयोगाने या दाव्यांना विरोध केला आहे. निवडणूक आयोगाचे म्हणणे आहे की, निवडणुकीत काहीही अडचण आल्यास निवडणूक याचिका दाखल करणे हाच एक मार्ग आहे. प्रत्येक छोट्या तांत्रिक गोष्टीसाठी वेगळी केस करता येणार नाही. दरम्यान, नुकत्याच झालेल्या २९४ जागांच्या विधानसभा निवडणुकीत भाजपने २०७ जागा जिंकून ऐतिहासिक यश मिळवले असून राज्यात पहिल्यांदाच भाजपचे सरकार स्थापन झाले. टीएमसीला केवळ ८० जागांवर समाधान मानावे लागले. या निवडणुकीत ९० टक्क्यांहून अधिक मतदान झाले होते. दुसरीकडे, सुप्रीम कोर्टाच्या या भूमिकेनंतर आता ममता बॅनर्जी आणि त्यांचे ३१ उमेदवार पुन्हा न्यायालयात धाव घेण्याची शक्यता आहे. जर न्यायालयाने या जागांवर फेरविचार केला, तर बंगालच्या राजकारणात मोठी उलथापालथ होउ शकते.

## फेरमोजणीत भाजप उमेदवाराचा

अधिका-यांनी सुधारित निकाल जाहीर केला. यामध्ये राजेगौडा यांची २५५ मते कमी झाली आणि भाजपचे जीवराज ५२ मतांनी विजयी झाल्याचे घोषित करण्यात आले.

**राजेगौडा यांचा आक्षेप आणि सुप्रीम कोर्टाची भूमिका-**राजेगौडा यांनी वकील तुषार गिरी यांच्यामार्फत सुप्रीम कोर्टात धाव घेतली. त्यांचा आक्षेप होता की, हायकोर्टाने फक्त २७९ बाद मतांच्या तपासणीचे आदेश दिले असताना, निवडणूक अधिका-यांनी ५६२ वैध मतांची जी राजेगौडा यांच्या बाजूने होती बेकायदेशीरपणे पुन्हा तपासणी केली. आधी वैध ठरलेली मते अचानक बाद कशी झाली? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. सुप्रीम कोर्टाने हा युक्तिवाद ग्राह्य धरत हायकोर्टाच्या आदेशाला स्थगिती दिली आणि राजेगौडा यांना आमदार पद देण्याचे निर्देश दिले.

**भाजप उमेदवारावर गुन्हेगारी खटल्याची टांगती तलवार-**या प्रकरणाला आणखी एक पदर म्हणजे भाजप उमेदवार डी. एन. जीवराज यांच्यावर पोस्टल बॅलेटशी छेडछाड केल्याचा आरोप आहे. याप्रकरणी त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल असून, सध्या हायकोर्टाने त्या कारवाईला स्थगिती दिली आहे. मात्र, सुप्रीम कोर्टाच्या आजच्या भूमिकेमुळे जीवराज यांच्या अडचणीत वाढ झाली आहे.

**पुढील सुनावणी २१ मे रोजी-**सुप्रीम कोर्टाने याप्रकरणी निवडणूक आयोगाला नोटीस बजावली असून पुढील सुनावणी २१ मे २०२६ पर्यंत पुढे ढकलली आहे. तोपर्यंत श्रृंगेरी मतदारसंघाचे प्रतिनिधित्व टी. डी. राजेगौडा यांच्याकडेच राहणार आहे.

## 'नीट 2026' चा पेपर

**एनटीएचे स्पष्टीकरण-** नॅशनल टेस्टिंग एजन्सीने शनिवारी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे स्पष्ट केले की, ३ मे रोजीची परीक्षा पूर्ण सुरक्षा प्रोटोकॉल नुसारच पार पडली. संशयास्पद माहिती ७ मे रोजी उशिरा मिळाली आणि ८ मे रोजी सकाळी ती स्वतंत्र पडताळणी आणि आवश्यक कार्यवाहीसाठी केंद्रीय संस्थांकडे पाठवण्यात आली आहे. प्रामाणिकपणे परीक्षा देणा-या विद्यार्थ्यांच्या कष्टावर कोणताही अन्याय केला जाणार नाही, असेही एनटीएने स्पष्ट केले आहे. तपास यंत्रणांनी शिक्षण मंत्रालयाला आपला अहवाल सादर केल्यानंतरच पुढील निर्णय घेतला जाईल, असे सांगण्यात आले आहे. हे प्रकरण सध्या पडताळणीच्या टप्प्यावर असून अद्याप कोणताही अधिकृत गुन्हा दाखल झालेला नाही. एका अधिका-याने सांगितले की, रसायनशास्त्र आणि जीवशास्त्राशी संबंधित सुमारे १०० प्रश्न नीटच्या पेपरशी जुळत असल्याचे दिसून येत आहे. राजस्थानचे कोचिंग हब असलेल्या सीकरसह अनेक ठिकाणी चौकशी सुरू केली आहे.

## विभागीय लोकशाही दिनात चौदा

लोकशाही दिनाचे कामकाज आज पार पडले. यावेळी अपर आयुक्त संजय जाधव, उपायुक्त संतोष कवडे, राजीव फडके, सहाय्यक आयुक्त वैशाली पाथरे, गिता वंजारी यांच्यासह महसूल, पोलीस, महापालिका, सहकार, कृषी, जलसंधारण व ऊर्जा विभागाचे अधिकारी प्रत्यक्षरित्या तर पाचही जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी व संबंधित अधिकारी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून बैठकीला उपस्थित होते.

यावेळी विभागीय लोकशाही दिनात अमरावती विभागातून दाखल एकूण १४ प्रकरणांवर चर्चा करुन प्रत्येक तक्रारींच्या अनुषंगाने सविस्तर आढावा घेण्यात आला. एकूण १४ प्रकरणापैकी ४ प्रकरणे निकाली काढण्यात आली. २ प्रकरणे नव्याने दाखल झालीत. १२ प्रलंबित प्रकरणे तत्काळ निकाली काढण्यासाठी संबंधित विभागांनी स्थळ पाहणी, मुद्देनिहाय चौकशी, पडताळणी करुन सुस्पष्ट अंतीम अहवाल तत्काळ सादर करावेत, असे निर्देश विभागीय आयुक्तांनी यावेळी दिले. विभागीय महिला लोकशाही दिनांतर्गत एकही प्रकरण दाखल झाले नाही, अशी माहिती महिला व बालविकास विभागाव्दारे देण्यात आली.

यावेळी लोकशाही दिनासाठी अमरावती विभागातून उपस्थित राहिलेल्या तक्रारदारांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. मागील लोकशाही दिनातील प्रलंबित प्रकरणे नवीन लोकशाही दिनात सुनावणीसाठी येवू नये. न्यायप्रविष्ट किंवा अर्धन्यायिक प्रकरणांसंदर्भात तत्काळ अहवाल सादर करण्यात यावा. लोकशाही दिनासाठी दाखल होणाऱ्या तक्रार अर्जांवर वेळेत कार्यवाही होण्यासाठी संबंधित विभागाने जबाबदारीपूर्वक प्रयत्न करावे, अशा सूचना विभागीय आयुक्त गुंडे यांनी यावेळी दिल्यात.

## दिव्यांग उद्योजक भावेश भाटिया

त्यांच्या संघर्षमय जीवनप्रवासाने उपस्थित अमरावतीकरांना जीवनाकडे पाहण्याची नवी सकारात्मक दृष्टी दिली. कै. अशोक माधवराव गायगोले यांच्या जन्मदिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमाचे आयोजन शाश्वत कन्सेप्ट स्कूल परिवारातर्फे करण्यात आले होते. या उपक्रमात प्रयास सेवांकुर, गाडगे बाबा रक्तपेढी, समर्पण आदी सेवाभावी संस्थांचाही सहभाग होता.

कै. अशोकराव गायगोले हे सामाजिक जाण असलेले व्यक्तिमत्त्व होते. अंध व्यक्तींसाठी कार्य करणाऱ्या विविध संस्थांना त्यांनी नेहमी सहकार्य केले. मरणोत्तर नेत्रदान करून त्यांनी दोन व्यक्तींच्या आयुष्यात प्रकाश निर्माण केला. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ गायगोले परिवारातर्फे 'दिशा आय बँक'ला रुग्णवाहिका भेट देण्यात आली. या प्रसंगी उपस्थितांनी भावनिक वातावरणात त्यांना अभिवादन केले.

व्याख्यानादरम्यान भावेश भाटिया यांनी आपल्या जीवनातील अनेक प्रेरणादायी प्रसंग कथन केले. उमेदीच्या काळात दृष्टी गेल्यानंतर आलेल्या नैराश्यावर मात करत त्यांनी उभा केलेला संघर्ष उपस्थितांना भारावून गेला. 'आई, मी जग पाहू शकत नाही,' असे सांगितल्यावर त्यांच्या आईने दिलेला संदेश- 'असे कर्तृत्व कर की संपूर्ण जग तुझ्याकडे पाहत राहील' - हा त्यांच्या जीवनातील प्रेरणास्त्रोत ठरला.

याच जिद्दीच्या बळावर त्यांनी उभारलेली 'सनराईज कॅन्डल' कंपनी आज जागतिक स्तरावर पोहोचली असून त्यांच्या मेणबत्त्यांनी देश-विदेशातील प्रतिष्ठित ठिकाणी प्रकाश दिला आहे. त्यांच्या प्रेरणादायी विचारांनी आणि थक्क करणाऱ्या जीवनप्रवासाने सभागृहातील श्रोत्यांची मने जिंकली.कार्यक्रमास विविध सामाजिक, शैक्षणिक व सेवाभावी क्षेत्रातील मान्यवर, पालक, विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नांदगाव बाजार समिती

रिक्त होते. तेव्हा ११ मे रोजी सभापती पदाची निवडणूक घेण्यात आली. निवडणूक प्रक्रिया अध्यासी अधिकारी तथा सहाय्यक निबंध (सहकारी संस्था,) सचिन पतंगे व सहाय्यक आशिष भांडे यांनी निवडणुकीचे कामकाज सांभाळले. निवडणूक प्रक्रिये वेळी सहकार नेते तथा जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अभिजीत पाटील ढेपे व बाजार समितीचे माजी सभापती विलास पाटील चोपडे यांची प्रमुख उपस्थिती होती. याशिवाय विद्यमान उपसभापती विलास सावदे तसेच संचालक प्रभात ढेपे, प्रमोद ठाकरे, ज्ञानेश्वर हांडे, गजानन ढेरे, पंकज ठाकरे, धनंजय मेटकर, सोनाली लेंडे, अर्चना कणसे, अंकुश कोल्हे, गजानन सावदे, विजय अजबले, दीपक सवाई, ओमप्रकाश साबळे, जितेश जंगडा, विवेक वैष्णव, मोहम्मद जावेद या सर्व संचालकाची उपस्थिती होती.

## राज्य उत्पादन शुल्क

राज्य उत्पादन शुल्क दर्यापूरमध्ये स्वतंत्रपणे कार्यरत होणार का?याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क दर्यापूर येथील कार्यालय इमारतीचा भूमिपूजन समारंभ ९ सप्टेंबर २४ रोजी होऊन सुद्धा अद्याप पर्यंत इमारतीचा साधा पाया सुद्धा भरण्यात आलेला नाही. या कार्यालयाकडे जाणून दुर्लक्ष केल्या जात आहे की काय? असा प्रश्न निर्माण होत आहे.

## खरेदी विक्री संस्थेच्या कारभारावर

अखेर सुटला आहे. शेतकऱ्यांच्या सहनशीलतेचा अंत पाहू नका, अन्यथा होणाऱ्या उद्रेकाला प्रशासन जबाबदार असेल, अशा शब्दांत शेतकऱ्यांनी खडेबोल सुनावले. नाफेडची खरेदी आणि पीक विम्याच्या मुद्द्यावरून आज तिवसा तहसील कार्यालयात शेतकऱ्यांनी आक्रमक होऊन निवेदन सादर करण्यात आले.

केंद्रीय कृषी मंत्रालयाने हरभरा खरेदीसाठी २९ मे आणि तूर खरेदीसाठी ३१ मे पर्यंत मुदतवाढ दिली असताना तिवसा तालुक्यातील खरेदी केंद्र का बंद आहेत? असा सवाल शेतकऱ्यांनी उपस्थित केला आहे. खरेदी-विक्री मॅनेजर दीपक गोफने यांच्यावर अनेक आरोपांच्या फैरी यावेळी झाडण्यात आल्या. बारदाण्याअभावी शेकडो शेतकऱ्यांचा शेतमाल उघड्यावर असून, अश्या बेजबाबदार अधिकाऱ्यांवर तात्काळ कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. खऱ्या शेतकऱ्यांचा माल घरात पडून असताना, चक्क ४०० बनावट ऑनलाइन नोंदणी झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. यामागे मोठे रॅकेट असण्याची शक्यता असून, या घोटाळ्याची उच्चस्तरीय चौकशी करून गुन्हे दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे. यावेळी तिवसा नगरपंचायतचे विरोधी पक्षनेते अनिल थुल, सामाजिक कार्यकर्ते प्रशांत कांबळे,दिलीप काळबांडे, वैभव वानखडे, राजीव ठाकूर,प्रवीण केने, सेतू देशमुख, अजय आमले, मनोज काळमेघ, योगेश गोरे, बाळा देशमुख,प्रणव गौरखेडे, गणेश डोळस,प्रकाश चिचखेडे, स्वप्नील तुरकाने, अनिल मेश्राम, विजय ठाकरे, निशू वानखडे, किशोर सातपुते, प्रवीण डहाके, ऋषी देशमुख, अतुल चितारे, दिनेश वानखडे, नितीन मेहकरे, शिवा शापामोहन, गणेश डोळस, प्रदीप बाभुळकर, रोशन खोब्रागडे, संतोष मोरे, कुणाल जुमळे, पंकज लांडगे, गजू शेंदरे, राहुल मकेश्वर ,विलास हांडे, मनोज खाकसे, मनीष माहोरे, प्रफुल मकेश्वर यांच्यासह शेकडो शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

**विमा कंपन्यांची कुंभकर्णी झोप-** गेल्या वर्षी अतिवृष्टीमुळे जमिनी खरडून गेल्या, पिकांचे अतोनात नुकसान झाले. शेतकऱ्यांनी हप्ते भरले, पण विमा कंपन्या मात्र हात वर करत आहेत. शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळणे थांबवा आणि तात्काळ विम्याची रक्कम खात्यात जमा करा, असा इशारा यावेळी देण्यात आला.

हे केवळ निवेदन नाही, तर हा अंतिम इशारा आहे. जर येत्या काही दिवसांत खरेदी सुरू झाली नाही आणि विम्याचा प्रश्न सुटला नाही, तर तिवसा तालुक्यात तीव्र आंदोलन छेडले जाईल. शेतकरी पुत्र रस्त्यावर उतरला तर तो आपला हक्क घेतल्याशिवाय शांत बसणार नाही. **-अनिल रामचंद्र थुल (शेतकरी, तिवसा)**

तालुक्यातील हजारो शेतकरी अद्यापही हरभरा, तूर खरेदीपासून वंचित आहे. बारदाना नसल्याने २० दिवस खरेदी बंद ठेवणाऱ्या व्यवस्थापक गोफणेवर निलंबनाची कारवाई झाली पाहिजे. तर तातडीने शेतकऱ्यांची तूर, हरभरा खरेदी तातडीने सुरू करावी, खरिपाचा विमा शेतकऱ्यांना तातडीने देण्यात यावा. अन्यथा येत्या काळात शेतकऱ्यांचे आंदोलन अधिक तीव्र होईल. **- प्रशांत कांबळे, सामाजिक कार्यकर्ते**

## महसूल सहाय्यक लाच घेताना

रुपयांची लाच मागितली होती. तक्रारदाराने याबाबत एसीबीकडे तक्रार दिल्यानंतर ८ मे २०२६ रोजी पडताळणी करण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, त्या दिवशी आरोपी व तक्रारदार यांची भेट होऊ शकली नाही. त्यानंतर सोमवार, ११ मे रोजी पुन्हा पडताळणी करण्यात आली असता आरोपी राहुल निस्वादे याने तडजोडीनंतर १ हजार ५०० रुपयांची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार एसीबीच्या पथकाने सापळा रचला. तहसील कार्यालय परिसरात आरोपीने तक्रारदाराकडून १ हजार ५०० रुपयांची लाच स्वीकारताच, आधीपासूनच दबा धरून बसलेल्या एसीबीच्या अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष त्याला रंगेहात पकडले. या प्रकरणी पुढील कारवाई सुरू आहे.

## नगरसेविका बीबी बतूल

तिस-या मुलीबद्दल कोणतीही माहिती दिली नाही. निवडणूक आयोगा समक्ष त्यांनी खोटे घोषणापत्र दाखल केल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ता एजाज अहमद यांनी आज सोमवार ११ मे रोजी झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये केला आहे.

एजाज अहमद यांनी म्हटले की नगरसेविका बीबी बतूल शाह यांची सदस्यता रद्द करण्यात यावी. नियमानुसार तीन अपत्य असल्यावर निवडणूक लढविता येत नाही. तरीपण त्यांनी खोटी माहिती देऊन ही निवडणूक लढविली आणि जिंकली ही. त्यांना तिसरी मुलगी आहे, या संदर्भात पुरावे प्रशासनाला देण्यात आले आहे. मनपा आयुक्त, जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्ताकडे पण याची तक्रार करण्यात आली आहे. पण अजून पर्यंत कोणताही निर्णय प्रशासनाने घेतलेला नाही. जर त्यांची सदस्यता रद्द नाही झाली तर उच्च न्यायालयामध्ये जाण्याची तयारी त्यांनी दर्शविली आहे. त्यांनी सांगितले आहे की, राज्य शासनाने जारी केलेल्या आदेशात म्हटले आहे की, १२ सप्टेंबर २००१ नंतर जर तिसरे अपत्य असले आणि त्या संदर्भात माहिती देण्यात आली नाही किंवा लपवली तर उमेदवाराची सदस्यता रद्द केली जाते. नगरसेविका बीबी बतुल शाह यांना १४ सप्टेंबर २००९, १६ सप्टेंबर २००८ आणि १५ नोव्हेंबर २०२१ मध्ये तीन मुलं झालेले आहे. नामांकनामध्ये त्यांनी २००८ मध्ये झालेल्या मुली बाबत माहिती न देता लपवली आहे, म्हणून त्यांना अपात्र घोषित करण्यात यावे अशी मागणी करण्यात आली आहे. पत्रकार परिषदेमध्ये एजाज अहमद सह अब्दुल कदिर, महमूद खान, शेख अंसार, कलीम खान, सय्यद नसीम आदि उपस्थित होते.

जनमाध्यम
अकोला । वाशिम । बुलडाणा
■ मंगळवार, १२ मे २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४
एक प्रतिष्ठित सवय
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

# ‘सप्तश्रृंगी ज्वेलर्स’ जबरी चोरीचा छडा

## ७२ तासांत आरोपी जेरबंद; ५८० सीसीटीव्ही फुटेजची तपासणी, पिस्तुलासह २५.५८ लाखांचा मुद्देमाल जप्त; सहा दिवसांचा पीसीआर

■ प्रतिनिधी | अकोला ■

*शहरातील खदान परिसरातील ‘श्री सप्तश्रृंगी अलंकार केंद्र’ येथे भरदिवसा पिस्तुलाचा धाक दाखवून झालेल्या तब्बल ६९.९० लाखांच्या जबरी चोरीप्रकरणाचा छडा लावण्यात स्थानिक गुन्हे शाखेला अवघ्या ७२ तासांत यश आले. या प्रकरणातील मुख्य आरोपी रोहनसिंग सतनामसिंग बावरा (रा. भुसावळ, जि. जळगाव) याला अटक करण्यात आली असून त्याच्याकडून सोन्या-चांदीचे दागिने व गुन्ह्यात वापरलेले पिस्तुल असा २५ लाख ५८ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. न्यायालयाने आरोपीला १६ मेपर्यंत सहा दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.*



खदान पोलिस ठाण्याच्या हद्दीतील आदर्श कॉलनी परिसरात असलेल्या ‘श्री सप्तश्रृंगी अलंकार केंद्र’मध्ये ७ मे रोजी दुपारी १२.४५ ते १ वाजण्याच्या सुमारास ही धाडसी चोरी झाली होती. फिर्यादी जितेंद्र भास्करराव विसपुते (वय ५४), व्यवसाय सराफा, रा. युसुफ अली खदान, यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, एक अज्ञात इसम दुकानात आला व पिस्तुलाचा धाक दाखवत सोन्या-चांदीचे दागिने तसेच ७५ हजारांची रोकड असा एकूण ६९ लाख ९० हजार रुपयांचा ऐवज लुटून फरार झाला होता.

या प्रकरणी खदान पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०९ (१), (२), (३) तसेच आर्म ॲक्टच्या कलम ३ व २५ अन्वये गुन्हा दाखल केला होता.


घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांनी तपासासाठी विशेष पथके तयार करण्याचे आदेश दिले. अपर पोलिस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी व उपविभागीय पोलिस अधिकारी सुदर्शन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शहर विभागातील डीबी पथक व स्थानिक गुन्हे शाखेची संयुक्त पथके कामाला लागली.

तपासादरम्यान पोलिसांनी तब्बल ५८० सीसीटीव्ही फुटेज तपासले. स्थानिक गुन्हे शाखेने ३३० तर शहर डीबी पथकाने २५० फुटेजचे तांत्रिक विश्लेषण केले. आरोपीच्या शोधासाठी पोलिसांनी जवळपास ७०० किलोमीटरचा प्रवास केला.

### सोन्या-चांदीसह पिस्तुल जप्त

आरोपीकडून १६० ग्रॅम सोन्याचे दागिने, ४४० ग्रॅम चांदीचे दागिने तसेच विदेशी बनावटीचा देशी कट्टा जप्त करण्यात आला. जप्त मुद्देमालाची एकूण किंमत २५ लाख ५८ हजार २०० रुपये इतकी असल्याचे पोलिसांनी सांगितले. उर्वरित मुद्देमाल हस्तगत करण्यासाठी पुढील तपास सुरू आहे.

### या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी



### उलगडला गुन्हा

ही कारवाई पोलिस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलिस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलिस अधिकारी सुदर्शन पाटील, पोलिस निरीक्षक शंकर शेळके, सहाय्यक पोलिस निरीक्षक विजय जाधव, पोलिस उपनिरीक्षक विष्णु बोडखे, पोलिस उपनिरीक्षक माजिद पठाण यांनी केली. तसेच पोलिस कर्मचारी शेख हसन, अब्दुल माजिद, महेंद्र मलीये, किशोर सोनोने, वसिमोद्दीन, एजाज अहमद, खुशाल नेमाडे, सुलतान पठाण, गोकुळ चव्हाण, राहुल गायकवाड, प्रशांत केदारे, स्वप्नील खेडकर, राजसिंह चंदेल, अभिषेक पाठक, आकाश मानकर, सतीश पवार, धिरज वानखडे, श्रीकांत पातोंड, स्वप्नील चौधरी, अन्सार अहमद, उदय शुक्ला, अशोक सोनवणे, अमोल दिपके यांनी तपासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. सायबर विभागाचे स्वप्नील दामोदर, राहुल सानप, अतुल अजने, आकाश पांडे तसेच चालक ग्रेड पोलिस उपनिरीक्षक विनोद ठाकरे, रामकिसन डोईफोडे, देवानंद खरात आणि मनीष ठाकरे यांनीही कारवाईत सहभाग घेतला. शहर विभागातील सर्व डीबी पथकांनीही आरोपीच्या शोधासाठी विशेष प्रयत्न केले.

### चादर विक्रेत्याच्या बहाण्याने केली रेकी

तपासादरम्यान मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार आरोपी रोहनसिंग बावरा हा भुसावळ येथे वास्तव्यास असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेची दोन पथके भुसावळ येथे रवाना झाली. खडका रोड परिसरात सापळा रचून आरोपीला ताब्यात घेण्यात आले. चौकशीत आरोपीने अकोल्यात भाड्याच्या खोलीत राहत चादर विक्रीच्या बहाण्याने परिसराची रेकी केल्याची कबुली दिली. त्यानंतर ७ मे रोजी दुपारी त्याने पिस्तुलाचा धाक दाखवत जबरी चोरी केल्याचे उघड झाले.

# स्व. प्रकाशदादा डहाके स्मृती प्रित्यर्थ आयोजित कारंज्यात शेतकरी मेळाव्यास प्रतिसाद



■ प्रतिनिधी | कारंजा ■

यंदाच्या वर्षात पावसाचे प्रमाण तुलनेने कमी राहण्याची शक्यता असली, तरी योग्य नियोजन, पिकांची फेरपालट आणि वेळेवर शेती व्यवस्थापन केल्यास शेतकऱ्यांना आर्थिक फायदा होणार असून २०२६ हे वर्ष शेतकऱ्यांसाठी ‘मालामाल’ करणारे ठरेल, असा विश्वास प्रसिद्ध हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी व्यक्त केला.

लोकनेते माजी आमदार स्व. प्रकाशदादा डहाके यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ कृषी उत्पन्न बाजार समिती, कारंजा यांच्या वतीने १० मे रोजी यार्ड क्रमांक १ येथे आयोजित शेतकरी मार्गदर्शन कार्यशाळेत ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. कार्यशाळेला कारंजा तालुक्यासह परिसरातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

मार्गदर्शन करताना पंजाबराव डख म्हणाले की, वाढत्या खर्चामुळे शेती परवडत नसली तरी विदर्भातील शेतकरी सातत्याने पिकांची फेरपालट करत असल्याने येथील शेती टिकून राहणार आहे. शेतीसोबत जोडधंदा असणे ही काळाची गरज असून स्थानिक हवामान व जमिनीच्या प्रकारानुसार योग्य पिकांची निवड करणे आवश्यक आहे.

ते पुढे म्हणाले की, १५ मेपासून वातावरणात बदल होण्याची शक्यता असून शेतकऱ्यांनी आतापासूनच पेरणीची तयारी सुरू करावी. लवकर येणाऱ्या वाणांची निवड फायदेशीर ठरेल. सप्टेंबरमध्ये परतीचा पाऊस जोरदार होण्याची शक्यता असल्याने त्याचा शेतीवर परिणाम होऊ शकतो. अवकाळी पावसापासून संरक्षणासाठी पेरणीची तारीख नोंदवून ठेवावी तसेच पीक काढणी योग्य वेळी करावी, असा सल्लाही त्यांनी दिला.

‘निसर्गाला घाबरू नका, निसर्गाचा अंदाज घेणे शिका,’ असे सांगत त्यांनी झाडे, पक्षी आणि जनावरेही पावसाचे संकेत देतात, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष वेधले. कार्यशाळेत करडा कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ. निवृत्ती पाटील यांनीही शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. घरातील गायींची संख्या कमी झाल्यापासून शेतीची अधोगती सुरू झाली असून शेणखताचा वापर घटल्याने जमिनीची सुपीकता कमी झाली, असे त्यांनी सांगितले. रासायनिक शेतीमुळे पिकांची प्रतिकारशक्ती घटली असून दोन दिवस पाणी न मिळाल्यास सोयाबीनसारखी पिके लगेच कोमेजतात, असेही त्यांनी नमूद केले. ‘गो कृपा अमृत शेती’ पद्धतीमुळे उत्पादनात वाढ होत असल्याचा दावा करत त्यांनी हळद व संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना या पद्धतीचा प्रयोग करण्याचे आवाहन केले. आगामी हंगामात किमान पाच गुंठे क्षेत्रात तरी ‘गो कृपा अमृत शेती’चा प्रयोग करावा, असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात माजी आमदार स्व. प्रकाशदादा डहाके यांना आदरांजली वाहण्यात आली. अध्यक्षस्थानी भाजपाचे मुख्य प्रतोद रणधीर सावरकर होते. यावेळी उद्घाटक म्हणून अनुप धोत्रे, तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी खासदार अनंतराव देशमुख, आमदार सईताई डहाके, आमदार श्याम खोडे, माजी आमदार विजयराव जाधव, भाजप जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे, जिल्हा सरचिटणीस डॉ. राजीव काळे, वाशिम नगराध्यक्ष अनिल केंदळे, माजी नगराध्यक्ष दत्तराज डहाके, जिल्हा कृषी अधिकारी आरिफ शाह , जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक विश्वनाथ ताथोड, गटनेत्या शालिनी ठाकरे, नगरसेवक सागर अंभोरे, अतुल चिमेगावे, बंटीभाऊ गाडगे, नितीन गढवाले,अजय श्रीवास, नगरसेविका कुसुमताई अघम, वैशाली गुल्हाने, कांचन डेंडुळे, ज्योती राठोड, वंदना धार्डीकर, चंदाताई कोळकर यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला स्व. प्रकाशदादा डहाके यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर माजी आमदार विजयराव जाधव, आमदार श्याम खोडे, खासदार अनुप धोत्रे आदी मान्यवरांनी स्व. प्रकाशदादा डहाके यांच्या आठवणींना उजाळा दिला.

यावेळी माजी खासदार अनंतराव देशमुख यांनी स्व. प्रकाशदादा डहाके यांच्या कार्याचा गौरव करताना, ‘खरं बोलूनही राजकारणात माणसे जोडता येतात, याचे ते जिवंत उदाहरण होते,’ असे सांगितले. तर आमदार सईताई डहाके यांनी बाजार समितीमार्फत राबविण्यात येणाऱ्या शेतकरी हिताच्या उपक्रमांची माहिती दिली.

अध्यक्षीय भाषणात आमदार रणधीर सावरकर यांनी पीक विमा कंपन्यांच्या गैरप्रकारांना आळा घालून शेतकरी हितासाठी निधी वापरण्याचे शासनाचे प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले. तसेच शेतीत विज्ञान आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवून कृषी क्षेत्रात अधिक गुंतवणूक करण्याचे धोरण शासनाने ठरविले असल्याचे स्पष्ट केले. सहकार संस्थांचे जाळे अधिक मजबूत करण्याची गरज व्यक्त करत त्यांनी शेतकऱ्यांनी पूरक उद्योग आणि व्यवसायांकडेही वळावे, असे आवाहन केले.

प्रास्ताविक बाजार समितीचे उपसभापती प्रकाश लिंगाटे यांनी केले. सूत्रसंचालन प्रवीण कानकिरड तर आभारप्रदर्शन सचिव निलेश भाकरे यांनी केले.

# अकोट नगर परिषद बाजार हर्रासीवर भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप

## ‘मागच्या दाराने’ लिलाव केल्याचा दावा; फेरलिलावाची मागणी

■ प्रतिनिधी | अकोट ■

अकोट नगर परिषदेमार्फत करण्यात आलेल्या बाजार हर्रासी प्रक्रियेवर गंभीर भ्रष्टाचाराचे आरोप करण्यात आले असून, संबंधित अधिकाऱ्यांनी संगनमत करून नियमांना हरताळ फासल्याची तक्रार समोर आली आहे. या प्रकरणात दोषी अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करून संपूर्ण हर्रासी रद्द करावी, अशी मागणी तक्रारकर्ते विशाल ऊर्फ गोलु गणेशराव भगत यांनी केली आहे.

दि. २५ एप्रिल २०२६ रोजी पार पडलेल्या बाजार हर्रासी प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. तक्रारीनुसार, नगर परिषदेतील काही जबाबदार अधिकाऱ्यांनी पदाचा गैरवापर करत आर्थिक व्यवहारातून एका विशिष्ट व्यक्तीला लाभ मिळवून दिला. यामुळे नगर परिषदेच्या महसुलाचे मोठे नुकसान झाल्याचा दावा करण्यात आला आहे. तक्रारीत लिपीक अधिकारी श्रीकृष्ण केंद्रे आणि अधिकारी हगवणे यांच्यावर संगनमताने नियमबाह्य पद्धतीने हर्रासी केल्याचा आरोप आहे. पहिल्या आणि दुसऱ्या नोटीसीवेळी वृत्तपत्रांमध्ये जाहिरात प्रकाशित करण्यात आली होती. मात्र तिसऱ्या नोटीसीवेळी कोणतीही सार्वजनिक सूचना अथवा वृत्तपत्र जाहिरात न देता ‘मागच्या दाराने’ हर्रासी प्रक्रिया पूर्ण केल्याचा गंभीर आरोप तक्रारकर्त्याने केला आहे. ‘पारदर्शकता न ठेवता मर्जीतील व्यक्तीला बाजार देण्यासाठी संपूर्ण प्रक्रिया रचली गेली. त्यामुळे संपूर्ण लिलाव प्रक्रियेची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे,’ असे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणाची चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करावी, तसेच सदर हर्रासी रद्द करून नव्याने पारदर्शक पद्धतीने फेरलिलाव घेण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच या तक्रारीवर करण्यात आलेल्या कारवाईची लेखी माहिती देण्याची मागणीही करण्यात आली आहे. यासंदर्भात संबंधित अधिकारी वर्ग यांच्याशी संपर्क साधला असता होऊ शकला नाही. दरम्यान, या तक्रारीच्या प्रती पालकमंत्री तथा जिल्हाधिकारी अकोला यांनाही पाठविण्यात आल्या असून, अकोट नगर परिषदेमधील हर्रासी प्रक्रियेवर आता संशयाचे सावट निर्माण झाले आहे.

### तक्रारीनंतरही कारवाई शून्य, मुख्याधिकाऱ्यांना पुन्हा स्मरणपत्र देणार



‘सदर प्रकरणी २८ एप्रिल रोजी नगर परिषदेकडे अधिकृत तक्रार दिली होती. मात्र आजपर्यंत कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. संपूर्ण हर्रासी प्रक्रिया अनेक नियमांना बगल देत पार पाडण्यात आली आहे. उद्या मुख्याधिकाऱ्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन पुन्हा स्मरणपत्र देणार असून, या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी व्हावी, ही आमची मागणी आहे.’

**विशाल भगत,** तक्रारदार

# एमबी कॉन्व्हेंटचा १० वी चा निकाल उत्कृष्ट

**अकोला :** स्थानिक एमबी कॉन्व्हेंटचा माध्यमिक शाळांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल शंभर टक्के राहिला. शाळेतून एकूण २१ विद्यार्थ्यांनी एसएससीची परीक्षा दिली होती, त्यापैकी सर्व विद्यार्थ्यांनी चांगल्या गुणांनी यश मिळवले. शाळेतून तन्मय अनिल जोशी ने ९३.८० टक्के गुणांसह प्रथम स्थान मिळवले. गौरी प्रमोद पारसकर ने ८८.२० टक्के गुणांसह द्वितीय तर ओम दत्तात्रय चौधरी ने ८७.४० टक्के गुणांसह तृतीय स्थान प्राप्त केले.

# प्रगती जितकर हिला ९५.९६ टक्के गुण



■ प्रतिनिधी | वाशिम ■

येथील सिव्हिल लाईन परिसरातील जितकर लेआउट येथे वास्तव्यास असलेले समाधान जितकर यांची सुपुत्री कु. प्रगती जितकर हिने दहावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. तिने ५०० पैकी ४७८ गुण प्राप्त करत ९५.९६ टक्के गुणांसह उत्तीर्ण होण्याचा मान मिळविला.

प्रगतीच्या या यशामुळे जितकर कुटुंबावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# ॲड बाळासाहेब आंबेडकर यांच्या वाढदिवसानिमित्त रुग्णांना फळे-बिस्किटांचे वाटप

■ प्रतिनिधी | वाशिम ■

वंचित बहुजन आघाडी, वाशिमच्या वतीने पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर यांच्या वाढदिवसानिमित्त ‘स्वाभिमानी दिन’ उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त जिल्हा सामान्य रुग्णालय, वाशिम येथे रुग्णांना फळे व बिस्किटांचे वाटप करण्यात आले. तसेच शहर परिसरातील वेठबिगारी व वंचित वस्त्यांमध्ये जाऊन गरजू बालकांना फळे आणि बिस्किटांचे वितरण करण्यात आले.



यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांनी ?ड. बाळासाहेब आंबेडकर हे वंचित, शोषित आणि बहुजन समाजाच्या हक्कांसाठी सातत्याने संघर्ष करणारे नेतृत्व असल्याचे सांगितले. सामाजिक व राजकीय क्षेत्रात त्यांच्या नेतृत्वाला बळ देण्यासाठी प्रत्येक वंचित घटकाने एकजुटीने त्यांच्या पाठीशी उभे राहण्याची गरज असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. तसेच त्यांच्या निरोगी व दीर्घायुष्यासाठी शुभेच्छाही देण्यात आल्या.

कार्यक्रमाला वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव सोनाजी इंगळे, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष ज्योतिताई इंगळे, युवा आघाडी अध्यक्ष सूर्यकांत गायकवाड, वाशिम विधानसभा समन्वयक डॉ. तुषार गायकवाड, महिला आघाडी महासचिव प्रतिभाताई अंभोरे, ज्येष्ठ नेते अनंतराव जुमडे, भगवान पट्टेबहादूर, सिद्धोधन राजे, दिनेश खडसे, भारतीय बौद्ध महासभेच्या मिलनताई बनसोड, कासाबाई सावळे, वंजारी यांच्यासह बहुसंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# जिल्ह्यात जमावबंदी, शस्त्रबंदी आदेश लागू

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यात २२ मे २०२६ च्या मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहणार आहे, अशी माहिती जिल्हादंडाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून अपर जिल्हादंडाधिकारी यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये जिल्ह्यात २२ मे २०२६ च्या मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहिल. त्यानुसार पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्तींनी या आदेशात नमुद असलेली कृत्ये सार्वजनिक परिसर किंवा त्याच्या जवळपास करण्यास बंदी घालण्यात आली आहे.

# जिल्ह्याचा निकाल ८८.०४ टक्के; दहावीतही मुलींचीच बाजी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

अमरावती विभागात गतवर्षी उल्लेखनीय कामगिरी करत दुसऱ्या क्रमांकावर झेपावलेल्या वाशिम जिल्ह्याची यंदा मात्र मोठी पिछेहाट झाली आहे.

जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या कॉपी मुक्त अभियानाचा फटका जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना बसला आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने शुक्रवारी जाहीर केलेल्या फेब्रुवारी-मार्च २०२६ च्या दहावी परीक्षेच्या निकालात वाशिम जिल्ह्याचा निकाल केवळ ८८.०४ टक्के लागला असून विभागातील पाच जिल्ह्यांमध्ये जिल्हा शेवटच्या स्थानावर फेकला गेला आहे. विशेष म्हणजे गतवर्षी जिल्ह्याचा निकाल ९५.४१ टक्के होता. त्यामुळे यंदा तब्बल ७.३७ टक्क्यांची घसरण नोंदविण्यात आली असून ही बाब शिक्षण क्षेत्रासाठी चिंताजनक मानली जात आहे.

यंदा जिल्ह्यातून १९ हजार ६५८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १९ हजार ४७० विद्यार्थी प्रत्यक्ष परीक्षेला बसले. यामधून १७ हजार १४३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. निकालाची टक्केवारी ८८.०४ इतकी राहिली.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत वाशिम जिल्ह्यात २० ग्रामपंचायतींची तपासणी पूर्ण

■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशिम जिल्ह्यात मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत दिनांक १ मे २०२६ ते ८ जून २०२६ या कालावधीत २० ग्रामपंचायतींची सखोल तपासणी पूर्ण करण्यात आली. या तपासणी समितीचे अध्यक्ष धनंजय साळवे गटविकास अधिकारी पंचायत समिती बल्लारपूर जिल्हा चंद्रपूर हे होते. समिती सचिव म्हणून दिलीप बैलनवार विस्तार अधिकारी पंचायत यांनी काम पाहिले, तर समिती सदस्य म्हणून सुनील नुत्तलवार, सुभाष अडेपवार आणि रविकुमार बोगावार यांनी सहभाग घेतला.




तपासणीदरम्यान रवींद्र सोनोने गटविकास अधिकारी पंचायत समिती वाशिम,संबंधित ग्रामपंचायतींचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, विस्तार अधिकारी पंचायत विनायक बोरचाटे, तालुका समन्वयक श्रीहरी जोशी, ग्रामपंचायत अधिकारी, शिक्षक, तलाठी, आशा सेविका, अंगणवाडी सेविका तसेच बचत गटाचे सीआरपी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

समितीने ग्रामस्वच्छता, पाणीपुरवठा, लोकसहभाग, डिजिटल प्रशासन, विविध शासकीय योजनांची अंमलबजावणी, महिला बचत गटांचे कार्य, शिक्षण व आरोग्य सेवा आदी बाबींची प्रत्यक्ष पाहणी करून मूल्यमापन केले. ग्रामपंचायतींमध्ये स्पर्धात्मक वातावरण निर्माण झाल्याने गावोगावी विकासकामांना गती मिळाल्याचे चित्र दिसून आले.

विशेष म्हणजे शेलू बु, जांभरूण परांडे आणि टनका या ग्रामपंचायतींमध्ये चुरशीची स्पर्धा होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. तसेच उर्वरित ग्रामपंचायतीं पैकी दोन ग्रामपंचायतींची विशेष पुरस्कारासाठी निवड करण्यात येणार असल्याची माहिती समितीकडून देण्यात आली.

या अभियानामुळे ग्रामपंचायतींमध्ये विकास, स्वच्छता, पारदर्शक प्रशासन व लोकसहभाग यांना चालना मिळाली असून, वाशिम जिल्ह्यातील ग्रामविकासाला नवी दिशा मिळत असल्याची भावना समिती अध्यक्ष साळवे यांनी व्यक्त केली.

जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १६४ ■ मंगळवार १२ मे २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.००रु

# नाचणगावात बोगस कृषी मालाचे अड्डे

## बंदी असतानाही काळाबाजार सुरूच!' नाचणगावात एसटीबीटी बियाण्यांचा मोठा साठा पकडला

### पुलगावात १८ लाखांचे बंदीस्त एसटीबीटी बियाणे जप्त; शेतकऱ्यांच्या जीवाशी सुरू होता घातक खेळ

**पुलगाव जनमाध्यम :** एकीकडे शेतकरी कर्ज, नापिकी आणि वाढत्या खर्चामुळे होरपळत असताना दुसरीकडे बियाणे माफिया त्यांच्या घामावर अक्षरशः डल्ला मारत असल्याचे संतापजनक वास्तव पुलगाव येथे समोर आले आहे. शासनाने स्पष्ट बंदी घातलेले एसटीबीटी बियाणे सर्रास विकले जात असल्याचा प्रकार उघडकीस आल्यानंतर कृषी विभागाने धडक कारवाई करत तब्बल १८ लाख रुपये किमतीचा साठा जप्त केला. मात्र या घटनेमुळे बियाणे माफियांना नेमके कोणाचे अभय आहे? असा प्रश्न आता शेतकरी विचारू लागले आहेत.

जिल्हा परिषद कृषी विभागाच्या भरारी पथकाला नाचणगाव येथील गाडगेनगर परिसरातील एका गोडाऊनमध्ये मोठ्या प्रमाणात शासनबंदी असलेले एसटीबीटी बियाणे साठवून ठेवण्यात आल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार पथकाने तातडीने धाड टाकली. मात्र, कारवाईची चाहूल लागताच संबंधित विक्रेता फरार झाल्याचे समोर आले. त्यामुळे अधिकाऱ्यांनी थेट पुलगाव पोलिस ठाणे गाठत पोलिस निरीक्षकांशी चर्चा केली.

यानंतर पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत गोडाऊनचे कुलूप तोडण्यात आले. तपासणीदरम्यान आत ३७ बोऱ्यांमध्ये तब्बल १ हजार ८५० बीटी कॉटन पाकिटांचा साठा आढळून आला. एका बोरीत ५० पाकिटे असल्याची माहिती समोर आली असून या संपूर्ण मुद्देमालाची किंमत जवळपास १८ लाख रुपये असल्याचे सांगण्यात आले. जप्त



केलेला साठा पुलगाव पोलिस ठाण्यात जमा करण्यात आला असून पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे.

ही कारवाई माहिती अधिकारी संदीप ढोणे, जिल्हा गुण नियंत्रण अधिकारी पेटकर आणि महेश पालवे यांच्या पथकाने केली. कृषी विभागाच्या या धडक मोहिमेमुळे जिल्ह्यातील बोगस बियाणे विक्रेत्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

विशेष म्हणजे, काही दिवसांपूर्वी याच नाचणगाव परिसरात नकली खत विक्रीचा प्रकार उघड झाला होता. एका सामाजिक कार्यकर्त्याने पाठपुरावा करत प्रशासनाला कारवाईस भाग पाडले होते. आता पुन्हा त्याच भागात बंदीस्त बियाण्यांचा एवढा मोठा साठा सापडल्याने स्थानिक यंत्रणांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

दरम्यान, शेतकरी वर्गातून तीव्र संताप व्यक्त होत असून प्रशासनाला माहिती मिळाल्यावर कारवाई होतेच; पण बियाणे माफियांवर अशी कठोर शिक्षा झाली पाहिजे की पुन्हा कुणी शेतकऱ्यांच्या जीवाशी खेळ करण्याचे धाडस करणार नाही, अशी मागणी जोर धरू लागली आहे. खरीप हंगामाच्या तोंडावर उघड झालेल्या या प्रकारामुळे जिल्ह्यातील कृषी व्यवस्थेतील काळा बाजार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे.

# विदर्भ साहित्य संघाद्वारे पुस्तक लोकार्पण व सत्कार सोहळा

## नवे प्रवाहच घडवतील साहित्यसृष्टीत बदल - अरुणा सबाने



**वर्धा जनमाध्यम -** ग्रंथनिर्मितीतील नवोदित प्रतिभावंतांचे योगदान महत्त्वाचे असून या नव्या प्रवाहांमुळे परिवर्तन घडून येईल, अशी आशा प्रसिद्ध साहित्यिक व सामाजिक कार्यकर्त्या अरुणा सबाने यांनी विदर्भ साहित्य संघ, वर्धा शाखेद्वारे आयोजित पुस्तक लोकार्पण समारोहात व्यक्त केली.

स्थानिक निसर्ग सेवा समितीच्या ऑक्सिजन पार्कमध्ये आयोजित या कार्यक्रमात राहुल राऊत 'सुगतो' लिखित अ कप ऑफ टी आणि आर्कीटेक्ट निखिल अवथनकर लिखित ए स्केचर्स बुक या पुस्तकांचे लोकार्पण अरुणा सबाने यांच्या हस्ते करण्यात आले. समारोहाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कादंबरीकार प्रा. नवनीत देशमुख लाभले होते. मंचावर वृक्षमित्र मुरलीधर बेलखोडे, सार्वजनिक बांधकाम विभागातील उपविभागीय अभियंता महेश मोकलकर, विदर्भ साहित्य संघाचे शाखाध्यक्ष संजय इंगळे तिगावकर, सहसचिव प्रा. पद्?माकर बाविस्कर, लेखकद्वय राहुल राऊत, निखिल अवथनकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

राहुल राऊत यांचे 'द कप ऑफ टी' जपानी तत्वांवर आधारित असले तरी मुळात हे बुद्धाचे तत्वज्ञान आहे. जगण्यामागचा अर्थ कसा शोधावा, हे या पुस्तकातून कळते. हे पुस्तक केवळ वाचण्यासाठी नसून अनुभवण्यासाठी असलेली संहिता आहे. तर, निखिल अवथनकर यांच्या 'अ स्केचर्स बूक'मधील रेषा आपल्याशी हितगुज करीत मनाला अतीव आनंद आणि प्रेरणा देतात. राहुलच्या पुस्तकातील विचार आणि निखिलच्या पुस्तकातील चित्रे माणसाच्या मनावरील ताण नाहीसा करतात, असे गौरवोद्गार दोन्ही पुस्तकांवर भाष्य करताना अरुणा सबाने यांनी काढले.

पुस्तकांबाबत समाज उदासीन झालेला असताना आज युवा लेखक आपले पुस्तक प्रकाशित करीत आहेत, प्रकाशन संस्था चालवीत आहेत, हे चित्रच आशादायी आहे, असे प्रतिपादन प्रा. नवनीत देशमुख यांनी अध्यक्षीय भाषणात केले. यावेळी मुरलीधर बेलखोडे यांनी वृक्ष व पुस्तकांचे मानवी जीवनातील मूल्य आपल्या भाषणातून मांडले. तर, महेश मोकलकर यांनी स्थापत्यकलेतील रेखाटन कौशल्य आणि कल्पकतेवर प्रकाश टाकला. यावेळी निखिल अवथनकर व राहुल राऊत या युवा लेखकांनी ओघवत्या शैलीत संवाद साधत लेखन व पुस्तकनिर्मितीमागील आपली भूमिका स्पष्ट केली.

या समारोहात विदर्भ साहित्य संघाच्या उपाध्यक्षपदी तसेच अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या संमेलन निधी विश्वस्तपदी निवड झाल्याबद्दल अरुणा सबाने यांचा वि.सा. संघाच्या वर्धा शाखेद्वारे सत्कार करण्यात आला.

या लोकार्पण सोहळ्याचे उद्घाटन वृक्षरोपाला जलसिंचन तसेच पुस्तकांच्या मुखपृष्ठ चित्रफलकाचे अनावरण करून करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संजय इंगळे तिगावकर यांनी केले. संचालन मंजुषा ठाकरे चौगावकर यांनी केले. प्रारंभी डॉ. सायली इंगळे लेकरिया यांनी वृक्षगीत सादर केले.

तर आभार प्रा. पद्माकर बाविस्कर यांनी मानले. या आयोजनात वि. सा. संघाच्या कार्यकारिणी सदस्य प्रा. मीनल रोहणकर, डॉ. प्रमोद नारायणे, प्रीती तडस वाडीभस्मे, कविता बेदरकर, नीळकंठ मेहर, डॉ. शोभा बेलखोडे, संगीता इंगळे, जयंत सबाने, संघर्ष डहाके, प्रमोद खोडे, सुनील ढाले, राजेश देशभ्रतार, तथागत रामटेके, शिल्पा राऊत, प्रांजली अवथनकर, रिद्धी राजूरकर, सूरज बोदिले, विठ्ठल गेडाम, पेटकर यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाला साहित्य, कला, पत्रकारिता, पर्यावरण, शिक्षण आदी क्षेत्रातील मान्यवर तसेच विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

# अवैध मोहा दारूसह २.२८ लाखांचा मुद्देमाल जप्त

## सावंगी मेघे पोलिसांची कारवाई



**वर्धा जनमाध्यम :** अवैध दारू वाहतुकीविरोधात सावंगी (मेघे) पोलिसांनी धडक कारवाई करत दोन आरोपींना अटक केली. या कारवाईत गावठी मोहा दारूसह दोन दुचाकी असा एकूण २ लाख २८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सावंगी (मेघे) पोलीस ठाण्याचे पथक परिसरात पेट्रोलिंग करीत असताना मुखबिराकडून माहिती मिळाली की, दोन जण दुचाकीवरून गावठी मोहा दारूची वाहतूक करणार आहेत. त्यानुसार सावंगी मेघे–पालोती मार्गावरील स्कूल ऑफ स्कॉलर्ससमोर नाकाबंदी करण्यात आली. पोलिसांनी संशयित दुचाकी थांबवून तपासणी केली असता आरोपी आर्यन संदीप शंभरकर (रा. पालोती) व जितू मारोती गायकवाड (रा. स्टेशनफैल, वर्धा) यांच्या ताब्यातून प्रत्येकी २० लिटर गावठी मोहा दारू आढळून आली.

या कारवाईत सुझुकी बर्गमन आणि टीव्हीएस रेडॉन या दोन दुचाक्यांसह दारूचा साठा जप्त करण्यात आला. पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, अप्पर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद मकेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज वाघोडे यांच्या पथकाने केली.

# किन्हाळयात शॉर्ट सर्किटमुळे घराला आग; संसारोपयोगी साहित्य जळून खाक

**तळेगाव जनमाध्यम :** आष्टी तालुक्यातील किन्हाळा गावात शॉर्ट सर्किटमुळे लागलेल्या भीषण आगीत एका कुटुंबाचा संसार अक्षरशः राखरांगोळी झाल्याची हृदयद्रावक घटना घडली. काही मिनिटांत आगीने एवढे भीषण रूप धारण केले की, संपूर्ण गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र ग्रामस्थांनी जीवाची पर्वा न करता दाखविलेल्या प्रसंगावधानामुळे मोठा अनर्थ टळला आणि शेजारील घरे आगीच्या विळख्यात जाण्यापासून बचावली.

मिळालेल्या माहितीनुसार, सुनंदा सुधाकर भलावी या नातेवाईकांच्या लग्नकार्याकरिता घराला कुलूप लावून बाहेरगावी गेल्या होत्या. घर बंद असतानाच अचानक घरातून धुराचे लोट बाहेर येऊ लागले. काही क्षणांतच ज्वाळांनी रौद्ररूप धारण करत संपूर्ण घराला वेढा घातला. गावकऱ्यांच्या निदर्शनास ही घटना येताच नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. कुणी बादल्यांनी पाणी आणले, तर कुणी घरातील साहित्य बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. महिलांसह युवकांनीही आग विझविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. ग्रामस्थांच्या अथक प्रयत्नांनंतर आग आटोक्यात आणण्यात यश आले. अन्यथा संपूर्ण वस्ती आगीच्या विळख्यात सापडली असती, अशी भीती व्यक्त केली जात आहे. मात्र तोपर्यंत भलावी कुटुंबाचा संसार पूर्णपणे उद्ध्वस्त झाला होता.

या भीषण आगीत घरातील फ्रीज, टीव्ही, कपडे, रोख रक्कम, सोन्या-चांदीचे दागिने,



दोन पोते गहू, तांदूळ तसेच इतर संसारोपयोगी साहित्य जळून खाक झाले. वर्षानुवर्षे कष्ट करून उभा केलेला संसार काही क्षणांत राखेत परिवर्तित झाल्याने भलावी कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली होती. गावात या घटनेबाबत तीव्र हळहळ व्यक्त होत असून संबंधित कुटुंबाला तातडीने आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. प्रशासनाने पंचनामा करून नुकसानग्रस्त कुटुंबाला मदतीचा हात द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# लग्नघरावर डल्ला टाकणारा चोरटा जेरबंद

## हिंगणघाट पोलिसांची कौशल्यपूर्ण कारवाई ; सोन्या-चांदीसह मुद्देमाल जप्त

**हिंगणघाट जनमाध्यम :** लग्नाच्या गडबडीत घराचा फायदा घेत चोरी करणाऱ्या आरोपीला हिंगणघाट पोलिसांनी अवघ्या काही दिवसांत जेरबंद केले. या कारवाईत सोन्या-चांदीचे दागिने, मोबाईल आणि रोख रक्कम असा २३ हजार ६५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

माता मंदिर वॉर्ड येथील रहिवासी श्रीमती मंगला राजू नरड यांच्या मुलाचे ५ मे रोजी लग्न झाले होते. लग्नासाठी पाहुण्यांची वर्दळ असल्याने घराचा समोरील दरवाजा उघडा ठेवण्यात आला होता. कुटुंबीय अंगणात झोपले असताना अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करून कपाटातील बॅगेत ठेवलेले सोन्या-चांदीचे दागिने आणि नगदी असा ३३ हजार ४०० रुपयांचा ऐवज चोरून नेला होता. याप्रकरणी ७ मे रोजी हिंगणघाट पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली.

ठाणेदार अनिल राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाने तांत्रिक तपास आणि कौशल्यपूर्ण पोलिसी तंत्राचा वापर करून आरोपी यश विठ्ठल ठाकरे (वय २१, रा. संत तुकडोजी वॉर्ड, हिंगणघाट) याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने चोरीची कबुली दिली. आरोपीकडून विवो कंपनीचा मोबाईल, नगदी रक्कम, सोन्याचे दागिने, पांढऱ्या धातूचे जोडवे तसेच गुन्ह्यात वापरलेला सॅमसंग मोबाईल असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर



पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सुशीलकुमार नायक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पुढील तपास हिंगणघाट पोलीस करीत आहेत.

# देवळीत ८८ लाखांच्या प्रस्तावावरून राजकीय स्फोट

## नमो उद्यान की निधीचा खेळ, भाजपा-काँग्रेसचा संताप, नगर परिषदेत आरोपांच्या फैरी

**देवळी । जनमाध्यम**

देवळी नगरपालिकेतील 'नमो उद्यान' प्रकल्पावरून शहराचे राजकारण चांगलेच पेटले असून आधीच विकसित असलेल्या बगीच्यावर तब्बल ८८ लाख रुपये खर्च करण्याच्या प्रस्तावामुळे नगर परिषदेत आरोप-प्रत्यारोपांचा धुरळा उडाला आहे. विकसित बगीचा असताना पुन्हा एवढा निधी कशासाठी असा प्रश्न उपस्थित करत भाजपा तडस गट आणि काँग्रेसच्या नगरसेवकांनी पत्रकार परिषदेत प्रशासन व सत्ताधाऱ्यांवर जोरदार हल्लाबोल केला.प्रभाग क्रमांक २ मधील वर्धा मार्गावरील बालाजीनगर येथे वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान २०२५-२६ अंतर्गत 'नमो उद्यान' विकसित करण्याचा प्रस्ताव नगर परिषद विशेष सभेपुढे ठेवण्यात आला होता. या कामासाठी सर्वात कमी दराच्या निविदेला मंजुरी देण्याचा विषय चर्चेला आला; मात्र सभेतच या प्रस्तावावरून वातावरण तापले. भाजपा आणि काँग्रेसच्या ११ नगरसेवकांनी प्रस्तावाला उघड विरोध दर्शविला, तर काँग्रेसचा एक सदस्य तटस्थ राहिला.

पत्रकार परिषदेत विरोधी नगरसेवकांनी गंभीर आरोप करत म्हटले की, ज्या ठिकाणी आधीच सुविधा असलेला बगीचा तयार आहे, त्याच जागेवर पुन्हा लाखो रुपयांचा खर्च करणे म्हणजे जनतेच्या पैशांची उधळपट्टी आहे. शासनाच्या नियमानुसार अविकसित जागेवर उद्यान उभारणे अपेक्षित असताना प्रशासन विकसित जागेवरच प्रकल्प राबविण्यासाठी आग्रही का आहे, असा प्रश्नही उपस्थित करण्यात आला.देवळी शहरात आधुनिक नमो उद्यान व्हावे, याला आमचा विरोध नाही; पण आधीच सुस्थितीत असलेल्या बगीच्यावर कोट्यवधींचा निधी खर्च करण्यामागे नेमके कोणाचे हितसंबंध आहेत, असा आरोप विरोधी सदस्यांनी केला. बालाजीनगरऐवजी शहरातील इतर अविकसित मोकळ्या जागेवर नमो उद्यान उभारण्यात यावे, अशी मागणी त्यांनी लावून धरली.

गटनेते उमेश कांमडी, नगरसेवक अनिल कारटकर, विजय गोमासे, शिक्षण सभापती शुभांगी कुर्जेकर, मनीषा लोखंडे तसेच काँग्रेसचे नगरसेवक मिलिंद देशमुख यांच्यासह भाजपा आणि काँग्रेसच्या १४ नगरसेवकांनी मुख्याधिकारी नेहा अकोले यांना निवेदन सादर केले. आमचा नमो उद्यानाला विरोध नाही; मात्र विकसित बगीच्यावर निधी खर्च करण्यास विरोध आहे, अशी स्पष्ट भूमिका त्यांनी मांडली.

दरम्यान, या सर्व आरोपांना उत्तर देताना नगर परिषद उपाध्यक्ष राहुल चोपडा यांनी प्रशासनाची बाजू मांडली.

**PUBLIC NOTICE**

I, Mrs. Archana Sunil Rathi, holder of Indian Passport No. P1043621, hereby state that due to an inadvertent error in my passport, my husband's surname has been mentioned as "Bang" instead of the correct surname "Rathi". The correct name of my husband is Mr. Sunil Rathi. The same is correctly recorded in my Aadhaar Card, PAN Card, Marriage Certificate and other official documents."Hence, "Sunil Bang" and "Sunil Rathi" refer to one and the same person. The correct name may kindly be read and treated as Sunil Rathi for all purposes.

# समुद्रपूर नगरपंचायतीमधील एका रिक्त पदासाठी पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर

**वर्धा जनमाध्यम :** नगरपंचायत समुद्रपूर प्रभाग क्रमांक १६ मधील एका रिक्त पदाचा पोटनिवडणूक कार्यक्रम जाहीर झाला आहे. पोटनिवडणूक कार्यक्रम खालील प्रमाणे आहे.

नगरपंचायत समुद्रपूर मधील प्रभाग क्रमांक १६ येथील रिक्त एका जागेसाठी नामनिर्देशन पत्र नगरपंचायत कार्यालय समुद्रपूर येथे दिनांक १८ मे २०२६ ते २५ मे २०२६ या कालावधीत सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत स्वीकारण्यात येणार आहे. दिनांक २३ व २४ मे २०२६ रोजी ( शनिवार व रविवार) या शासकीय सुट्टीच्या दिवशी नामनिर्देशन पत्र स्वीकारण्यात येणार नाही. नामनिर्देशन पत्राची छाननी दिनांक २६ मे २०२६ रोजी सकाळी ११ वाजता पासून करण्यात येईल. वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्याची तारीख २६ मे २०२६ अशी आहे.

उमेदवारी मागे घेण्याची शेवटची तारीख, उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्याची तारीख अपील नसेल तेथे दिनांक २७ मे २०२६ ते २ जून २०२६ असा आहे. दिनांक २८ मे २०२६ (गुरुवार), दिनांक ३० व ३१ मे २०२६ (शनिवार व रविवार) या शासकीय सुट्टीच्या दिवशी नामनिर्देशन पत्रे मागे घेता येणार नाहीत. अपील असल्यास अपिलाचा निर्णय ज्या तारखेस करण्यात येईल त्या तारखेनंतर तिसऱ्या दिवशी किंवा तत्पूर्वी कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११ ते दुपारी ३ कालावधीत. मात्र दिनांक ११ जून २०२६ (गुरुवार) सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत.

निवडणूक चिन्ह नेमून देण्याची तसेच अंतिमरीत्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्याची तारीख अपील नसेल तेथे दिनांक २ जून २०२६ (मंगळवार) रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत आहे. अपील असल्यास ११ जून २०२६ (गुरुवार) रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत आहे. मतदान घेण्याची तारीख २० जून २०२६ (शनिवार) सकाळी ७.३० पासून ते सायंकाळी ५:३० वाजेपर्यंत अशी आहे. मतमोजणी व निकाल तहसील कार्यालय समुद्रपूर येथे २१ जून २०२६ (रविवार) सकाळी १० वाजल्यापासून सुरु होईल. या पोटनिवडणुकीसाठी समुद्रपूरचे तहसीलदार कपिल हाटकर निवडणूक निर्णय अधिकारी असतील तसेच सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून समुद्रपूर नगरपंचायतच्या मुख्याधिकारी पौर्णिमा गावित काम पाहतील, असे जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी कळविले आहे.

**PUBLIC NOTICE**

I, Mr. Sunil Rathi, hereby state that due to an inadvertent error in my wife Mrs. Archana Sunil Rathi's Passport No. P1043621, my surname has been wrongly mentioned as "Bang" instead of the correct surname "Rathi".""My correct name is Sunil Rathi, which is duly recorded in all my official documents as well as in my wife's Aadhaar Card, PAN Card, Marriage Certificate and other related records.""Hence, "Sunil Bang" and "Sunil Rathi" refer to one and the same person. The correct name may kindly be read and treated as Sunil Rathi for all purposes.

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

**चौकशीची जाहीर नोटीस**

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 139/26 कलम-१९

सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **शिव पार्वती चॅरिटेबल ट्रस्ट, पोरगव्हाण, ता.आष्टी जि.वर्धा**

बाबत अर्जदार - **श्री.चंद्रशेखर किसन अडसळ**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, धर्मादाय उपआयुक्त/सहायक धर्मादाय आयुक्त वर्धा विभाग वर्धा हे वर नमुद केलेल्या नोंदणी अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?

(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

(अ) **जंगम मिळकत -** रोख रु.११०००/- जमा आहे

(ब) **स्थावर मिळकत (वर्णन) - काही नाही**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **३०.०४.२०२६** रोजी दिली.

शिक्का

**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

✦ नागपुरात सिंधी समाजासाठी ऐतिहासिक निर्णय ✦ मालकी हक्काच्या पट्ट्यांचे वितरण

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या हस्ते महापौर श्रीचंद तेजवानी यांचा गौरव

**नागपुर/प्रतिनिधीः-** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूर येथे विदर्भ सिंधी विकास परिषदतर्फे आयोजित 'कब्जा धारक - लीज पट्टा (मालकी हक्क) वितरण व नगरसेवकांचा भव्य सत्कार समारंभ' कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती दर्शवली. यावेळी सिंधी समाजाच्या दीर्घकालीन प्रलंबित मागणीला न्याय देत मालकी हक्काच्या पट्ट्यांच्या वितरण प्रक्रियेला गती देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय अधोरेखित करण्यात आला.

कार्यक्रमाला आमदार कुमार आयलानी, मध्य प्रदेशमधील भोपाळ दक्षिण-पश्चिम विधानसभा मतदारसंघाचे आमदार भगवानदास सबनानी, अमरावतीचे महापौर श्रीचंद तेजवानी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अमरावतीचे महापौर श्रीचंद तेजवानी यांचा विशेष सत्कार करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपूर येथे विदर्भ सिंधी विकास परिषद, नागपूरतर्फे आयोजित 'कब्जा धारक - लीज पट्टा (मालकी हक्क) वितरण व नगरसेवकांचा भव्य सत्कार समारंभ' येथे प्रमुख उपस्थिती दर्शवली.


मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, निर्वासित म्हणून भारतात दाखल झालेल्या सिंधी समाजाने शून्यापासून सुरुवात केली. हाच समाज आज देशाच्या व्यापार क्षेत्रासह सर्वच क्षेत्रामध्ये आघाडीवर असून देशाच्या विकासात मोलाचे योगदान देत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात सिंधी बांधवांना नागरिकत्व प्रदान करण्याचे अभियान देशभर राबवले गेले. सिंधी बांधव वास्तव्यास असलेल्या जमिनी अतिक्रमण म्हणून गणल्या जात होत्या. त्यामुळे सिंधी बांधवांना मालकी पट्टे मिळावे, अशी मागणी सुरू होती. संधी मिळताच आम्ही या प्रश्नावर तोडगा काढला आणि सिंधी बांधवांना वर्ग एकच्या शंभर टक्के मालकी हक्काचे पट्टे देण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे मोठ्या प्रमाणात सिंधी बांधवांना मालकी हक्काचे पट्टे मिळण्याचा मार्ग मोकळा झाला. आगामी काळातही अत्यंत वेगाने या निर्णयाची अंमलबजावणी केली जाईल. तसेच उल्हासनगर येथील सिंधी बांधवांसाठी



वेगळ्या पद्धतीने नियमितीकरण करण्याचा निर्णय घेतला जाईल असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नमूद केले. महापौर श्रीचंद तेजवानी यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना सांगितले की, आजचा हा क्षण माझ्यासाठी अत्यंत अभिमानास्पद आणि भावनिक आहे. विदर्भ सिंधी विकास परिषद, नागपूरतर्फे आयोजित या भव्य कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सत्कार होणे, ही माझ्यासाठीच नव्हे तर संपूर्ण सिंधी समाजासाठी गौरवाची बाब आहे. सिंधी समाजाने देशाच्या विकासात नेहमीच सकारात्मक योगदान दिले आहे. फाळणीनंतर अत्यंत कठीण परिस्थितीत भारतात आलेल्या आपल्या समाजाने मेहनत, प्रामाणिकपणा आणि उद्योजकतेच्या बळावर स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले. आज शासनाने मालकी हक्काच्या पट्ट्यांबाबत घेतलेला ऐतिहासिक निर्णय हा सिंधी समाजाच्या अनेक वर्षांच्या संघर्षाला मिळालेला न्याय आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सिंधी बांधवांच्या प्रश्नांना संवेदनशीलतेने हाताळत मालकी हक्काचा मार्ग मोकळा केला, यासाठी संपूर्ण समाज त्यांच्या प्रति कृतज्ञ आहे. हा निर्णय हजारो कुटुंबांना स्थैर्य, सुरक्षितता आणि आत्मविश्वास देणारा ठरणार आहे. यावेळी महापौर श्रीचंद तेजवानी यांनी विदर्भ सिंधी विकास परिषद, नागपूरचे आयोजक, उपस्थित मान्यवर आणि सर्व समाजबांधवांचे मनःपूर्वक आभार मानले.

## नववधू मुलीची काढली गावभर मिरवणूक
### मुलगा-मुलगी भेदभाव न करण्याचा दिला संदेश

**आसेगाव पूर्णा/प्रतिनिधीः-** लग्न म्हटले की, डीजेच्या तालावर वाजतगाजत घोड्यावरून निघालेली नवरदेवाची मिरवणूक सर्वांचेच लक्ष वेधून घेते. ही प्रथा सर्वत्र रूढ आहे. मिरवणुकीच्या वेळी नवरदेवाला बसायला घोडा मिळाला नाही तर, रुसवे, फुगवे पाहावयास मिळतात. जणू वरानेच घोड्यावर बसण्याचा ठेका घेतलाय. ही मक्तेदारी मोडीत काढत शेतकरी कुटुंबाने आपल्या नवरी मुलीची चक्क मिरवणूक बगीत काढल्याचे आसेगाव पूर्णा येथे पहावयास मिळाले. येथील गजाननराव सरकटे यांची मुलगी नववधू दामिनी हिची गावातून बगीत बसून वाजत-गाजत मिरवणूक काढली. मुला समान मुलगीही असते, भेदभाव न करता या कृतीतून सरकटे परिवाराने समाजाला दाखविलेय. दामिनी चा विवाह नुकताच कसबे गव्हाण येथील रोहित थोरात यांचेशी दिनांक ११ मे रोजी थाटामाटात पार पडला. तत्पूर्वी दि.१० मे रोजी वधू दामिनीची बगीत बसून गावातून डीजे च्या तालावर तसेच फटाक्यांच्या आतषबाजीत मिरवणूक काढण्यात आली होती. सरकटे परिवाराने हा विवाह अनोख्या पद्धतीने करून समाजापुढे आदर्श ठेवला. समाजाला स्त्री-पुरुष समानतेचा संदेशही यातून दिला. तसेच आसेगाव पूर्णा तथा पंचक्रोशीतील ही प्रथमच वधू ची मिरवणुक काढल्याने चर्चेचा विषय ठरला आहे.



## सोमनाथ मंदिर भारताच्या अविनाशी आत्म्याचे प्रतीक-राज्यपाल जिष्णु देव वर्मा

**मुंबई/प्रतिनिधी :** सोमनाथ मंदिर हे केवळ एक मंदिर नसून भारतीय संस्कृती, श्रद्धा आणि सनातन परंपरेच्या अविनाशी आत्म्याचे प्रतीक आहे. हजारो वर्षांच्या आक्रमणांनंतरही सोमनाथ मंदिर आजही दिमाखात उभे आहे, हीच भारताच्या सनातन शक्तीची साक्ष आहे, असे प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले.



गुजरात येथील सोमनाथ मंदिरांच्या पुनर्बांधणीस ७५ वर्षे पूर्ण झाली असल्याने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ११ मे रोजी प्रभास पाटण येथे विशेष महापूजेचे आयोजन करण्यात आले होते. याच अनुषंगाने भारतीय संस्कृती, श्रद्धा आणि परंपरेचा जागर घडवणारा सांस्कृतिक सोहळा सोमनाथ स्वाभिमान पर्व अतूट आस्थेचे १००० वर्ष या विशेष भक्तिपूर्ण कार्यक्रमाचे सांस्कृतिक कार्य विभागामार्फत श्री धाकलेश्वर महादेव मंदिर, मुंबई येथे आयोजन करण्यात आले. यावेळी राज्यपाल जिष्णु देव वर्मा बोलत होते. यावेळी इलेक्ट्रॉनिक, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता तथा सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार, राज्यपाल यांचे सचिव डॉ.प्रशांत नारनवरे, सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ.किरण कुलकर्णी, सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक श्रीराम पांडे, मंदिराचे व्यवस्थापकीय विश्वस्त अशोक भन्साळे यांनीही महादेवाचे दर्शन घेतले. यानंतर मान्यवरांनी सोमनाथ स्वाभिमान पर्व प्रदर्शनालाही भेट दिली.सोमनाथ मंदिराच्या पुनर्स्थापनेच्या ७५ वर्षानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांना संबोधित करताना राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी सोमनाथ मंदिराच्या ऐतिहासिक, आध्यात्मिक आणि सांस्कृतिक महत्वावर प्रकाश टाकला. महमूद गझनीपासून औरंगजेबापर्यंत अनेक परकीय आक्रमकांनी मंदिर उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न केला, मात्र मंदिराचे अस्तित्व आणि त्यामागील श्रद्धा कधीही नष्ट होउ शकली नाही, असे त्यांनी सांगितले. भारत हा केवळ भौगोलिक देश नसून तर तो एक चिरंतन संस्कृती आहे. विविध मंदिरे, साधू-संत आणि सनातन परंपरेमुळे भारताचा आत्मा आजही जिवंत आहे. सनातन म्हणजे ज्याचा अंत नाही आणि सोमनाथ मंदिर हे त्याचे जिवंत उदाहरण आहे, असेही त्यांनी यावेळी नमूद केले. कार्यक्रमाची सुरुवात प्रसिद्ध ओडिसी नृत्यांगना शुभदा वराडकर यांच्या नृत्याविष्काराने झाली. भारतीय संस्कृती, अध्यात्म आणि परंपरेचा समृद्ध आविष्कार त्यांच्या सादरीकरणातून अनुभवायला मिळाला. सादर झालेल्या नृत्याविष्काराला उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

## विदर्भ भाजतोय! अकोला 45 अंशांवर
### आता तापमान 46 अंश सेल्सिअस पार जाणार?

**नागपूर/प्रतिनिधी :** राज्यात पुन्हा एकदा कमाल तापमानाचा पारा उंचावला आहे. विदर्भातील अकोला जिल्ह्यात ४५ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद करण्यात आली. राज्यातील बहूतांश भागातील शहरांमध्ये कमाल तापमान ४४ अंशापर्यंत पोहोचले. दरम्यान, हवामान खात्याने पुढील चार दिवस उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे.

**तापमानात पुन्हा एकदा वाढ-** वादळाच्या स्थितीमुळे राज्यातील बहूतांश भागात गेले काही दिवस पावसाळी वातावरण होते. त्यामुळे उष्णतेच्या लाटेपासून काही प्रमाणात नागरिकांना दिलासा मिळाला होता. मात्र, आता पुन्हा एकदा तापमानात वाढ झाली आहे. भारतीय हवामान खात्यानेच पुढील चार दिवस तीव्र उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे. त्यामुळे नागरिकांना आता तीव्र उष्णतेचा सामना करावा लागणार आहे. सोमवारी राज्यातील बहूतांश भागात तापमान ४२ ते ४५ अंश सेल्सिअसदरम्यान नोंदवले गेले. सर्वाधिक तापमानाची नोंद करणा-या अकोला जिल्ह्यात कमाला तापमानाचा पारा ४५ अंशाला टेकला. तर अमरावती येथेही ४४ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. जळगाव येथेही ४४.३ अंश सेल्सिअस तापमान नोंदवले गेले. गुजरात आणि राजस्थानमध्ये उष्णतेची लाट असतानाच आता महाराष्ट्रातही ही लाट आली आहे. विदर्भासह मध्य महाराष्ट्र, मराठवाडा या भागात कमाल तापमानाचा पारा झपाट्याने वर जात आहे. राज्यातील वादळाचा प्रभाव आता कमी झाला आहे. त्यामुळे राज्यात पुन्हा एकदा उष्णतेचा तडाखा वाढताना दिसून येत आहे. राज्यातील हवामान पुढील काही दिवस कोरडेच राहणार असल्याने या दिवसात उष्णतेची लाट मात्र तीव्र होईल.

## राज्यात अवकाळी पावसाचे संकट

**पुणे :** राज्यात सध्या हवामानाचा विचित्र खेळ सुरू असून नागरिकांसह शेतकरीही मोठ्या चिंतेत सापडले आहेत. एका बाजूला कडक उन्हामुळे तापमानाचा पारा ४० अंशांच्या पुढे पोहोचला आहे, तर दुस-या बाजूला अवकाळी पावसाने अनेक भागांना अक्षरशः झोडपून काढले आहे.गेल्या काही दिवसांपासून राज्यात सतत हवामान बदलताना दिसत आहे. एप्रिल महिन्यापासूनच अनेक भागांमध्ये अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह जोरदार पाउस झाला, तर काही भागात उष्णतेने कहर केला. कोकणात दमट आणि उकाड्याचे वातावरण कायम राहणार असल्याचा अंदाज आहे. दुसरीकडे विदर्भ आणि मराठवाड्यात पाउस आणि वेगवान वा-यांचा इशारा देण्यात आला आहे. या बदलत्या वातावरणामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून शेतक-यांच्या अडचणीतही मोठी भर पडली आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये तापमानाने उच्चांक गाठला आहे. जळगाव येथे राज्यातील सर्वाधिक ४२.५ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. अकोला आणि मालेगावमध्येही तापमान ४२ अंशांच्या घरात पोहोचले आहे. जळगावच्या चाळीसगाव तालुक्यात काही दिवस तापमानात घट झाली होती, मात्र पुन्हा उष्णतेची लाट वाढली आहे. वाढत्या उकाड्यामुळे दुपारच्या वेळेत रस्त्यांवर शुकशुकाट दिसत आहे.

## भारताचा प्राचीन ज्ञानवारसा आता डिजिटल स्वरूपात

✦'ज्ञानभारतम' मोहिमेचा देशभरात शुभारंभ ! ✦विभागीय आयुक्तांकडून नागरिकांना सहभागाचे आवाहन

**अमरावती/प्रतिनिधीः-** भारताचा समृद्ध आणि मौल्यवान हस्तलिखितांचा वारसा जतन करण्यासाठी केंद्र शासनाच्या संस्कृती मंत्रालयाच्या वतीने 'ज्ञानभारतम' ही महत्त्वाकांक्षी मोहिम राबविण्यात येत आहे. या मोहिमेंतर्गत देशभरातून एक कोटीहून अधिक हस्तलिखितांचा शोध व नोंदणी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून या महत्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत देशव्यापी हस्तलिखित सर्वेक्षण मोहिमेला १६ मार्च पासून सुरुवात झाली आहे. या मोहिमेत अमरावती विभागातील नागरिकांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी केले आहे.



■ जिल्हानिहाय समन्वयकांची नेमणूक ■ 'ज्ञानभारतम' मोबाईल ॲप

भारताला हस्तलिखितांचा मोठा वारसा लाभलेला आहे. ही हस्तलिखिते विविध ठिकाणी विखुरलेल्या स्वरूपात आहेत. हे सर्व ज्ञानभंडार एकत्र करून एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या अंतर्गत हस्तलिखितांचे सर्वेक्षण, दस्तऐवजीकरण, संवर्धन, डिजिटायझेशन व प्रसार केला जाणार आहे. यात हस्तलिखितांचा 'राष्ट्रीय डिजिटल संग्रह' (National Digital Repository) तयार करण्यात येणार असून तो राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उपलब्ध करुन दिला जाणार आहे. या प्रक्रियेत हस्तलिखितांची मालकी ही मूळ संस्था, ग्रंथालय किंवा खासगी संग्राहक यांच्याकडेच राहणार आहे. मात्र, स्वखुशीने ही हस्तलिखिते शासनाकडे सुपूर्द करायची असल्यास शासन स्विकारणार आहे.

या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यातील विविध सांस्कृतिक संस्था, विद्यापीठे, संशोधन संस्था, हस्तलिखित संग्रहालये तसेच विद्वान आदींच्या सहकार्याने ही मोहीम राबवली जाणार आहे. प्रकल्पासाठी राज्याची नोडल संस्था म्हणून पुराभिलेख संचालनालयाची नियुक्ती करण्यात आली असून कवि कालिदास संस्कृत विद्यापीठ नागपूरला क्लस्टर केंद्र म्हणून कार्यरत राहणार आहे. या केंद्राचे डॉ. राजेंद्र जैन (मो.९३७२०७१२९२) यांची समन्वय अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

या सर्वेक्षणासाठी 'ग्यान भारतम' (Gyan Bharatam) हे विशेष मोबाईल ॲप विकसित करण्यात आले आहे. त्याद्वारे हस्तलिखितांचे मूल्यांकन, पडताळणी व दस्तऐवजीकरण केले जाणार आहे. या मोहिमेच्या अनुषंगाने अमरावती विभागातील सर्व जिल्हाधिकारी यांच्याव्दारे संबंधित जिल्ह्यासाठी निवासी उपजिल्हाधिकारी यांची ज्ञानभारतम प्रकल्प जिल्हा नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. संबंधित जिल्हा नोडल अधिकारी आणि जिल्हास्तरीय समितीच्या माध्यमातून विविध मंदिरे, मठ, धार्मिक संस्था, विद्यापीठे, ग्रंथालये, शैक्षणिक संस्था व खासगी संग्राहकांना या मोहिमेत जोडून घेतले जात आहे. या मोहिमेत विद्यार्थी, संशोधक, पारंपरिक पंडित, एनसीसी आणि एनएसएसच्या स्वयंसेवकांचा सक्रिय सहभाग राहणार आहे.

ज्ञानभारतम् मोहिमेकरीता जिल्हानिहाय नेमणूक केलेल्या नागपूरच्या दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र आणि भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाचे अधिकाऱ्यांची यादी व संपर्क क्रमांक पुढीलप्रमाणे : अमरावती व अकोला जिल्ह्याकरीता दीपक पाटील (मो.९४२३१०२०५१) व डॉ. प्रशांत सोनवणे (मो.८६००७५१८९७), वाशिम जिल्ह्यासाठी गजानन शेळके (मो.७७६७८०२२६३) व श्याम बोरकर (मो.९४०५५००८१२), बुलडाणाकरीता गजानन शेळके व डॉ. प्रशांत सोनवणे तर यवतमाळ जिल्ह्यासाठी गीता सानगरवार (मो.९३७०१५०९११) व श्याम बोरकर आदी अधिकारी समन्वयक म्हणून काम पाहतील.

नागरिकांकडे अथवा संस्था, मंदिरे, ग्रंथालये किंवा खासगी संग्रहात जुनी हस्तलिखिते उपलब्ध असल्यास, त्याची माहिती 'ग्यान भारतम' या मोबाईल ॲपवर अपलोड करावीत. या अमूल्य ज्ञानवारशाचे जतन करण्याच्या कार्यात नागरिक, संस्था आणि संशोधकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन विभागीय आयुक्तालयातर्फे करण्यात आले आहे.

## सार्वजनिक-खाजगी भागीदारी तत्त्वावर ST ऊभारणार 200 चार्जिंग स्टेशन
### मंत्री प्रताप सरनाईक

**मुंबई/प्रतिनिधी :** सन २०३५ पर्यंत एसटी महामंडळातील सर्व बसेस ई-बसेसमध्ये रूपांतरित करण्याच्या दृष्टीने राज्य शासन आणि एसटी महामंडळाकडून वेगाने प्रयत्न सुरू आहेत. या अनुषंगाने आवश्यक असलेल्या चार्जिंग सुविधांची उभारणी करण्यासाठी सार्वजनिक-खाजगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर राज्यभरात किमान २०० चार्जिंग स्टेशन उभारण्यात येणार असून, यासाठी लवकरच निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. मंत्रालयातील आपल्या दालनात आयोजित एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिका-यांच्या बैठकीत ते बोलत होते.



मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, सन २०३५ पर्यंत एसटीच्या सर्व बसेस ई-बसेस करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. त्या दृष्टीने भविष्यात सुमारे २० हजार ई-बसेससाठी आवश्यक चार्जिंग स्टेशन उभारणे ही काळाची गरज आहे. राज्यभरातील एसटी महामंडळाच्या उपलब्ध जागांवर नियोजित चार्जिंग स्टेशन उभारण्यासाठी ठराविक क्षेत्र संबंधित विकासकाला देण्यात येईल. त्या ठिकाणी विकासकाकडून आधुनिक चार्जिंग स्टेशन उभारण्यात येतील, जिथे एसटीच्या ई-बसेस चार्ज केल्या जातील. यासोबतच सुमारे १५०० चौरस फूट जागा संबंधित विकासकाला भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देण्यात येणार असून, इतर वेळेत त्या चार्जिंग स्टेशनवर खाजगी वाहनांनाही चार्जिंग सुविधा देण्यास परवानगी असेल. त्यामुळे एसटी महामंडळाला माफक दरात ई-बसेस चार्जिंगची सुविधा उपलब्ध होईल. तसेच विकासकाने वापरलेल्या जागेचे भाडे आणि खाजगी वाहनांच्या चार्जिंगमधून मिळणा-या नफ्यातील ठराविक हिस्सा महसूल स्वरूपात एसटी महामंडळाला प्राप्त होणार आहे. दरम्यान, या स्वरूपाचा सार्वजनिक-खाजगी भागीदारीतील प्रकल्प उभारण्यात येणार असून, त्याची निविदा प्रक्रिया येत्या काही दिवसांत सुरू करण्यात येईल. त्यामुळे भविष्यात पर्यावरणपूरक ई-बसेसच्या दृष्टीने एसटी महामंडळ स्वयंपूर्ण होईल, असा विश्वासही मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला.

## मिलिंद म्हैसकर आणि मनीषा म्हैसकर यांनी केली स्व-गणना

**मुंबई, दि. ११ :** जनगणना २०२७ च्या स्व-गणना प्रक्रियेत (वने व भूसंपादन) महसूल व वन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर आणि गृह विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव मनीषा म्हैसकर यांनी आपली माहिती संगणकाद्वारे (एसई) पोर्टलवर नोंदविली.मंत्रालयातील दालनात यावेळी भारत सरकारच्या सहसचिव तथा राज्याच्या मुख्य प्रधान जनगणना अधिकारी डॉ. निरुपमा जे. डांगे, जनगणना कार्य संचालनालयाचे सहसंचालक संतोष पायस उपस्थित होते. यावेळी डॉ. निरुपमा जे. डांगे यांच्या हस्ते मिलिंद म्हैसकर यांना स्मृतीचिन्ह देण्यात आले.भारतीय जनगणनेच्या इतिहासात प्रथमच, देशातील प्रत्येक व्यक्तीला स्व-गणनेचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे. स्व-गणना ही जनगणनेतील अशी प्रक्रिया आहे, ज्यात व्यक्ती जनगणनेची माहिती वेब पोर्टलद्वारे नोंदवितात. महाराष्ट्र राज्यासाठी स्व-गणना (एसई) पोर्टल १ मे २०२६ ते १५ मे २०२६ पर्यंत कार्यरत राहील.जनगणना प्रगणक जेव्हा घरी भेट देतील, तेव्हा स्व-गणनेद्वारे नोंदविलेल्या माहितीची पडताळणी, पुष्टीकरण आणि अंतिम सादरीकरणासाठी त्यांना स्व-गणना आयडी (एसई आयडी) देणे आवश्यक असेल.राज्यातील प्रत्येक व्यक्तीने ही जबाबदारी स्वीकारून मोठ्या संख्येने स्व-गणना सुविधेचा पर्याय निवडण्याचे आवाहन मिलिंद म्हैसकर आणि मनीषा म्हैसकर यांनी केले, जेणेकरून कुटुंबांची नोंद अचूकता आणि कार्यक्षमतेने होईल.राज्यातील जास्तीत जास्त व्यक्तींनी आपल्या कुटुंबाची माहिती जनगणना २०२७ च्या घरयादी व घरगणनेतील स्व-गणना प्रक्रियेत एसई पोर्टलवर नोंदवून जनगणनेच्या देशव्यापी स्व-गणना प्रक्रियेत सहभागी होण्याचे आवाहन डॉ. निरुपमा जे. डांगे यांनी यावेळी केले.



## महालक्ष्मी सरस 2026 ला नागरिकांचा ऊत्स्फूर्त प्रतिसाद

**मुंबई,दि.११ :** महालक्ष्मी सरस २०२६ प्रदर्शनाला नागरिकांकडून मोठा प्रतिसाद मिळत असून, २ मे पासून सुरू झालेल्या या प्रदर्शनात महिला बचतगटाच्या उत्पादनांची विक्रमी विक्री होत असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचे मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश सागर आणि परिचालन अधिकारी निखिलकुमार ओसवाल यांनी दिली. ग्रामविकास व पंचायत राज विभाग आणि उमेद- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांच्या माध्यमातून ग्रामीण महिला बचतगटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंच्या विक्रीकरीता राज्यस्तरीय महालक्ष्मी सरस प्रदर्शनाचे आयोजन महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) मैदान, प्लॉट नं. जी-टेक्स्ट ब्लॉक १ ते ४, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पू.), मुंबई येथे करण्यात आले आहे. यंदाच्या महालक्ष्मी सरसमध्ये ५३५ उत्पादक स्टॉल्स आणि ८० खाद्यपदार्थ स्टॉल्स सहभागी झाले आहेत. उत्पादनांची गुणवत्ता, पॅकेजिंग आणि नावीन्य लक्षात घेउन सहभागींची निवड करण्यात आली आहे. नवोदित महिलांनाही मोठ्या प्रमाणावर संधी देण्यात आली आहे. नागरिकांसाठी बस सेवा, घरपोच सेवा तसेच दिव्यांगांसाठी विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. याआधी नागपूर येथे झालेल्या प्रदर्शनामध्ये १६ कोटी रुपयांचा व्यवसाय झाला होता, तर वाशी येथे २२ कोटी रुपयांची उलाढाल झाली. मुंबईतील महालक्ष्मी सरस २०२६ पहिल्या सप्ताहात १५ कोटी रुपयांचा व्यवसाय झाला असून, यंदा ४० कोटी रुपयांपर्यंत उलाढाल होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

## राज्य कामगार विमा योजनेच्या सेवा अधिक सक्षम करा
### आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यतील कामगारांना अधिक दर्जेदार आणि सुलभ आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य कामगार विमा योजनेची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक असल्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी सांगितले.

निर्मल भवन येथील एमएसआरडीसी कार्यालयात आयोजित बैठकीत त्यांनी राज्य कामगार विमा योजनेचा सविस्तर आढावा घेतला. बैठकीत योजनेअंतर्गत नोंदणीकृत सदस्यांची संख्या, सदस्यांकडून प्राप्त होणारी वर्गणी, विमा योजनेअंतर्गत कार्यरत असलेले दवाखाने, नवीन दवाखाने सुरू करण्याबाबतची स्थिती तसेच राज्यातील कामगारांना उपलब्ध करून देण्यात येणा-या खाटांची माहिती याबाबत सखोल चर्चा करण्यात आली.

सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री साकोरे-बोर्डीकर यांनी कामगारांना आरोग्य सुविधा वेळेत आणि गुणवत्तापूर्ण मिळणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगून, विमा योजनेअंतर्गत सुरू असलेल्या रुग्णालये व दवाखान्यांची कार्यक्षमता वाढविण्याचे निर्देश दिले. औद्योगिक क्षेत्रांमध्ये वाढत्या गरजा लक्षात घेउन नवीन दवाखाने सुरू करण्याच्या प्रस्तावांवरही यावेळी चर्चा झाली. कामगार विमा योजनेअंतर्गत उपलब्ध असलेल्या रुग्णखाटा, उपचार सुविधा, वैद्यकीय मनुष्यबळ आणि औषध उपलब्धता याबाबतही यावेळी आढावा घेण्यात आला. कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांना उपचारासाठी कोणत्याही प्रकारची अडचण येउ नये, यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश त्यांनी दिले. बैठकीस संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## ‘विजय’ पर्व

तामिळनाडूच्या राजकारणात एक ऐतिहासिक आणि युगांतरकारी बदल घडला आहे. प्रसिद्ध अभिनेते सी. जोसेफ विजय यांनी तामिळनाडूचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. त्यांच्या या विजयामुळे १९६७ पासून सुरू असलेली द्रमुक आणि अण्णा द्रमुक या दोन प्रमुख द्रविड पक्षांची मक्तेदारी संपुष्टात आली. तामिळनाडूत ही नवी पहाट आहे असे म्हणता येईल. अभिनेता राजकारणी विजय याने निवडणुकोत्तर आघाडी करून सत्ता हस्तगत केली आहे आणि त्याला पाठिंबा दिला आहे तो (सीपीआय) भारतीय कम्युनिस्ट पक्ष, (सीपीआयएम) भारतीय कम्युनिस्ट पक्ष मार्क्सवादी (व्हीसीके) विदुथलाई चिरुथाईगल काची या पक्षांनी. तामिळनाडू विधानसभेत विजय यांचा पक्ष १०८ जागा घेऊन सर्वात मोठा पक्ष म्हणून सत्तेत आला होता. बहुमतासाठी त्यांना ११८ जागांची आवश्यकता होती. ती लहान लहान पक्षांनी भरून काढली आणि विजय मुख्यमंत्रीपदी विराजमान झाले. काँग्रेसनेही विजय यांना पाठिंबा दिला. काँग्रेसने विजय यांना पाठिंबा दिला म्हणून द्रमुक पक्ष इतका संतप्त झाला, की त्यांच्या नेत्या कनिमोळी यांनी काँग्रेसला आमच्या शेजारी लोकसभेत जागा नको म्हणून सभापती ओम बिर्ला यांना पत्रही लिहिले. विजय यांनी आपल्या लोकप्रियतेचे रूपांतर मतदानात करून तामिळनाडूच्या राजकारणाला एक नवीन दिशा दिली, जिथे तरुण आणि महिला मतदारांनी बदल घडवून आणला. प्रस्थापित राजकीय व्यवस्था जी की द्रमुक आणि अण्णा द्रमुक पक्षांचीच जहागीर समजली जायची ती विजय यांच्यामुळे मोडीत निघाली आणि आता राज्य नव्या मार्गावर निघाले. विजय यांचा तामिळनाडूच्या राजकारणातील उदय खरोखरच मॅटिनी आयडॉल एम. जी. रामचंद्रन यांच्या ऐतिहासिक उदयाशी तुल्यबळ मानला जात आहे. १९७७ पासून त्यांनी प्रवास सुरू केला तो त्यांच्या निधनापर्यंत कायम राहिला. विजय यांनी आपली प्रतिमा काळजीपूर्वक सुधारली आणि सहसा चित्रपट अभिनेत्यांबद्दल जी सर्वसाधारण प्रतिमा असते त्यापासून विजय यांची प्रतिमा दूर आहे. तामिळनाडू हे भारतीय चित्रपटसृष्टीतील स्टार्सबद्दलच्या वेडाचे आणि भक्तीचे केंद्रस्थान मानले जाते. इथे नायक आणि नायिकांचे पुतळे तसेच मंदिर बांधली आहेत. तामिळनाडूच्या राजकारणात चित्रपटातील ‘रील’ प्रतिमा आणि ‘रिअल’ जीवन यातील रेषा खूप पुसट आहे, हेच विजय यांचे सर्वात मोठे बलस्थान आणि आव्हानही आहे. विजय यांनी सरकार स्थापन केले ही त्यांची असिड टेस्ट आहे, तामिळनाडूच्या राजकीय पटलावर एका अभिनेत्याकडून राजकारणी बनलेला नेता म्हणून विजय यांच्यासाठीच नव्हे, तर तमिळ जनतेसाठीही ही मोठी परीक्षा आहे. तामिळनाडूच्या राजकारणात गेल्या अनेक दशकांपासून द्रमुक आणि अण्णाद्रमुक या दोन द्रविडी पक्षांची मक्तेदारी होती, जिथे राजकारणाकडे एक ‘पूर्णवेळ व्यवसाय’ म्हणून पाहिले जात होते. मात्र, मे २०२६च्या विधानसभा निवडणुकीत सुपरस्टार विजय यांच्या ‘तमिळगा वेत्री कळघम’ पक्षाने ऐतिहासिक मुसंडी मारत हा समज मोडीत काढला. विजय आणि त्यांच्या टीममधील अनेकांना थेट प्रशासकीय अनुभव नाही. पारंपारिक राजकारणी (द्रमुक/अण्णाद्रमुक) हे वर्षानुवर्षे सत्तेत राहिल्यामुळे प्रशासकीय यंत्रणा चालवण्यात तरबेज आहेत. नवीन लोकांसाठी धोरणात्मक निर्णय घेणे हे सुरुवातीला एक मोठे आव्हान असू शकते. सत्ता, प्रभाव आणि संपत्तीचे केंद्रीकरण हा तमिळनाडूतील द्रमुक आणि अण्णाद्रमुक यांच्यावरील मुख्य आरोप राहिला आहे. जनता, विशेषतः तरुण पिढी, आता अशा नेत्याच्या शोधात आहे जो या भ्रष्ट व्यवस्थेला बदलेल. विजय यांच्याकडून अपेक्षा ही आहे, की ते ‘सिस्टीम’ मध्ये बदल घडवून आणतील, ना की जुन्या पक्षांप्रमाणेच काम करतील. विजय मुख्यमंत्री होणे अनेक दृष्टीनी अभिनव ठरते. त्यांच्या नेतृत्वात अनेक नवे चेहरे आणि तरुणांचा लक्षणीय सहभाग दिसतो. राजकारणात पारदर्शकता आणि भ्रष्टाचारमुक्त प्रशासन ही आजच्या तरुणांची प्रमुख अपेक्षा आहे. विशेषतः जनरेशन झेड प्रशासनाने समाजकेंद्रित भूमिका घ्यावी, अशी मागणी आहे. मात्र, या अपेक्षा विजय हे कितपत पूर्ण करू शकतील, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. विजय यांच्यासमोरची आव्हाने गंभीर आहेत. द्रमुक, अण्णा द्रमुक आणि भाजप यांसारखे पक्ष तामिळनाडूच्या राजकारणात खोलवर रुजलेले आहे. मात्र विजय यांच्याकडे एक महत्त्वाची जमेची बाजू आहे. लोक नवीन नेतृत्वाला सुरुवातीला काही प्रमाणात संधी आणि समजून घेण्याची तयारी दाखवतात. त्यासाठी विजय यांनी स्वतःची प्रशासकीय क्षमता, राजकीय परिपक्वता आणि संयमी व सकारात्मक वर्तन सिद्ध करणे आवश्यक आहे. हे साध्य झाले, तर विजय यांचे सरकारही तामिळनाडूत प्रभावीपणे राज्य करू शकते. विजय यांच्या सरकारला इतर लहान पक्षांनी पाठिंबा देण्यामागे एक महत्त्वाचे कारण म्हणजे राज्यात पुन्हा राष्ट्रपती राजवट लागू होऊ नये, हे होते. तसेच सीपीआय आणि सीपीएम या पक्षांनीही ही भूमिका स्पष्टपणे मांडली होती. मात्र यापेक्षाही महत्त्वाचे कारण असे होते की तामिळनाडूतील जनतेला द्रमुक आणि अण्णाद्रमुक यांच्या आलटून-पालटून चालणाऱ्या राजकारणाचा कंटाळा आला होता. लोकांना एक नवा आणि सक्षम पर्याय हवा होता आणि तो त्यांना विजय यांच्या रूपाने दिसला. त्यामुळे जनतेने त्यांना बहुमताच्या जवळ पोहोचवले. लोकांना जेव्हा विश्वासार्ह आणि प्रभावी पर्याय मिळतो, तेव्हा ते जुन्या पक्षांना नाकारतात, हे भारतीय राजकारणात अनेकदा दिसले. नरेंद्र मोदी यांच्या उदयाच्या वेळीही असेच चित्र होते. काँग्रेसच्या कारकिर्दीत भ्रष्टाचार आणि प्रशासकीय अनागोंदीच्या पार्श्वभूमीवर लोकांनी मोदी यांच्या नेतृत्वाला पर्याय म्हणून स्वीकारले. तथापि राजकारणाचा स्थायीभाव हा बदल असतो. बदल स्वीकारला नाही, तर द्रमुक आणि अण्णाद्रमुकसारखी अवस्था होण्यास वेळ लागत नाही. द्रमुक आणि अण्णाद्रमुक यांच्या बाबतीत तेच झाले. विजय यांच्या पक्षाचीही भविष्यात अशी अवस्था होऊ नये, असे वाटत असेल तर त्यांनी आतापासूनच आपल्या पक्षात नव्या लोकांना आणि नव्या विचारांना संधी दिली पाहिजे. कारण बदल हाच राजकारणाचा शाश्वत नियम आहे आणि त्याकडे कोणताही राजकीय पक्ष दुर्लक्ष करू शकत नाही.



# तामिळनाडूचा थलैवा

**देशातील इतर राज्यांपेक्षा तामिळनाडूतील जनतेचा निकाल वेगळाच असतो. आताची विधानसभा निवडणूकही त्याला अपवाद ठरली नाही. तामिळनाडूने विजय या पडद्यावरच्या नायकाला आपला नेता म्हणून निवडले आहे. आता प्रत्यक्षाहून प्रतिमा उत्कट होते की प्रतिमा हेच प्रत्यक्ष आहे, हे यथावकाश कळेल.**

टाईम टू लीड... जोसेफ विजय चंद्रशेखर या नायकाने खरे तर हा नारा २०१३मध्येच दिला होता.तो तामिळनाडूच्या तत्कालीन मुख्यमंत्री जे. जयललिता यांना अचूक कळला होता.जयललिता कमालीच्या लोकप्रिय होत्या. रजतपटावरून प्रत्यक्षात नायक होता येते, राज्याला नेतृत्व बहाल करता येते, हे त्यांना स्वतःच्या, त्यांचे गुरू एम. जी. रामचंद्रन यांच्या उदाहरणावरून अचूक माहीत असल्याने त्या विजय यांच्याबाबत कमालीच्या सावध झाल्या असाव्यात. ‘थलैवा’ विजय याने काढलेला सिनेमा होता. तो रीलिज झाला, तर राज्यात बॉम्बस्फोट होतील, दंगली होतील, कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती हाताबाहेर जाईल अशी अनेक कारणे देत या चित्रपटाचे प्रदर्शनच तामिळनाडूत जयललिता यांनी थांबवले होते. भारतभर आणि परदेशातही चित्रपट रीलिज झाला होता; पण तामिळनाडूत मात्र परवानगीच मिळत नव्हती. जयललिता यांना भेटण्याशिवाय आता पर्याय नाही, हे लक्षात येताच विजय यांनी तशा हालचाली सुरू केल्या; पण त्यांना वेळच मिळेना! अखेर कुठल्यातरी मध्यस्थामार्फत तोडगा निघाला आणि थलैवा म्हणजेच ‘नायक’ या चित्रपटाला असलेली टॅगलाईन ‘टाईम टू लीड’ काढून टाका, अशी अट जयललिता यांनी घातली. ती मान्य झाली अन् मग चित्रपट झळकला.

तामिळनाडूत चित्रपट प्रदर्शित होताना ‘टाईम टू लीड’ काढून टाकले गेले. विजयचे सत्तेत शिरून नेतृत्व करण्याचे मनसुबे तेव्हा जगजाहीर झाले होते. हे सत्य करुणानिधी यांचा पुत्र असलेल्या स्टॅलिनला त्याचा पुत्र उदयनिधीला कळले का माहीत नाही; मात्र जयललिता राजकारणातल्या अत्यंत मुरब्बी व्यक्ती असल्यामुळे त्यांनी ते ओळखले होते. अर्थात, विजय केवळ ‘टाईम टू लीड’ असे ललकारून थांबला नव्हता, तर त्याने तशी व्यूहरचना अत्यंत उत्तमरीत्या प्रत्यक्षात आणायला सुरुवात केली होती. पडद्यावरच्या लोकप्रियतेचा फायदा घेत तामिळनाडूत मोठमोठे सुपरस्टार्स फॅन क्लब काढतात. विजय कांत, कमल हसन, रजनीकांत अशा सगळ्या बड्या अभिनेत्यांचे तिथे क्लब आहेत. हे क्लब या अभिनेत्यांची मंदिरे बांधणे, कधी या नेत्यांच्या प्रतिमांना दुधामधाचे अभिषेक करणे अशी फुटकळ आणि फालतू कामे करण्यात धन्यता मानतात. विजय आणि त्याचे पटकथाकार, फिल्म निर्माते असलेले वडील चंद्रशेखर असल्या प्रकारात समाधान मानणारे नव्हते. त्यांना त्यात अजिबात रमायचे नव्हते. या फॅन क्लबच्या ‘मॅडनेस’मध्ये त्यांनी ’मेथड’ शोधून काढली आणि ‘ऑल इंडिया थलपती विजय मक्कल इयक्कम’ या भारदस्त नावाने सुरू केलेल्या क्लब पातळीवरच्या कामांना सामाजिक मोहिमेचे स्वरूप दिले. खूप महत्त्वाचा निर्णय होता हा.

खरे तर, ते एक स्टेटमेंट होते, पुढे काय करायचे आहे ते सांगणारे. मक्कल इयक्कम म्हणजे लोकचळवळ. थलपती म्हणजे सेनापती. विजय या अभिनेत्याच्या नावाने सुरू झालेली अखिल भारतीय पातळीवरची लोकचळवळ. आता नावात काय आहे, अशा प्रश्नात न पडता या क्लबने काय केले, ते पाहणे महत्त्वाचे ठरेल. तमीळ जनतेला स्वस्त दरात वैद्यकीय उपचार, शाळा प्रवेशासाठी वरचे पैसे मागितले जात असतील, तर मांडवली करून देणे, मोफत वह्या-पुस्तके वाटप, गरजू असेल तर त्याला रुग्णालयात पोहोचवणे अशी कित्येक कामे करणे सुरू झाले. लोक काम घेऊन येऊ लागले. ते सोडवायला संघटना काम करू लागली. या बळावर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत विजय शिरले आणि त्यांनी लक्षणीय यश मिळवले. राजकारण प्रवेशाची घोषणा झाली. हळूहळू जाळे विस्तारले होते; पण २०२० मध्ये वडिलांनी ही घोषणा केली सांगत ती विजय यांनीच नाकारली. वडील-मुलाचे हे नाते अजब आहे. आई शोभा या गायिका, निर्माते वडील चंद्रशेखर मुलाच्या सिनेक्षेत्रातील प्रवेशाबाबत एकेकाळी कमालीचे प्रयत्नशील असत. मुलाचे सिनेमे फ्लॉप गेले, तरी ते खचत नसत. तसेच ते नंतर राजकारण प्रवेशाबाबत आग्रही झाले. अर्थात, राजकारणात प्रवेश सुपरहिट झाला. पदार्पणातच विक्रम.

ख्रिश्चन असलेले वडील चर्चच्या सल्ल्याने वागतात, असा हिंदुत्ववादी संघटनांचा आक्षेप; पण मुलगा वडिलांच्या ओंजळीने पाणी प्यायला तयार नव्हता. त्याने २०२० मध्ये पक्ष काढत नाही, हे ठणकावून सांगितले आणि आई-बापाला माझे निर्णय हे का घेतात म्हणून कोर्टात खेचले. ही राळ उडाली तशी शांतही झाली; पण इयक्कमची सामाजिक कामे मात्र वाढत गेली. पडद्यावर गल्ला गोळा करणारे विजयचे चार ब्लॉकबस्टर दरवर्षी रसिकांच्या सेवेत दाखल होत होतेच. विजय लोकप्रियतेच्या शिखरावर विराजमान झाले होते. सुरुवातीच्या सिनेमात चॉकलेट हिरो असलेले विजय नायिकेच्या मागे प्रियाराधन करत हिंडत. तेव्हाही ते खलनायकांना मारामारी करताना प्रेयसीच्या घरी तिच्या आईशी, बहिणीशी, वडिलांशी मैत्री करताना दाखवले जात. एक इमोशनल कोशन्टचा अध्याय पडद्यावर घडवून आणला जाई. सिनेमा हे आपले माध्यम आहे अन् तेच प्रचारसाधन हे विजयना समजले होते. या यशस्वी चित्रपट मालिकेत २०१५ नंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची लोकप्रियता भारतभर वाढत असताना सिनेमातून विजय यांनी त्यांच्या निर्णयांना लक्ष्य करणे सुरू केले.

२०१७ मध्ये जे. जयललिता निवर्तल्या. डी मॉनिटायझेशनमुळे जनता बेहाल झाल्याच्या तक्रारी सुरू होत्या. ‘अटली’ नावाचा एक विजयचा चित्रपट आला. त्यात त्यांनी जीएसटी, डिजिटल इंडिया, महागडी वैद्यकीय देयके यावर आसूड ओढले. जनतेच्या अडचणींना पडद्यावर दाखवणे ही भारतीय जनता पक्षाला, त्यांच्या राष्ट्रीय विचारसरणीला विरोध करण्याची मोहीम होती. विरोध करणाऱ्या गोष्टी त्या सहजगत्या पडद्यावर नायक म्हणून मांडत होते. याच वेळेला द्रमुक आणि अण्णाद्रमुक या द्रविडी परंपरांची नाते सांगणाऱ्या खास तामिळी पक्षांनाही पडद्यावरून विरोध केला जात होता. भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय राजकारण हे माझा शत्रू आहे आणि प्रादेशिक द्रविडी पक्ष हे माझे मित्र नाहीत, असा संदेश विजय सिनेमाच्या माध्यमातूनच देत होते. ते राजकारणात येणार नाहीत, असा समज करुणानिधी कुटुंबाने करून घेतला असावा. जयललितांनी ‘थलैवा’वर घातलेली बंदी कल्पना कदाचित विस्मृतीत गेली होती. विजय नेमके काय करणार, याकडे लक्ष असतानाच अचानक २०२० मध्ये त्यांनी पक्ष स्थापनेची घोषणा केली. ही घोषणाही सनसनाटी होती; मात्र त्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या रॅलीत चेंगराचेंगरी होऊन ४२ जणांचे झालेले मृत्यू विजय यांचे राजकीय भवितव्य खरे तर संपवणारे होते. प्रत्यक्षात झाले भलतेच. दोन वर्षांत घराघरात पोहोचलेले विजय आपण कसे जनतच्या आकांक्षाचे प्रतीक आहोत आणि जनतेला नवा पर्याय कसे देऊ शकतो आहोत, हे दाखवण्यात यशस्वी झाले. हे यश मतयंत्रात दिसले. विजय तामिळनाडूत सर्वाधिक जागा जिंकून विजयी झाले.

दुसरीकडे जयललिता यांच्या निधनानंतर अण्णाद्रमुकमध्ये काहीशी बेदीली माजली. कोणताही नेता पक्षाचे नेतृत्व करण्याइतका सक्षम नव्हता. त्यामुळेच करुणानिधी यांचे पुत्र स्टॅलिन यांची विजयी घोडदौड सुरू झाली. त्यांना बरीच प्रतीक्षा करावी लागली होती. आता आपल्याला कोणीच प्रतिस्पर्धी नाही अशा समजुतीत अडकलेल्या स्टॅलिन यांनी केंद्र सरकारचा अत्यंत कडवा विरोध सुरू केला. त्यातूनच राज्यपालांशी भांडणे सुरू झाली. त्यांनी सनातन हिंदू धर्माविरोधी विधाने केली. स्टॅलिन स्वतःच्या मुलाला राजकारणात तर घेऊन आलेच शिवाय त्यांनी त्याला उपमुख्यमंत्रीही करून टाकले. करुणानिधी यांचा प्रभाव कुठेतरी ओसरत चालला होता. त्यांच्या निधनापर्यंत त्यांनी कणीमोळी ही कन्या राज्यसभेत यशस्वीरीत्या पाठवली. मारन या बहिणीच्या राजकारणी कुटुंबाचा सांभाळ केला; मात्र करुणानिधी कुटुंबाच्या सर्व सत्ता हातात ठेवण्याच्या वृत्तीचा तमिळी जनतेला कंटाळा आला होता. तो कंटाळा वाढत गेला आणि विजय यांनी अचूक त्या पोकळीत स्वतःचा पक्ष लोकप्रिय करण्याचा प्रयत्न यशस्वी करून दाखवला. त्यांच्या पक्षाचे नावच ‘तमिल वेट्री कजगम’ म्हणजे तामिळी विजयी संघ असे आहे.

अत्यंत नव्या उमेदवारांना संधी देत निवडणुकीच्या राजकारणात हा पक्ष यशस्वी झाला. कारण, तमिळ जनतेला वेगळे काहीतरी हवे होते. इथे थोडेसे द्रविडी राजकारणाबाबत काही नोंदवायला हवे. इंदिरा गांधी यांना सत्तेच्या पदावर बसवून आपण केंद्र सरकार आणि भारताचे राजकारण चालवू अशा समजात कामराज एकेकाळी होते. इंदिरा गांधी यांनी कामराज यांचे महत्त्व कमी केले, पंख छाटले आणि त्या सर्व सत्ताधीश झाल्या. तेव्हापासून तामिळी जनता स्वओळख दाखवू लागली. हिंदीची सक्ती या विषयावर अण्णादुराई सत्तेत आले आणि त्यांच्यातून बाहेर पडलेल्यांनी ही सत्ता आजवर राखली. द्रविडी राजकारणाची पायाभरणी झाली. तमीळ प्रजा शिक्षणाने हुशार, सामाजिक आशय महत्त्वाचा मानणारी. महिलांना समाजात उत्तम स्थान; पण भारताच्या मुख्य भूमीपासून वेगळे राजकारण करण्याची या प्रदेशाला सवय झाली. प्रादेशिक वेगळेपणाच्या लाटेवर स्वार होत पुढे राजकारणाचे अध्याय रचले गेले. करुणानिधी हे पटकथा लेखक, तर एमजी रामचंद्रन हे अभिनेते. दोघे एकेकाळचे मुख्यमंत्री. दोघांनीही सिनेमा हे माध्यम सामाजिक परिवर्तनासाठी अचूक पद्धतीने वापरले.(आता उजवा परिवाराही त्यात शिरला असून ‘धुरंधर’, ‘केरळ स्टोरी’सारख्या सिनेमांची उदाहरणे आहेत.) करुणानिधी आपल्याला पक्षात योग्य स्थान म्हणजे प्रमुखपद देत नाहीत, हे लक्षात आल्यानंतर एम. जी. रामचंद्रन १९७२ मध्ये भ्रष्टाचार होतोय असा आरोप करत बाजूला झाले अन् १९७७ मध्ये मुख्यमंत्री झाले. मधली ५ वर्षे ते झुंजत होते. ते पटकथाकार करुणानिधी यांच्यापेक्षा अधिक लोकप्रिय होते. कारण, ते पडद्यावर नायक म्हणून दिसत. त्यांच्या निधनानंतर लोकप्रियतेचे भांडवल करीत अभिनेत्री जयललिता तामिळनाडूच्या मुख्यमंत्री झाल्या आणि त्यांनी यशस्वी राजकारण करून दाखवले. आता जोसेफ विजय यांची वेळ आहे. खेळ सुरू झाला आहे.

सध्या या प्रदेशातील ४० टक्के मतदार ४० वयोगटाखालचे आहेत. या वयोगटाला ना रामचंद्रन माहिती आहेत ना करुणानिधी. त्यामुळे कोऱ्या पाटीवर आपली अक्षरे कोरण्यासाठी विजय अत्यंत ताकदीने पुढे आले आणि घराघरात पडद्यावर पोहोचणाऱ्या त्यांच्या प्रतिमेला प्रचाराचे साधन करत ते यशस्वी देखील ठरले. ॲक्सिस माय इंडियाच्या प्रदीप गुप्ता या निवडणूक अंदाजकर्त्यांचा आणि प्रशांत किशोर या निवडणूक व्यूहरचनाकाराचा अपवाद वगळता कोणालाही विजय हे तामिळनाडूतल्या जनतेने निवडलेला पर्याय आहेत, हे लक्षातच आले नाही. आता १०८ जागांवर विजयी होऊन विजय यांनी स्वतः आपणच मुख्यमंत्रीपदाचे दावेदार आहोत, हे जाहीर केले होते. अर्थात, निकाल लागल्यानंतर तामिळनाडूमध्ये वेगळेच काही घडण्याची शक्यताही निर्माण झाल्या होत्या. मात्र विजय यांचा मुख्यमंत्री पदाचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे.

**मृणालिनी नानिवडेकर**

# मोबाईलच्या स्क्रीनमध्ये अडकलेले बालपण

मे महिन्याची सुट्टी सुरू झाली की पूर्वी गावात एक वेगळाच माहोल असायचा.. मुलं घराबाहेर पडली की दुपारी तहान लागेपर्यंत त्यांचा पत्ता नसायचा. गल्लीत क्रिकेट, लगोरी, लपाछपी, विटीदांडू, सायकलींच्या शर्यती कुणाचा गुडघा फुटायचा, कुणाची चप्पल हरवायची, तर कुणी झाडावरून कैऱ्या तोडताना पकडला जायचा. पण त्या सगळ्या गोंधळातही एक आनंद होता एक जिवंतपणा होता. हेच खरे बालपण होते.आज मात्र चित्र पूर्ण बदलले आहे. पूर्वी मुले ‘घरी ये’ म्हणून ओरडून बोलवावी लागायची; आता ‘मोबाईल ठेव आणि बाहेर जा’ हे दिवसातून दहा वेळा सांगावे लागते. ग्रामीण भागातही स्मार्टफोन सहज उपलब्ध झाल्यामुळे मुलांच्या जीवनशैलीत मोठा बदल झाला आहे. या बदलाचा परिणाम केवळ खेळांवर किंवा अभ्यासावरच नाही, तर मुलांच्या मानसिक आरोग्यावरही दिसू लागला आहे. स्क्रीनसमोर जास्त वेळ घालवणाऱ्या मुलांमध्ये चिडचिडेपणा, एकाग्रता कमी होणे, झोपेचे विकार, अस्वस्थता आणि भावनिक एकटेपणा वाढताना दिसतो.विशेषतः मोबाईल गेम्स आणि सततच्या डिजिटल उत्तेजनामुळे मुलांची संयम क्षमता कमी होत चालली आहे. यासोबतच संवाद कमी होत चालला आहे. पूर्वी मित्रांसोबत खेळताना मुले भांडायची, पुन्हा एकत्र यायची, जिंकणे-हरणे शिकायची. गावातील एखाद्या पाण्याच्या टाकीजवळ,झाडाखाली किंवा मैदानावर तासन्तास गप्पा रंगायच्या.परिणामी प्रत्यक्ष सामाजिक कौशल्य कमी होत असल्याचे चित्र आहे.मात्र प्रश्न फक्त केवळ मोबाईलचा नाही; प्रश्न आहे तो संतुलनाचा. तंत्रज्ञान चुकीचे नाही, पण त्याचा अतिरेक बालपणाची नैसर्गिक उर्मी कमी करू लागतो.आज गरज आहे ती मुलांना पुन्हा मैदानाशी, पुस्तकांशी आणि प्रत्यक्ष संवादाशी जोडण्याची. गावपातळीवर क्रीडा स्पर्धा, उन्हाळी शिबिरे, वाचन उपक्रम आणि सांस्कृतिक कार्यक्रम वाढवण्याची आवश्यकता आहे. आज रिकाम्या मैदानांकडे पाहताना एक प्रश्न मात्र कायम मनात उभा राहतो आपण मुलांना आधुनिक साधने देताना त्यांचं निरागस आणि आनंदी बालपण हरवून बसत तर नाही ना?



माझेही मत

**दिनेश गाडगे**

जनसंपर्क अधिकारी तथा मानसशास्त्र अभ्यासक
अमरावती, संपर्क क्र. ९८५०३३६५९२

## अविवाहितांचे युग?

अलीकडेच झालेल्या एका जागतिक सर्वेक्षणानुसार आगामी सहा वर्षात जगातील सुमारे ४५ टक्के मुली अविवाहित राहू शकतात, असा अंदाज आहे. आजच्या मुली उच्च शिक्षण घेत आहेत आणि त्या आपल्या करिअरला सर्वोच्च प्राधान्य देत आहेत. त्या आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी आहेत आणि त्यासाठी कोणावरही अवलंबून राहू इच्छित नाहीत. अशा मुलींना आपले स्वातंत्र्य प्रिय असून त्या स्वतःचा निर्णय स्वतः घेण्यास सक्षम आणि इच्छुक आहेत. विवाह, मातृत्व आणि कौटुंबिक बंधने ही त्यांच्या प्रगतीत अडथळा ठरतात किंवा ठरू शकतात, असे बहुसंख्य मुलींना वाटत आहे. या सर्वेक्षणानुसार याबाबी खऱ्या असतील, तसेच मुलींमधील ही प्रवृत्ती कायम राहिली तर जगातील पारंपरिक कुटुंबव्यवस्था आणि सामाजिक रचना ढासळू शकते. गातील इतर देशात झपाट्याने होत चाललेली लोकसंख्या घट, अविवाहित मुलांची वाढत चाललेली संख्या आणि वृद्धावस्थेत एकटेपणाच्या समस्या यामुळे कौटुंबिक व्यवस्था डळमळीत होण्यास सुरुवात झाली आहे.

पालकांची वाढत चाललेली अपेक्षा तसेच मोठ्या महानगरात राहण्याची अट यामुळे ग्रामीण भागातील हजारो मुले अविवाहित राहिल्याचे स्पष्ट होत आहे. मुला- मुलींच्या विवाहाची वयोमर्यादा वाढत चालली आहे. याचा परिणाम थेट समाजावर होत आहे. करिअरकडे लक्ष देणाऱ्या मुलींवर टीका केली जात आहे. त्याचबरोबर त्यांना सामाजिक समस्यांचे भान नसल्याचेही मत व्यक्त होत आहे. परंतु, समाजातील पन्नास टक्के लोकसंख्या असलेल्या महिलांनीच कायम कुटुंब आणि समाजाचा विचार करावा का, याबद्दल कोणीच बोलावयास तयार नाही.सध्याच्या काळात मुलींना जन्म देणे आणि त्यांना शिक्षण देऊन स्वतःच्या पायावर उभा करणे हेच मोठे आव्हानात्मक होत चालले आहे. समाजात मुली आणि स्त्रियांवरील अत्याचारात होत चाललेली वाढ प्रत्येक भारतीयाला अंतर्मुख करावयास लावणारी आहे.

**प्रा. मधुकर चुटे**

## पश्चिम बंगालमधील जन उठाव

पाच राज्यांतील विधानसभा निवडणुकांचे निकाल बहुतांश अपेक्षेप्रमाणे लागले आहेत. आसाममध्ये सत्तांतर झाले नाही, तर पाँडिचेरीमध्ये भाजपप्रणित एनडीए सरकार स्थापन झाले. केरळमध्ये दर पाच वर्षांनी सत्ता बदलण्याची परंपरा कायम राहिली. तामिळनाडूमध्ये सत्ताधाऱ्यांनी सनातन धर्माबद्दल केलेल्या विधानांचा फटका द्रमुक आघाडीला बसला, तर अभिनेता विजय यांच्या ‘टीव्हीके’ पक्षाने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडवून दिली.पश्चिम बंगालच्या निकालाचा विचार करता, येथे भाजपच्या विजयापेक्षा ममता बॅनर्जींच्या पराभवाचा आनंद मानणाऱ्यांची संख्या मोठी आहे. या परिवर्तनामागे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जमिनीवर झालेले कार्य आणि शेजारील बांगलादेशातील हिंदू बांधवांवर होणारे अत्याचार यांबाबत ममता सरकारने घेतलेली मवाळ भूमिका कारणीभूत ठरली. ममता बॅनर्जींची ‘मुस्लिम तुष्टीकरणा’ची नीती आणि प्रशासनातील मनमानीमुळे सामान्य बंगाली माणूस स्वतःच्याच राज्यात असुरक्षित झाला होता.

**अविनाश देशपांडे**

E-mail :-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# प्रेमसंबंधात पती अडसर ठरताच 'करंट'ने संपविण्याचा कट..!

## पत्नीसह प्रियकराविरुद्ध जीवघेण्या प्रयत्नाचा गुन्हा वडगाव जंगल पोलिसांत दाखल

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - जिल्ह्यातील कळंब तालुक्यातील पंगडी येथे अनैतिक संबंधातून पतीला संपविण्याचा कथित कट उघडकीस आल्याने खळबळ उडाली आहे. पत्नीने प्रियकराच्या सांगण्यावरून पतीला विद्युत शॉक देऊन ठार मारण्याचा प्रयत्न केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला असून, या प्रकरणी वडगाव जंगल पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी गजानन वसंता मोरे (वय 38, रा. पंगडी ता. कळंब) यांनी दिलेल्या तक्रारीवरून त्यांची पत्नी कवडी गजानन मोरे (वय 35) व गावातील विष्णु कवडू आत्राम (वय 45) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी दोघांमध्ये कथित अनैतिक संबंध असल्याचा दावा फिर्यादीने तक्रारीत केला आहे. तक्रारीनुसार, 3 मे 2026 रोजी मध्यरात्री अंदाजे 2 वाजताच्या सुमारास फिर्यादी घरी झोपलेले असताना पत्नीने विद्युत वायरला ॲल्युमिनियम तार बांधून त्यांना करंट देण्याचा प्रयत्न




केला. या प्रकारामागे प्रियकराचा सहभाग असल्याचा आरोपही फिर्यादीने केला आहे. या घटनेनंतर तब्बल पाच दिवसांनी, 8 मे रोजी वडगाव जंगल पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक 148/26 अंतर्गत भारतीय न्याय संहिता कलम 109(1), 62(2) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. विशेष म्हणजे, आरोपी महिला विरोधात यापूर्वीही गुन्हा दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. घटनेत वापरण्यात आलेली विद्युत वायर व ॲल्युमिनियम तार अद्याप जप्त करण्यात आलेली नाही. या प्रकरणाची गंभीर दखल घेत उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेश बैसाने यांनी घटनास्थळी भेट दिली. सापोनी विकास दांडे पोलिसा स्टेशन वडगाव ज. पोलीस उपनिरीक्षक भाऊराव बोकडे पुढील तपास करीत आहेत. या धक्कादायक घटनेमुळे पंगडी परिसरात मोठी चर्चा रंगली असून, "प्रेमसंबंधासाठी पतीचा काटा काढण्याचा प्रयत्न?" असा संतप्त सवाल नागरिकांतून उपस्थित होत आहे.

# वेचक

## इसापूर धरणातून पाणी सोडण्याचे जिल्हाधिकारी यांचे आदेश

यवतमाळ - इसापूर धरण प्रकल्पातून यवतमाळ आणि नांदेड जिल्ह्यातील पाणी टंचाई ग्रस्त गावांना दिलासा देण्यासाठी पाणी सोडल्याचे आदेश जिल्हाधिकारी विकास मीना यांनी दिले आहे. त्यानुसार यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड तालुक्यातील 32 पाणी टंचाईग्रस्त गावांना दिलासा मिळणार आहे. या आदेशानुसार यवतमाळ जिल्ह्यासाठी 9 दलघमी आणि नांदेड 3 दलघमी पाणी सोडण्याचे आदेश देण्यात आले आहे. त्यानुसार इसापूर धरणामधून थेट पाणी सोडण्यासाठी स्वतंत्र विमोचक उपलब्ध नसल्यामुळे नियमित कालवा आवर्तनाच्या वेळापत्रकाशी संलग्न अशा विमोचकाद्वारे दि. ५ एप्रिलपासून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. दि. ११ मे अखेर एकूण १२ दलघमी मागणीपैकी ६.८१ दलघमी इतके पाणी नाल्याद्वारे प्रवाहित करण्यात आले असल्याची माहिती उर्ध्व पेनगंगा प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता यांनी दिली. उमरखेड तालुक्यातील टाकळी, राजापूरवाडी, चालगणी, साखरा, खरुस, लोहरा, कारखेड, देवसरी, दिघडी, ऊंचवडद, सिंदगी, गांजेगाव, सावळेश्वर, भोजनगर, बिटरगाव, रतननाईकनगर, बोडका, पिंपळगाव, पेंदा, लिंगी, मुरली, मुळावा, हातला, दिवट, पिंपरी, पळशी, नागापूर, बारा चातारी, बोरी, कोप्रा, मानकेश्वर आदी गावांसाठी पाणी सोडण्यात आले आहे.तसेच नांदेड जिल्ह्यातील 25 गावांसाठी पाणी सोडण्यात आले आहे. उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभागाने ग्रामस्थांना पाण्याचा वापर जपून व नियोजनपूर्वक करण्याचे आवाहन केले आहे.

## नगरपंचायत कर्मचाऱ्यांचा 'कामचुकारपणा' नडला, वायरमनच्या निष्काळजीपणामुळे पाणीपुरवठा ठप्प!

ढाणकी - नगरपंचायत प्रशासनाकडून नागरिकांना सोयीसुविधा पुरवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात असताना, काही कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे शहराची व्यवस्था कोलमडल्याचे चित्र दिसत आहे. पाणीपुरवठा विभागात वायरमन म्हणून कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्याच्या बेजबाबदारपणामुळे शहराचा पाणीपुरवठा खंडित झाला असून, तांत्रिक कामात सुरक्षिततेचे नियम पाळले नसल्याने त्यांना विजेचा धक्का लागल्याची घटना घडली आहे. शहराचा पाणीप्रश्न मिटवण्यासाठी प्रशासनाने विहीर अधिग्रहित करून दोन दिवसांपूर्वीच पाईप उपलब्ध करून दिले होते. अधिग्रहण केलेल्या विहिरीचे पाणी मुख्य विहिरीत जमा करण्यासाठी तातडीने पाईपलाईन जोडणे ही कर्मचाऱ्यांची जबाबदारी होती. मात्र, दोन दिवसांपासून पाईप घटनास्थळी पडून असूनही कर्मचाऱ्यांनी पाईपलाईन पूर्ण केली नाही. या कामचुकारपणामुळे ढाणकी शहराला पाणीपुरवठा होऊ शकलेला नाही, असा थेट आरोप स्थानिक नगरसेवकांनी केला आहे. वायरमन म्हणून अनेक वर्षांपासून कार्यरत कर्मचारी अनुभवी असूनही वॉटर सप्लायच्या विहिरीवर स्टार्टर चालू करताना त्यांनी आवश्यक ती काळजी घेतली नाही. तांत्रिक बाबींची माहिती असूनही सुरक्षेच्या नियमांकडे दुर्लक्ष केल्याने त्यांना विजेचा धक्का लागला. कर्मचारी स्वतःच्या कामात हलगर्जीपणा करतात आणि काही विपरीत घडल्यास त्याचे खापर नगरपंचायतीवर फोडून स्वतःची जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न करतात, अशी संतप्त चर्चा आता जनमानसात सुरू आहे. कार्यालय अधीक्षक, विभाग प्रमुख आणि मुख्याधिकारी यांनी पाणीपुरवठ्याची कामे सुरळीत पार पाडण्याचे स्पष्ट आदेश दिलेले असतानाही कर्मचाऱ्यांकडून कामात दिरंगाई होत आहे. नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या स्ट्रीट लाईटच्या तक्रारी आणि पाणीपुरवठ्याची दुरुस्ती ही कामे वेळेवर करण्याऐवजी कर्मचारी वेळकाढूपणा करत असल्याचे दिसून येत आहे. एकूणच, नगरपंचायत कर्मचाऱ्यांच्या या 'आरामदायी' कारभारामुळे ढाणकीकर जनतेला नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. आता प्रशासन अशा कामचुकार कर्मचाऱ्यांवर काय कारवाई करणार ? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



## सप्तगिरी नगर पुसद येथे पक्ष्यांकरिता जलपात्र व अन्नसाखळी उपक्रम

पुसद - वाढत्या उन्हाच्या तीव्रतेमुळे पक्ष्यांना पाणी व अन्नाची कमतरता भासत असल्याची जाणीव ठेवून सप्तगिरी नगर, पुसद येथील श्री स्वामी समर्थ मंदिर समिती यांच्या वतीने पक्ष्यांकरिता जलपात्र व अन्नसाखळी उपक्रम सुरू करण्यात आला आहे. मंदिर समिती तसेच सेवाधारी भक्तांनी मंदिर परिसरात विविध ठिकाणी जलपात्र ठेवून त्यामध्ये दररोज स्वच्छ पाण्याची व्यवस्था केली आहे. तसेच पक्ष्यांसाठी गहू, ज्वारी, बाजरी व इतर धान्य ठेवून अन्नसाखळीचीही व्यवस्था करण्यात आली आहे. या उपक्रमामुळे परिसरातील चिमण्या, कबुतरे, कावळे व इतर पक्ष्यांना मोठा दिलासा मिळत असून पर्यावरण संवर्धनासाठी हा उपक्रम प्रेरणादायी ठरत आहे. "उन्हाळ्यात पक्ष्यांची काळजी घेणे ही प्रत्येकाची सामाजिक जबाबदारी आहे," असा संदेश देत मंदिर समितीने नागरिकांनाही आपल्या घरासमोर जलपात्र ठेवण्याचे आवाहन केले आहे.

# वंशावळीत नसलेल्या नोंदींवर समितीचा भर ; उच्च न्यायालयाचा दणका

**जनमाध्यम प्रतिनिधी**

उमरखेड - अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या कार्यपद्धतीवर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने कठोर ताशेरे ओढत उमरखेड येथील लक्ष्मीकांत महादेव नंदनवार यांना मोठा दिलासा दिला आहे. रिट याचिका क्र. 4539/2021 मध्ये न्यायालयाने समितीचा 2 डिसेंबर 2019 रोजीचा आदेश रद्द करून चार आठवड्यांच्या आत "हलबी" अनुसूचित जमातीचे वैधता प्रमाणपत्र देण्याचे निर्देश दिले.

लक्ष्मीकांत नंदनवार यांनी 2011 मध्ये जात पडताळणीसाठी अर्ज दाखल केला होता. मात्र समितीने विविध कारणे देत त्यांचा दावा फेटाळला. सुनावणीदरम्यान न्यायालयाच्या निदर्शनास आले की, समितीने "हुकाजी लक्ष्मण", "कौसल्या नारायण" आणि "नागबाई नारायण" या व्यक्तींच्या नोंदींवर अवलंबून निर्णय दिला होता. या व्यक्ती याचिकाकर्त्याच्या वंशावळीत नसल्याचे स्पष्ट झाल्यानंतरही समितीने त्या नोंदींचा आधार घेतल्याबद्दल न्यायालयाने नाराजी व्यक्त केली. प्रकरणातील महत्त्वाचा मुद्दा म्हणजे 3 एप्रिल 1947 चा जुना दस्तऐवज. त्यामध्ये याचिकाकर्त्याच्या आजोबांची जात "हलबी" अशी नमूद असल्याचे न्यायालयाने नोंदविले. तसेच वडिलांच्या शाळा दाखल्यातही "हलबी" नोंद असल्याचे स्पष्ट झाले. पुरेसे जुने दस्त ऐवजी पुरावे असताना केवळ अफिनिटी टेस्टवर अवलंबून राहणे योग्य नसल्याचे न्यायालयाने नमूद केले. न्यायमूर्ती एम. एस. जवळकर आणि न्यायमूर्ती नंदेश एस. देशपांडे यांच्या खंडपीठाने समितीचा आदेश कायद्याच्या कसोटीवर टिकत नसल्याचे सांगत तो रद्द केला. याचिकाकर्त्यांच्यावतीने ॲड. अश्विन देशपांडे आणि ॲड. राशी नगराळे यांनी प्रभावी युक्तिवाद केला. दरम्यान, "15 वर्षांच्या कायदेशीर लढ्यानंतर अखेर न्याय मिळाला," अशी प्रतिक्रिया लक्ष्मीकांत नंदनवार यांनी व्यक्त केली.

# महागावच्या समीक्षा भरवाडेचा 93% गुणांसह दैदिप्यमान यश

**जनमाध्यम प्रतिनिधी**

महागाव - येथील कुमारी समीक्षा सतीश भरवाडे हिने एसएससी परीक्षेत 93% गुण मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. तिच्या या उज्ज्वल कामगिरीबद्दल जन आंदोलन आधार संघर्ष समितीच्या वतीने मानचिन्ह देऊन तिचा सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला.

या सत्कार सोहळ्यात समितीचे संस्थापक अध्यक्ष जगदीश भाऊ नरवाडे



डीपी नाईक देवानंद कायंदे ठाणेदार सतीश भरवाडे स्वप्निल रायवाडे संतोष भरवाडे यांच्या हस्ते समीक्षा हिला मानचिन्ह प्रदान करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी समीक्षा हिचे कौतुक करत तिच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# श्री. व. ना. रुग्णालयाचा गलथान कारभार उघड

## रुग्ण एक... डिस्चार्ज कार्ड दुसऱ्याचे चुकीच्या उपचारांनी वृद्ध महिलेच्या जीवाशी खेळ

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - येथील श्री. व. ना. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय मध्ये प्रशासनाच्या गंभीर निष्काळजीपणाचा धक्कादायक प्रकार समोर आला असून, चुकीचे डिस्चार्ज कार्ड देऊन एका वृद्ध महिलेच्या जीवाशी खेळ करण्यात आल्याचा आरोप होत आहे. या प्रकरणामुळे रुग्णालयातील भोंगळ कारभार पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, इंदू शंकरराव खांडेकर या वृद्ध महिलेला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तब्बल सात दिवस उपचार घेतल्यानंतर रुग्णाला सुट्टी देताना प्रशासनाकडून अक्षम्य हलगर्जीपणा करण्यात आला. संबंधित महिलेला तिचे मूळ डिस्चार्ज कार्ड न देता "इंदिरा रहिवासी नेर" या दुसऱ्याच रुग्णाचे डिस्चार्ज कार्ड देण्यात आले. धक्कादायक बाब म्हणजे, त्या चुकीच्या डिस्चार्ज कार्डवरील औषधोपचार सुरू ठेवल्याने वृद्ध महिलेची प्रकृती आणखी खालावल्याचे नातेवाईकांच्या निदर्शनास आले. वेळेत ही चूक लक्षात आली नसती, तर



मोठी जीवितहानी घडली असती, अशी संतप्त प्रतिक्रिया नातेवाईकांनी व्यक्त केली आहे. दरम्यान, या घटनेमुळे रुग्णालय प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. यापूर्वीही औषधांचा तुटवडा, रक्त तपासण्यांमध्ये होणारा विलंब, रुग्णवाहिका, स्ट्रेचर व व्हीलचेअर यांसारख्या मूलभूत सुविधांची कमतरता याबाबत अनेकदा तक्रारी समोर आल्या आहेत. मात्र प्रशासनाकडून केवळ कागदी आश्वासने दिली जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. गरीब, शेतकरी आणि मजूर वर्गासाठी आधार मानल्या जाणाऱ्या शासकीय रुग्णालयातच अशा प्रकारची बेपर्वाई होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून मुख्य अधिष्ठाता, वैद्यकीय अधीक्षक, संबंधित युनिट इन्चार्ज व दोषी कर्मचाऱ्यांवर कठोर प्रशासकीय आणि कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी रुग्ण हक्क समितीच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. या मागणीमध्ये रुग्ण सेवा समिती विदर्भ महिला अध्यक्षा मनीषा तिरणकर, विदर्भ सचिव दिनकर खांडेकर, रुग्ण हक्क समिती व आम आदमी पार्टी जिल्हा समन्वयक मोबीन शेख यांच्यासह आकाश चमेडीया, अविनाश धनेवार आणि प्रशांत देवकते यांनी सहभाग नोंदविला आहे.

# ग्रामपंचायत अंबाळी ते दत्त देवस्थान अबांळीमधील रस्त्याचे अर्धवट काम पूर्ण करा

## कार्यकारी अभियंता पुसद यांना निवेदनाद्वारे मागणी!

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - उमरखेड तालुक्यातील ग्रामपंचायत अंबाळी ते दत्त देवस्थान अंबांळी या मार्गावरील रस्त्याचे काम सध्या अर्धवट स्थितीत आहे. या संदर्भात खालील बाबींकडे लक्ष वेधण्यासाठी उमरखेड/महागाव विधानसभा राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (अजित पवार गट)अध्यक्ष अविनाश यादवकुळे त्यांनी आज दिनांक ११ मे २०२६ रोजी पुसद येथील कार्यकारी अभियंता महेश माथुरकर यांना अर्धवट असलेले काम तात्काळ पूर्ण करण्यात यावे अशा विषयाचे निवेदन देऊन मागणी केली आहे.

सदर निवेदनात म्हटले आहे की रस्त्याचे काम काही दिवसांपूर्वी सुरू करण्यात आले होते, परंतु ते मध्येच थांबवण्यात आले सध्या रस्ता खोदून ठेवलेला असून त्यावर गिट्टी आणि माती मोठ्या प्रमाणात पसरलेली आहे. यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन रस्त्यावरील या खडी आणि मातीमुळे वाहनचालकांना गाड्या चालवणे अत्यंत



कठीण झाले आहे. दुचाकी घसरण्याचे प्रमाण वाढले आहे. पावसाळ्याचे संकट पाहता पुढील महिन्यात पावसाळा अगदी जवळ आलेला आहे. जर पाऊस सुरू झाला, तर या खोदलेल्या रस्त्यावर चिखल होऊन रस्ता पूर्णपणे बंद होण्याची शक्यता आहे. तसेच, पावसामुळे खड्डे न दिसल्यास मोठे अपघात होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. श्रद्धाळूची गैरसोय: हे मार्ग दत्त देवस्थानकडे जात असल्याने भाविकांची येथे सतत वर्दळ असते. हा रस्ता खराब असल्याने ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे नागरिकांची होणारी गैरसोय व अपघाताच्या प्रमाण पाहता पावसाळा सुरू होण्यापूर्वी या रस्त्याचे राहिलेलं काम युद्धपातळीवर हाती घेऊन ते त्वरित पूर्ण करावे, जेणेकरून संभाव्य अपघात टाळता येतील व नागरिकांना दिलासा मिळेल. त्यामुळे आपण या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन तात्काळ कार्यवाही करुन अर्धवट राहिलेला हा रोड पूर्ण करण्यात यावा अशी मागणी अविनाश यादवकुळे रॉ.का.(अजित पवार गट) महागाव/उमरखेड विधानसभा अध्यक्ष यांनी आज पुसद येथे कार्यकारी अभियंता माथुरकर यांना निवेदनाद्वारे केली आहे.


# जिद्दीच्या बळावर वैष्णवी नाईक बनली 'क्लास वन' अधिकारी

## सोशल मीडियाचा दूरावा व १७ तासांचा अभ्यास

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - "यश हे कुणालाही सहज मिळत नाही; त्यासाठी स्वतःला झोकून द्यावे लागते," याचा प्रत्यय यवतमाळच्या वैष्णवी विनोद नाईक हिने आपल्या कर्तृत्वातून दाखवून दिला आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) नगररचना विभागाच्या परीक्षेत उज्ज्वल यश संपादन करत वैष्णवीने थेट 'क्लास वन' राजपत्रित अधिकारी पदाला गवसणी घातली आहे. अवघ्या २५ व्या वर्षी मिळवलेल्या या यशामुळे संपूर्ण यवतमाळ जिल्ह्यात तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

सामान्य कुटुंबातून आलेल्या वैष्णवीने अत्यंत कठोर परिश्रम, जिद्द आणि चिकाटीच्या बळावर हे यश संपादन केले. स्पर्धा परीक्षांच्या वाढत्या स्पर्धेत अनेक विद्यार्थी गोंधळलेल्या अवस्थेत असताना वैष्णवीने मात्र आपले ध्येय निश्चित केले होते. नगररचना विभागात



अधिकारी होण्याचे स्वप्न तिने मनाशी पक्के केले आणि त्यासाठी दिवस-रात्र मेहनत घेतली. परीक्षेच्या तयारीदरम्यान तिने स्वतःला पूर्णपणे अभ्यासात झोकून दिले. अभ्यासात कोणताही व्यत्यय येऊ नये म्हणून व्हॉट्सॲप, फेसबुक, इन्स्टाग्राम यांसारख्या सोशल मीडियापासून तिने पूर्णपणे दूर राहण्याचा निर्णय घेतला. मित्र-मैत्रिणींचे कार्यक्रम, सण-उत्सव, फिरणे आणि मनोरंजन यांनाही तिने तात्पुरता निरोप दिला होता. वैष्णवी दिवसाचे तब्बल १६ ते १७ तास अभ्यास करत होती. तिच्यासाठी तिची खोली, पुस्तकं आणि नोट्स हेच एकमेव विश्व बनले होते. कठोर आत्मशिस्त आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर तिने अखेर यशाचा शिखर गाठले. वैष्णवी नाईक हिने मिळवलेले हे यश केवळ तिचे वैयक्तिक यश नसून यवतमाळ जिल्ह्याच्या शिरपेचातील मानाचा तुरा ठरला आहे. तिच्या यशामुळे ग्रामीण व शहरी भागातील अनेक विद्यार्थिनींना नवी प्रेरणा मिळाली आहे. प्रशासकीय सेवेत एका कर्तबगार आणि मेहनती अधिकाऱ्याचा प्रवेश झाल्याची भावना व्यक्त होत आहे. मुलीच्या या यशामुळे वडील विनोद नाईक आणि संपूर्ण नाईक कुटुंब आनंदित झाले आहे. "मुलीने घेतलेल्या अथक मेहनतीचे फळ आज मिळाले," अशा भावनिक शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. वैष्णवीच्या यशामुळे यवतमाळच्या शैक्षणिक आणि स्पर्धा परीक्षा क्षेत्रात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# दुर्घटनाग्रस्त कोळसा खाणीची खा. धानोरकरकडून पाहणी!

**जनमाध्यम प्रतिनिधी**

वणी - उकणी येथील कोळसा खाण दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर खासदार श्रीमती प्रतिभाताई धानोरकर यांच्यासोबत काँग्रेस कमिटीचे महाराष्ट्र प्रदेश सचिव संजय खाडे यांनी प्रत्यक्ष दुर्घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.यावेळी त्यांनी WCL प्रशासनाला धारेवर धरत दुर्घटनेबाबत जाब विचारला तसेच भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी आवश्यक त्या कठोर उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या. दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी,अशी मागणीही यावेळी करण्यात आली.

परिसरातील विविध कंपन्यांमध्ये स्थानिक प्रकल्पग्रस्त नागरिक व त्यांच्या मुलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी करण्यात आली. वणी परिसरात मोठ्या प्रमाणात कोळसा खाणीचे जाळे असल्यामुळे कामगारांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अत्यंत गंभीर असून भविष्यात कोणताही



अपघात होऊ नये यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याबाबत प्रशासनाशी चर्चा करण्यात आली. तसेच दुर्घटनेत बाधित झालेल्या खाणकामगार आसुटकर यांच्या घरी जाऊन त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करण्यात आली. उकणीसह पिंपळगाव गावाच्या पुनर्वसनाचा प्रश्न,उर्वरित जमीन संपादन तसेच प्रकल्पग्रस्तांच्या मुलांना नोकरी देण्याबाबतही प्रशासनासोबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी मुख्य महाप्रबंधक खन्ना साहेब,उपक्षेत्रीय प्रबंधक स्वामी साहेब तसेच WCL प्रशासनातील अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या पाहणी दौऱ्यात WCL TSC सदस्य तथा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सचिव संजय खाडे, प्रमोदभाऊ वासेकर, राजीव अंकितवार, अशोक चिकटे, विकेश पानघाटे, नंदू आसुटकर, बंडुभाऊ श्रखीरटकर, मनोज खाडे, दादा खेडेकर, सुभाष ढवळे तसेच उकणी गावासह परिसरातील सुशिक्षित बेरोजगार युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शवविच्छेदन अहवाल सार्वजनिक करण्याची मानवाधिकार संघटनेची आक्रमक मागणी

## दफन केलेला मृतदेह बाहेर काढून पोस्टमार्टम प्रशासनाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - नेर तालुक्यातील अजंती पारधी बेड्यावर राहणाऱ्या नऊ वर्षीय बालिका अन्वी अडाणी भोसले हिच्या संशयास्पद मृत्यू प्रकरणाने आता गंभीर वळण घेतले असून, शवविच्छेदनाचा अहवाल तात्काळ सार्वजनिक करावा, अशी जोरदार मागणी आंतरराष्ट्रीय मानवाधिकार असोसिएशन, दिल्ली शाखा यवतमाळच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे.

१ मे रोजी अन्वीचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. सुरुवातीला कोणतीही सखोल वैद्यकीय तपासणी न करता तिच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आल्याचा आरोप होत आहे. मात्र मृत्यूबाबत संशय निर्माण झाल्यानंतर आणि प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित झाल्यानंतर मानवाधिकार



संघटनेने या प्रकरणाचा सातत्याने पाठपुरावा केला. संघटनेच्या दबावानंतर अखेर ९ मे रोजी दफन केलेला मृतदेह बाहेर काढून शासकीय यंत्रणेच्या उपस्थितीत शवविच्छेदन करण्यात आले. या घटनेनंतर आता पोस्टमार्टम अहवालात नेमके काय समोर येणार, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. मानवाधिकार संघटनेने जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात अनेक गंभीर मुद्दे उपस्थित केले आहेत. अन्वी भोसले मृत्यू प्रकरणाचा संपूर्ण चौकशी अहवाल लेखी स्वरूपात संघटनेला द्यावा, शवविच्छेदन व फॉरेन्सिक तपासणी अहवाल सार्वजनिक करावा, महसूल, पोलीस आणि आरोग्य विभागाने आतापर्यंत कोणती कारवाई केली याची माहिती जाहीर करावी, तसेच या प्रकरणात प्रशासनाकडून निष्काळजीपणा झाला का, याची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी अजंती पारधी बेड्यावर प्रत्यक्ष भेट देत परिस्थितीची पाहणी केली होती. त्यानंतर माध्यमांतून आवाज उठवत प्रशासनाला कारवाईस भाग पाडल्याचा दावा संघटनेकडून करण्यात आला आहे. निवेदन देतेवेळी जिल्हाध्यक्ष विवेक वानखडे, मकसूद अली, विजय मालखेडे, नितीन भुसरेड्डी, रविश वाघ, कलीम खान, मोहसीन शेख, विशाल बावनथडे यांच्यासह संघटनेचे अनेक पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. या निवेदनाच्या प्रती जिल्हा पोलीस अधीक्षक आणि तहसीलदार यांनाही पाठविण्यात आल्या आहेत. "एका अल्पवयीन बालिकेच्या मृत्यूचे नेमके कारण अद्याप अस्पष्ट असताना प्रशासनाची शांत भूमिका संशय अधिक गडद करणारी आहे. समाजात न्याय आणि समानतेचा विश्वास टिकवायचा असेल, तर प्रशासनाने पारदर्शकता राखून सत्य जनतेसमोर आणलेच पाहिजे," अशी ठाम भूमिका मानवाधिकार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

# वीज वितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांची ग्राहकांसोबत उद्धट वागणूक

## त्वरित उपाययोजना करण्याची मागणी, विजेच्या लपंडावाने झरी तालुकावासी त्रस्त

**जनमाध्यम प्रतिनिधी**

झरी - तालुक्याचा विजेला पण नावाने नागरिक प्रचंड हैराण झाले असून वीज वितरण कंपनीविरोधात जनतेचा प्रचंड संताप व्यक्त होत आहे. याबाबत वीज वितरण विभागाला सांगितले असता कर्मचारी ग्राहकाला उद्धट वागणूक देत असल्याने नागरिकांत रोष निर्माण झाला आहे. तालुक्यात १०६ गावे असून सर्वात मोठे गाव म्हणून मुकुटबन, आळेगाव, पाटण या गावाची ओळख आहे. तसेच संपूर्ण तालुक्यात हजारो वीज ग्राहक जवळ विजेचे कनेक्शन जोडलेले आहे.

विजेच्या लपंडावाने वीज कनेक्शन असून नसल्यासारखेच पाहायला मिळत आहे. उन्हाळा असो की पावसाळा किंवा हिवाळा प्रत्येक ऋतूत थोडीही वारा आला किंवा पाऊस तरीही लाइन बंद पडते. त्यामुळे नागरिकांना गर्मीमध्ये मोठा त्रास सहन करावा लागतो. अनेक गावातील पाणीपुरवठा दळणवळण ठप्प पडले जाते. याबाबत वीस ग्राहकांनी वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्याने किंवा कर्मचाऱ्यांना विचारणा केली असता वरून फॉल्ट असल्याचे सांगल्या जाते तर काही कर्मचारी वीज ग्राहकांसोबत उद्धट बोलतात. त्यामुळे वीज वितरण कंपनीच्या कर्मचारी अधिकाऱ्याविरुद्ध जनतेत प्रचंड संताप उफाळला आहे. वीज वितरण कंपनीमध्ये लाइनमन सोडून खासगी लोकांचा भरणा मोठ्या प्रमाणात केला असून खासगी लोकच लाइनचे काम करीत असल्याचे पाहायला मिळत आहे. लाइनमनला याबाबत तक्रार केली असता ते खासगी लोकांकडे बोट दाखवितात व त्यांच्याकडून करून घेण्याची सांगतात, त्यामुळे वीज वितरण कंपनीचे कर्मचारी नावालाच आहे का? असाही संतप्त प्रश्न उपस्थित केल्या जात आहे. मुकुटबन हे गाव बाजारपेठेने तसेच लोकसंख्या सर्वात मोठे असून इथे खासगी व्यावसायिक मोठ्या प्रमाणात कंपन्या, कोळसाखानी व इतरही आहे. विजेच्या लपंडावाने ग्रामवासीसह व्यापारी व औद्योगिक क्षेत्रात याचा मोठा परिणाम होताना दिसत आहे. तरी मुकुटबन, अडेगाव, पाटण यांच्यासह तालुक्यातील विजेच्या लपंडावाचा होणारा त्रास कमी करून लाइन दुरुस्ती करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

# अंजनगाव सुर्जी तालुक्यात अवैध वृक्ष कटाईला ऊत

**अंजनगाव सुर्जी/ वार्ताहर**

तालुक्यात सर्वात मोठ्या प्रमाणात सर्रास अवैध वृक्ष कटाई होत असून संबंधित शासकीय अधिकारी कोणतीही कार्यवाही करीत नसल्याने तस्करांना रान मोकळे झाले आहे.

अंजनगाव सुर्जी तालुक्यातील चौसाळा, निमखेड, कोकर्डा, सातेगाव , भंडाराज, धनेगाव, बोराळा, विहिगाव , चिंचोली तसेच अचलपूर तालुक्यातील शिंदी, कोल्हा- काकडा या शिवारांमधून बंगाली बाभळीचे झाड, कडूनिंब, आड जातीच्या झाडाची मोठ्या प्रमाणात कटाई होत आहे.

## महसूल वन विभाग गप्प का?

कटाई केलेला माल मालवाहू गाडीने बिनधास्त शहरातील काही आरामशीन वर अधिकाऱ्यांच्या आशीर्वादाने येत आहे. महसूल अधिकारी, मंडल अधिकारी, तलाठी त्याचप्रमाणे वन विभागाचे व पोलीस विभागांचे अधिकारी हे काहीच कार्यवाही करीत नसल्याची चर्चा जनतेत आहे. या संपूर्ण प्रकाराकडे वरिष्ठ अधिकाऱ्याची सुद्धा लक्ष नसल्याचे जनतेत बोलल्या जात आहे. झाडे कटाईच्या तस्करी धंद्यामध्ये शहरातील काही तस्करांचा सहभाग मोठा असून हे तस्कर सकाळपासून जंगलातील माल शोधून त्याबाबतचे वृक्ष कटाईचे नियोजन आखत असतात.

या तस्करांचे मधुर संबंध काही अधिकारी कर्मचाऱ्यांसोबत असल्याची चर्चा सुद्धा शहरात आहे. संपूर्ण तालुक्यातून वृक्ष कटाई चा माल दिवसाढवळ्या शहरात येत असताना अधिकारी कर्मचारी कार्यवाही का करत नाही असा संतप्त सवाल जनतेत केल्या जात आहे. महसूल



प्रशासन तसेच वन विभागाच्या कर्तव्यदक्षतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. वन विभागाच्या तसेच महसूल विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी शहरातील व ग्रामीण भागातील आरा मशीन वर येणाऱ्या मालाची तपासणी मोहीम सुरू करण्याची मागणी जनतेत केल्या जात आहे. त्याचप्रमाणे या गंभीर प्रकाराकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष देणे गरजेचे असून अवैध झाडाच्या कटाई विरुद्ध पोलिसांनी सुद्धा कार्यवाही करण्याची गरज आहे.


अवैध वृक्षतोड करणारे गुन्हेगारी प्रवृत्तीचे असून अनेक वेळा या तस्करावर गुन्हे दाखल करण्यात आले आहे. शेतातील झाड तोडत असताना अनेक वेळा शेतकरी या गुन्हेगारी प्रवृत्तीच्या तस्कराना पाहून शेतातून पळून जातात.

त्यामुळे या तस्करांचे मनसुबे वाढत चालले आहे,हे तस्कर मध्य रात्री झाडांची कटाई करत असून सुर्योदय होण्यापूर्वी शहरात दाखल होतात. हे सर्व प्रकार वन विभाग, पोलीस विभाग, महसूल विभागाशी संगनमत करून होत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे.

# टवाळखोर बुलेटबाजामुळे नागरिक हैराण

**अंजनगाव सुर्जी/ वार्ताहर**

बुलेटच्या फटाक्यांचा धडाधड आवाज करत रस्त्यावरून धावणाऱ्या दुचाकीमुळे अंजनगावकर त्रस्त झाले आहेत. रात्री, अपरात्री रस्त्यांवरून धडाधड आवाज करत जाणाऱ्या या बुलेटबाजांमुळे पादचारी आणि विशेषतः जेष्ठ नागरिक त्रस्त झाले आहेत. वाहतूक पोलिसांनी टाकरखेडा चौक ते नवीन बस स्थानक परिसरात रात्री अपरात्री धुडगूस घालणाऱ्या या बुलेटबाजांना आवर घालावा अशी मागणी नागरिक करताना दिसत आहेत.



रस्त्याने धडधड करत धावणारी बुलेट अनेकांची लक्ष वेधून घेते.. मात्र मागील काही वर्षांपासून बुलेट ही वेगळ्या कारणामुळे चर्चेत आहे.बुलेटच्या सायलेन्सर मध्ये बदल करून अनेक टवाळखोर तरुण फटाक्यांचा आवाज काढतात. रस्त्याने जाणाऱ्या या अशा दुचाकीमुळे सर्वसामान्य नागरिक घाबरतात, लहान मुले महिला अचानक येणाऱ्या या आवाजामुळे दचकतात. परिणामी अपघाताची शक्यता असते त्यामुळे अशा फटाके फोडणाऱ्या बुलेट बाजार वर कारवाई करण्यात यावी अशी मागणी होत आहे. मागील काही दिवसांपासून अंजनगाव शहरातील टाकरखेडा चौक ते नवीन बस स्थानक परिसरात अशाच या बुलेटबाजांनी अक्षरशः धुडगूस घातला आहे.

अनेक वेळा या टवाळखोर बुलेटबाजांना हटकण्याचा प्रयत्न काही नागरिकांनी केला असता टवाळखोर बुलेटबाज अंगावर धावून येतात त्यामुळे सामान्य नागरिक गुंड प्रवृत्तीच्या बुलेटबाजा पासून सावध भूमिका घेतात त्यामुळे या बुलेटबाज टवाळखोराचे आणखीनच मनसुबे वाढत चालले आहे.टवाळखोर बुलेटबाजावर पोलीसांनी आवर घालणे गरजेचे असून अनेक वेळा शहरात धार्मिक दंगलीला वाहन चालक ठरले आहे त्यामुळे एखाद्या वेळी या टवाळखोर बुलेटबाजामुळे जातीय दंगल होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# कत्तलीकरीता जाणारे गोवंश जप्त

**बेलोरा/ वार्ताहर**

अमरावती ग्रामीण जिल्हयातील पोलीस स्टेशन ब्राम्हणवाडा थडी येथे ८मे रोजी कत्तलीकरीता गोवंशीय जनावरे बाळगून वाहतूक करतांना किंमत अं ७८७०००/- रू.चे जनावरे व वाहने ताब्यात घेण्यात आले. यात अब्दुल राजीक अब्दुल सत्तार (वय ३५ वर्ष ०२) मुस्ताक खान इवाईम खान (वय ५५ वर्ष दोन्ही रा. ब्राम्हणवाडा) शुभम वानखडे (वय ३१ वर्ष रा विश्रोळी) यांच्यावर कारवाई करण्यात आली.



## ब्राम्हणवाडा थडी पो. ठाण्याची कारवाई

आरोपी विरुध्द ०१) अपक १६८/२६, ०२) अपक १६९/२६ कलम ५(अ), ५(व), ९ महाराष्ट प्राणी संरक्षण सुधारणा अभि १९७६, ११११) (ङ), (फ) प्राण्यांना छळ प्रतिबंधक अधिनियम १९६०. सहकलम १८४ मो.वा.का प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ग्राम चिचोली रोडलगत शेतशिवारात सापळा लावून कारवाई केली असता एका टाटा एम चारचाकी वाहन किंमत ३५००००/रू व ४ गौवंश जातीचे जनावरे किं ३६,०००/- एकुण ३८६०००/- रू,टाटा एस कंपनीचे चारचाकी वाहन किं ३५००००/रु व ०५ गौवंश जातीचे जनावरे किअं ५१०००/- रु एकून ४०१०००/- रू. एकुन २ चारचाकी वाहणे व ९ गौवंश जातीचे जनावरे असा एकूण ७,८७,०००रू गौवंश जप्त करण्यात आले असून गुन्हे दाखल करण्यात आले आहेसदरची कार्यवाही निकेतन कदम, पोलीस अधिक्षक, अमरावती ग्रागीण, दत्ता तोटेवाड, अपर पोलीस अधिक्षक, अमरावती ग्रामीण, सहाययक पोलीस अधिक्षक शुभम कुमार, उपविभाग अचलपुर, पोलीय निरिक्षक किरण वानखडे, स्थानिक गुन्हे शाखा अमरावती ग्रामीण यांचे मार्गदर्शनात सहा. पो.नि. प्रशांत जाधव ढाणेदार पो.स्टे. प्रामाणवाडा बही, पोहेकों राजु मरस्कोल्हे पोशि अनुप मानकर, पोशि अंकुश दाभाडे चालक पोशि विशाल सिंगल पो.स्टे. ब्राम्हणवाडा बड़ी यांनी केली.

# शारदा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचा निकाल ९३.१० टक्के

**अमरावती/ का.प्र.**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (एस.एस.सी.) परीक्षेचा निकाल जाहीर झाला. स्थानिक मराठा शिक्षण संस्थेअंतर्गत कार्यरत शारदा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, अमरावती यांनी यंदाही उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखत ९३.१० टक्के निकालाची उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

विद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट गुण संपादन करून संस्थेचे नाव उज्ज्वल केले आहे. यामध्ये १७ विद्यार्थी प्राविण्य श्रेणीत उत्तीर्ण झाले असून २९ विद्यार्थी प्रथम श्रेणीत तर २५ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत





विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये अंजली अच्छेलाल कारपेंटर हिने ९१.४० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. कृतिका शिरभाते हिने ८८.८० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला, तर माही गावंडे हिने ८८.०० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक प्राप्त केला.

यशाबद्दल मराठा शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा मालती भोयर, सचिव डॉ. अमोल भोयर तसेच संस्थेच्या सर्व सभासदांनी गुणवंत विद्यार्थी, त्यांच्या पालकांचे व शिक्षकवृंदाचे अभिनंदन करून कौतुक केले.शारदा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य व्ही. एस. भोयर तसेच पर्यवेक्षक ए.डी.भोयर यांनी विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# तीन किलोमीटरच्या अंतरात चार नाल्या

**बेलोरा/ वार्ताहर**


चांदूरबाजार पोलीस स्टेशन अंतर्गत बेलोरा ते चांदूरबाजार मार्गावर बेलोरातून निघत असताना तीन किलोमीटर अंतरावर ठेकेदाराने चार नाली खोदून ठेवले आहे. त्यामुळे दुचाकी वाहना चालकाचे अनेक मोठे अपघात झाले आहे. बेलोरा येथील वामनराव हुसंग बादे यांचा मुलगा नालीवरून दुचाकी उचलून गंभीर जखमी झाला. प्रथम ग्रामीण नंतर अमरावती आीण नागपूर रेफर करण्यात आले.राजुरा येथील उत्तम वाटणे हे सुद्धा गंभीर जखमी झाले.अनेक दुचाकी व फोर व्हीलरएक्सल तुटून अपघात झाले आहे. दुचाकीवर बसलेल्या महिलेच्या हातातून लहान बाळ घसरून जखमी झाले आहे.तक्रार जर दिली तर उलट पोलीस आपल्यावर गुन्हा दाखल करणार.यामुळे तक्रार दिल्या जात नाही. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ठेकेदारावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी जोर धरत आहे.



याकडे नवनीत राणा, आ. बच्चू कडू लक्ष देणार काय?

# नारायणदास लढ्ढा हायस्कूलची दहावीच्या परीक्षेत यशस्वी झेप





**अमरावती/ का.प्र.**

विदर्भातील नामांकित हिंदी भाषिक दर्जा प्राप्त संस्था श्री ब्रजलाल बियाणी शिक्षा समिती अंतर्गत नारायणदास लढा हायस्कूलने दरवर्षी प्रमाणे यावर्षीही दहावी बोर्ड परीक्षेत यशाची परंपरा कायम राखली.नारायणदास लड्ढा हायस्कूलचा मागील वर्षी १००% निकाल असून यावर्षी सुद्धा १००% निकाल लावून यशोशिखर गाठले.

शाळेतून एस. एस.सी परीक्षेला एकुण ११२ विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यापैकी ४९ विद्यार्थी प्राविण्य श्रेणीत, ४२ विद्यार्थी प्रथम श्रेणीत, २० विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले असून ०१ विद्यार्थी पास झाला. शाळेचा निकाल १००% लागला.स्वरा भुस्कडे या विद्यार्थिनीने ने ९७.०० %गुण प्राप्त करून शाळेत प्रथम येण्याचा मान पटकविला. अथर्व ढोकणे तसेच आनंदी अजय माळोदे यांनी ९५.००% गुण प्राप्त करीत द्वितीय क्रमांक तर शिवंजली केवले हिने ९३.८०% गुण प्राप्त करीत तृतीय क्रमांक मिळविला. तसेच नम्रता राऊत या विद्यार्थिनीने ९३.४०% गुण प्राप्त करून चौथा क्रमांक तर दुर्वेश पातुर्डे याने ९३.२०% गुण मिळवीत पाचव्या क्रमांकाचा मानकरी ठरला.

ब्रजलाल बियाणी शिक्षा समितीचे अध्यक्ष ओमप्रकाश जी लड्ढा , शाळा समिती अध्यक्ष ॲड. अशोकजी राठी, संस्थेचे सचिव सुनीलजी गोयनका, संस्थेचे उपाध्यक्ष पंडित देवदत्तजी शर्मा, विनोदजी सामरा आणि संस्थेचे कोषाध्यक्ष गोपालजी राठी तसेच संस्थेचे व शाळा समितीचे सर्व सन्माननीय पदाधिकारी यांचे मार्गदर्शन शाळेला नेहमीच लाभत असल्यामुळे शाळेने नेत्रदिपक यश प्राप्त केले.

विद्यार्थ्यांना शाळेच्या मुख्याध्यापिका सुषमा अ. माळवे तसेच पर्यवेक्षिका ज्योती करवा, वर्ग शिक्षक वर्षा वैदकर, त्रिशला शर्मा तसेच वर्ग ५ ते १० पर्यंत शिकविणाऱ्या सर्व विषय शिक्षकांकडून उत्कृष्ट मार्गदर्शन लाभल्यामुळे विद्यार्थी गुणवत्ता यादीमध्ये चमकले व आपला यशाचा तुरा कायम ठेवला.

# संक्षिप्त

## आचार्य पदवीने अदिती ठाकरे सन्मानित

**अमरावती-** मानव विद्या शाखेची विद्यार्थिनी अदिती संजय ठाकरे यांना संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने राज्यशास्त्र या विषयात आचार्य पदवी प्रदान केली आहे. त्यांचा संशोधनाचा विषय 'महाराष्ट्राची राजकारणामध्ये युवकांच्या सहभागाचे चिकित्सक विश्लेषण' असा आहे. संशोधन केंद्राचे अध्यक्ष डॉ. जयंत करमोरे तथा डॉ. ज्योती डी ठाकरे यांच्या मार्गदर्शनात अदिती ठाकरे यांनी आपले संशोधन पूर्ण केले. संशोधनाचे केंद्र स्व. मदन गोपाल मुंदडा कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय चांदुर रेल्वे होते. अदिती या माजी वरिष्ठ आकाशवाणी उद्घोषक संजय ठाकरे व नाट्यकर्मी सुप्रिया ठाकरे यांच्या कन्या असून राहुल पाटील यांच्या पत्नी आहेत. राज्यशास्त्र विषयात आचार्य पदवी प्राप्त केल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



## बादल राठोड यांची नियुक्ती



**अमरावती-** राष्ट्रीय सैनिक संस्था महाराष्ट्र राज्य मुख्यालय, यवतमाळ येथे आयोजित बैठकीमध्ये राष्ट्रीय सैनिक संस्थेचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष हरीश्चंद्र राठोड यांनी अमरावती जिल्हा युवा विंग अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची नियुक्ती केली.त्यामध्ये राष्ट्रीय सैनिक संस्था अमरावती जिल्हा युवा विंग उपाध्यक्षपदी अमरावतीचे बादल राठोड यांची निवड करण्यात आली.बैठकीस सहा. संचालक रुपाली राठोड, राष्ट्रीय सैनिक संस्था विदर्भ अध्यक्ष अभयकुमार गुप्ता, राष्ट्रीय सैनिक संस्था विदर्भ जनसंपर्क अधिकारी जगदीश जांगीड, अमरावती विभागीय अध्यक्ष अभिषेक राजहंस, विभागीय सचिव मुस्कान सैय्यद, विभागीय जनसंपर्क अधिकारी सुनील महल्ले, तसेच शाहीद सैय्यद, विक्की धुळे, संजीवनी पवार, बदल राठोड इतर सदस्य उपस्थित होते.


## छत्रपती संभाजी महाराज जयंती सोहळा

**अमरावती-** डी एम एक्स ग्रुप रक्तदाता संघ महाराष्ट्र राज्य महाराष्ट्र राज्य यांच्या विद्यमाने अर्जुन नगर चौक अमरावती येथे बुधवार १४ मे२०२६ रोजी छत्रपती संभाजी महाराज यांचा ३६९वा जयंती उत्सव सोहळा मोठ्या थाटात होणार आहे. छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंती सोहळ्यानिमित्त अर्जुन नगर चौक अमरावती येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून सायंकाळी ६ वाजता प्रमुख मान्यवर यांच्या शुभहस्ते महाआरती होणार आहे. या जयंती सोहळ्यामध्ये वक्रतुंड ढोल ताशा व ध्वज पथक हे मुख्य आकर्षण राहणार असून कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुणे महापौर श्रीचंदजी तेजविणी,आमदार सुलभा खोडके, आमदार प्रविणजी तायडे,आमदार राजेशजी वानखडे,माजी महापौर चेतनजी गावंडे,माजी नगरसेवक तुषारजी भारतिय,भाजपा महामंत्री प्रशांत शेगोकार,प्रहार जिल्हाप्रमुख छोटू महाराज वसू उपस्थित राहणार आहे.



## विवेक गावंडे यांचे निधन

**अमरावती-** स्थानिक गाणू वाडी, जुना बायबास रोड येथील प्रतिष्ठीत नागरिक विवेक रामकृष्ण गावंडे यांचे रविवारी (दि १०) सकाळी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ७२ वर्ष होते. त्यांच्या पश्चात होलीक्रॉस इंग्लीश कॉन्वेंट येथून निवृत्त झालेल्या पत्नी श्रीमती संध्या मॅडम, मुलगा देवाशीष,स्नुषा आणि कन्या देवांगी असा आप्तपरिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर हिंदू स्मशान भूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



## ७७ अतिक्रमित कच्च्या घरकुलांचे मालकी हक्काचे पट्टे वाटप होणार

### जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या सूचना

**अमरावती/ का.प्र.**

महानगरपालिकेच्या हद्दीतील शासकीय जमिनीवरील प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत असलेल्या निवासी अतिक्रमणांना नियमित करण्याच्या दृष्टीने जिल्हा प्रशासनाने अत्यंत महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. महानगरपालिका क्षेत्रातील मारुतीनगर (पेठ अमरावती), सातुर्णा (जुने गावठाण) आणि महाजनपुरा या भागांतील एकूण ७७ कच्चे बांधकाम असलेल्या घरकुलांचे मालकी हक्काचे पट्टे वाटप करण्याचा मार्ग आता मोकळा झाला असल्याचे जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी जाहीर केले आहे.

या निर्णयामुळे अनेक वर्षांपासून कच्च्या घरांमध्ये राहणाऱ्या गरीब कुटुंबांना स्वतःच्या हक्काचे घर आणि मालकी हक्क मिळण्यास मोठी मदत होणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने २५ मार्च २०२६ रोजी घेतलेल्या निर्णयानुसार, राज्यातील शासकीय जमिनींवरील १ जानेवारी २०११ पर्यंतची निवासी अतिक्रमणे काही विशिष्ट अटींवर नियमित करण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे. याच धोरणाची अंमलबजावणी आता अमरावती महानगरपालिका क्षेत्रात टप्याटप्प्याने सुरू करण्यात येत आहे. शासकीय नियमांनुसार, ज्या नागरिकांनी १ जानेवारी २०११ पूर्वी शासकीय जमिनीवर निवासी उद्देशाने अतिक्रमण केले आहे, तेच या योजनेसाठी पात्र ठरतील. यामध्ये कमाल १५०० चौ. फूट क्षेत्रापर्यंतची अतिक्रमणे नियमित केली जाणार असून, त्यातील ५०० चौ. फुटांपर्यंतचे क्षेत्र नागरिकांना पूर्णपणे मोफत (विनामूल्य) दिले जाणार आहे. त्यावरील अतिरिक्त क्षेत्रासाठी शासनाने ठरवून दिलेले विहित शुल्क (कब्जेहक्क रक्कम) भरावे लागेल. शुल्क भरल्यानंतर संबंधित पती-पत्नीच्या संयुक्त नावाने भोगवटादार वर्ग-२ म्हणून अधिकृत मालकी हक्काचे आदेश प्रशासनाकडून निर्गमित केले जातील. या प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी आणि सुरक्षिततेचा विचार करून काही कडक निकषही लावण्यात आले आहेत.

# लोकभावना ओळखण्यात इंडी आघाडी कमी?

गत एक तपापासूनच्या निवडणुकीत भाजपा आणि मित्रपक्षांचा आलेख चढत जात आहे.याउलट काँग्रेस आणि मित्रपक्षाला उतरती कळा लागलेली दिसते.इंडी आघाडीने वोटिंग मशीन, एसआयआर, मतदार याद्या, निवडणूक आयोग यांच्या नावे कितीही रडीचा डाव खेळू द्यात.पण जनतेने त्यांना नाकारले हे जनतेलाही पूर्ण माहीत आहे आणि इंडी आघाडीलाही.निवडणूका हारल्या की त्यांचे अरण्यरुदन आता मतदारांनाही पाठ झाले. बहुतांश मतदारात इंडी आघाडी विषयी प्रचंड संताप आहे.त्यामुळे इंडी आघाडीला सुगीचे दिवस आणण्यासाठी चिंतनाची गरज आहे.त्याची कारणमिमांसा पाहिली तर इंडी आघाडीला लोकमताचा आणि लोकमनाचा ठाव घेताच येत नाही

.भाजपा विरोधाच्या नादात त्यांच्या तोंडून केंव्हा देशविरोधी वक्तव्ये बाहेर पडतात त्यांचे त्यांनाच समजत नाही.परिणामी देशातील जनता त्यांच्या विरोधात जाते.याउलट नेमके भारतीय जनतेला काय पाहिजे याची नाडी भाजपाने समजून घेतली हे तथ्य नाकारता येणार नाही.मुस्लिम तुष्टीकरणाच्या नादात हिंदुत्वाला न कळत होणारा विरोध इंडी आघाडीला समजू नये याचेच आश्चर्य वाटते.धर्मनिरपेक्षता म्हणजे मुस्लीम तुष्टीकरण आणि हिंदुंचा विरोध हे त्यांच्या डोक्यात बसलेले सूत्र त्यांना भस्मस्नान घालत आहे.

श्रीराम मंदिरामुळे भाजपाला उठाव मिळाला मग त्यांच्या नेमके विरोधात म्हणजे श्रीराम हे काल्पनिक पात्र म्हणून प्रतिज्ञापत्र सादर करण्याचा मूर्खपणा इंडीने करावा म्हणजे स्वहस्ते कुठाराघात आहे.भगवान श्रीराम या देशाचा प्राण आणि अस्मिता आहे.निमंत्रण मिळूनही अयोध्येत न जाण्याचा करंटेपणा घसरणीसाठी कारण ठरतो.मुख्य कार्यक्रमात जावू द्या पण त्यानंतर तर अयोध्येत एकदा जावून या!पण नाही! अयोध्येच्या जनतेने इंडी आघाडीचा खासदार निवडून दिला निदान त्याचे निमित्त करून तर जायला हवे होते? ही साधी गोष्ट समजू नये? सारे अनाकलनीय आहे.मोदी विरोधासाठी 'सर्जिकल स्ट्राईक' केल्यावर सैनिकांचे अभिनंदन करायचे दिले सोडून आणि त्यांना पुरावे मागण्याचा शेखचिल्लीपणा केला आणि सारा भारत इंडी आघाडीच्या विरोधात पेटला.



अमेरिका इराण युद्धात भारताची कुटनीती संतुलित होती.त्या युद्धाशी भारत म्हणून आपली सावध भूमिका योग्य होती.युद्धाचा काळ होता.पेट्रोल,गॅस तुटवडा होण्याची शक्यता होती.अशावेळी मोदींनी वापरलेली नीती कृष्णनीती होती.पण इंडीवाले मात्र मोदींनी भूमिका स्पष्ट करावी,ट्रम्प समोर झुकू नये,इराणला पाठिंबा द्यावा अशी मूर्ख वक्तव्ये करत होते.भगवान श्रीकृष्णानेही राष्ट्रहितासाठी कुटनीती वापरतांना रणछोडदास म्हणवून घेतले पण देशहित साधलेच.पण इंडिवाले राम कृष्ण काल्पनिक समजतात मग त्यांना काय त्यांच्या नीतीचे?

इतकेच नाही तर मोदी विरोधाच्या नादात कुठलीही मोठी टंचाई नसतांना रस्त्यावर चुलीवर स्वयंपाक,गॅस सिलिंडरच्या शवयात्रा त्यांनी काढल्या.देशातील जनता सुज्ञ आहे.त्यांनी मोदींना समजून घेतले आणि इंडी आघाडीचा आगाऊपणाही लक्षात घेतला.संकटाच्या काळात काय भूमिका घेतली पाहिजे हे ही यांना कळू नये हे त्यांच्याच साठी दुर्दैवी आहे.मोदी विरोधाच्या नादात लोकविरुद्ध भूमिका घेऊन उद्धव ठाकरे,अरविंद केजरीवाल,ममता,अखिलेश,लालू ,शरद पवार यांची दुकाने अक्षरश: बंद झालीत.तरीही त्यांचे डोळे उघडतांना दिसत नाहीत.ममता बॅनर्जी यांनी मुस्लिम तुष्टीकरणाच्या नादात हिंदू मतदारांना अक्षरश: लाथा घातल्या परिणाम समोर आहे.

महाराष्ट्रात सध्या रोहित पवार स्व.अजितदादांच्या प्रकरणावरून धूम करत आहेत.त्यांची ओरड लोकांच्या पचनी पडत नाही.एक तर अजितदादा जिवंत असतांना हेच रोहित पवार मर्यादा लांघून अजित दादांना वाटेल ते बोलत होते.त्यामुळे जनता रोहित पवार टीव्ही वर आले की शिव्या घालते.दुसरे म्हणजे स्व.अजितदादांची पत्नी,मुलगा सरकारमध्ये प्रमुख पदावर आहेत.त्यांना काळजी नसेल का ? पण चहा पेक्षा केटली गरम सारखे हे रोहित पवार कर्नाटकात जा,राहुल गांधींना भेट अशा उगाच मर्कट उड्या मारताहेत.लोकांना ते अजिबात आवडत नाही.ही बाब त्या पक्षाला समजू नये हे आश्चर्यच आहे.वीट येईल इतका आकांत तांडव लोकांना नाटक वाटू लागला.खासदारकीची शपथ घेतांना शरद पवार साहेबांची अवस्था पाहून महाराष्ट्र संवेदनशील झाला नाही उलट सेवानिवृत्त व्हा म्हणून सामान्य माणूस प्रतिक्रिया देत होता.इतरांना वयाचा सल्ला देणारे स्वत:च्या वेळी जर्जर होईपर्यंत खुर्चीची लालसा ठेवायची.कसली आली जेन झी?इंडी आघाडीला कल्पनाच नाही की स्वातंत्र्यवीर सावरकरांना विरोध करणारे खूपच अल्पसंख्य आहेत. उलट त्यांना मानणारा वर्ग देशभरात प्रचंड संख्येत आहे.श्री.राहुल गांधींनी एकदा विरोधात विषय मांडावा आणि भूमिका स्पष्ट करून मोकळे व्हावे.पण रोज रोज सावरकरांना विरोध केल्याने त्यांची जन्मठेप,काळे पाणी,कोलूचा दांडा,यातना आणि तेही सतत दहा वर्ष हे सगळे लोकांना आठवते आणि मग लोकभावना तिव्र होतात.कुठे पप्पू व्यक्तिमत्व आणि कुठे वीर सावरकर ही तुलना होते आणि साहजिकच आलेख घसरतो.एखादा विषय किती ताणायचा आणि कुठे थांबवायचा हे न समजल्याने त्यांची दैना होत आहे.

स्वत: तटस्थ म्हणणारे सर्वश्री विश्वंभर चौधरी,निखिल वागळे, असिम सरोदे यांच्यासारखे अजून काही लोक जेंव्हा प्रत्येक बाबीत विषारी वक्तव्ये करतात.म्हणजे बंगालचा विजय असंवैधानिक आणि त्याच वेळी केरळ,तामिळनाडूवर या तथाकथित 'निर्भय बनो'चे मूग गिळून बसणे लोकांमध्ये चिड उत्पन्न करते.त्यांच्या खालच्या प्रतिक्रिया वाचल्यावर हे लक्षात येईल.

आता आता वारकरी संप्रदायावर उगाच वक्तव्य करण्याची काहीच गरज नव्हती.त्यात हभप श्री.भास्करगिरी महाराज,श्री.रामगिरी
महाराज,श्री.बंडातात्या,श्री.चंद्रशेखर महाराज ही पूजनीय संतमंडळी आहेत.श्री.लवांडे सारख्या माणसाने त्यांच्यावर अश्लाघ्य बोलावे आणि त्यानंतर कोणीही तोंडसुख घ्यावे.तुम्हाला काय वाटते की लोकांना हे आवडले?फक्त तोंडसुखाचा आनंद मिळेल इंडी आघाडीला.लोकांमध्ये प्रचंड रोष आहे.तो दिसतही आहे.मतपेटीतून तो दिसेलही.या विषयाला नको तितके ताणल्या गेले.त्यांच्यावर फेकलेल्या शाईचे अजिबात समर्थन नाही पण लोकांच्या प्रतिक्रिया वाचा.यांच्या उतरत्या आलेखाला यांच्याच भूमिका जवाबदार आहेत.

'शिवाजी कोण होता' या प्रकरणात शिवीगाळीचा निषेधच पण या प्रकरणावरून उठलेल्या राळीत पुस्तकाचा खप वाढला पण पुस्तकातील विचार सर्वसामान्यांना रुचतीलच असे नाहीत.या ही प्रकरणात नको तितके ताणले पण खर सांगु इंडीवाले मान्य करणार नाहीत पण लोकभावना पुस्तकामागे नाहीत. कुंभमेळ्यातील भ्रष्टाचारावर विरोध करा पण हिंदूधर्मावर, साधूसंतांवर तोंडसुख कशासाठी ? कुंभावर अश्लाघ्य बोलताना हजवर मुखरोग झाल्यागत वागतात.जनता प्रतिक्रिया देत नाही असे वाटत असेल तर हा इंडी आघाडीचा फाजील आत्मविश्वास आहे.लोकमत फेसबुक wapp पेक्षा मतपेटीतून दिसते.

दुसऱ्याचे सरण रचण्याच्या नादात स्वत:चेच चिताभस्म गंगेत टाकण्याची वेळ येत आहे.विचारधारा कायम ठेवा,विरोध कायम ठेवा पण अति सर्वत्र वर्ज्यते या नियमानुसार अति करू नका.प्रमाणामध्ये सर्व काही असावे.या उलट भाजपा आणि मित्रपक्ष जनतेच्या मनातील भावना ओळखून योजना आखतात आणि जनता त्यांना डोक्यावर घेते.तामिळनाडूत थळपती विजय सत्तेत बसतांना त्यांनी मी आर एस एस चा विरोधक आहे हे स्पष्ट केले.आणि शपथविधीला संपूर्ण वंदेमातरम घेऊन लोकमत जिंकले.हे शहाणपण इंडी ला का जमू नये?

तीनशे सत्तर,समान नागरी कायदा,सीएए ,एनआरसी,ट्रिपल तलाख,पाकिस्तान बाबत कडक भूमिका,रोहिंगे,घुसखोर यांना देशातून घालवणे,सिमा सुरक्षा ,वंदे मातरम हे लोकांच्या मनातील विषय आहेत.संपूर्ण देश यासाठी उभा राहतो.मोदीसरकार हे लागू करण्यासाठी ताकदीने बोलते.लोकांना ते आवडते.इकडे आपले राहुल गांधी संसदेत विदूषकी भूमिका निभावतात.ज्येष्ठ मंडळी त्यांच्या ' हो मध्ये हो ' मिसळतात.अशाने कसे चालेल?

तुमच्या पेक्षा तो ओवेसी हुशार आहे.मुस्लिमधर्जिनी भूमिका घेतो पण देशविरोधी वक्तव्य होणार नाही याची काळजी घेतो.विदेशात गेल्यावर भारताची बाजू मांडतो.तुम्ही मात्र अशी वक्तव्ये करता की लोकांना वाटते यांना सत्ता दिली तर देशाचे काही खरे नाही.हे सत्तेच्या बाहेरच बरे!

सद्यस्थिती पाहता लोकांसमोर सध्यातरी मोदींना पर्याय नाही.तो पर्याय निर्माण करायचा असेल तर लोकभावना लक्षात घ्या.दिवास्वप्नात राहू नका. असेच चालू राहिले तर सत्तेचा स देखिल आपल्याला मिळणार नाही. लक्षात ठेवा!यद्यपि सत्यं, लोकविरुद्धम,ना करणीयम् नाचरणीयम्! तुमचे मत काहीही असू द्या पण ते लोकविरुद्ध असेल तर त्यावर साक्षीभावाने विचार व्हावा!

अजून एक!कोणी कितीही काँग्रेसमुक्त भारत किंवा भाजपामुक्त भारत म्हणू द्यात.या देशातील हे दोन पक्ष कधीच संपणार नाहीत कारण या दोन्ही पक्षांची मुळे खोलवर रुजलेली आहेत.मजबूत आणि परिपक्व विरोधी पक्ष देशासाठी आवश्यक आहे.

'तस्मात उत्तिष्ठ कौन्तेय ' हे प्रांजळ आणि प्रामाणिक मत !

विद्यावाचस्पती
**प्रा.दिलीप जोशी,** वाशिम.
मो.९८२२२६२७३५

# अधिकमास महात्म्य

यावर्षी १७ मे पासून अधिक मास आहे. यालाच मलमास किंवा पुरुषोत्तम मास असेही म्हणतात. हिंदू पंचांगाप्रमाणे चैत्र ते फाल्गुन असे बारा महिने असतात. मग हा तेरावा महिना कसा? असा प्रश्न पडतो. या एक वर्षातील पौर्णिमांचे एक चांद्र वर्ष होते.तर एका वर्षात सूर्याचे बारा राशीतून संक्रमण होते. त्याला सौर वर्ष म्हणतात. चांद्र व सौर वर्षांमध्ये दहा ते बारा दिवसांचा फरक असतो. हा फरक जेव्हा दोन अडीच वर्षानंतर ३० दिवसांचा होतो तेव्हा कालगणनेचा मेळ बसवण्यासाठी एक 'अधिक मास' येतो. या चांद्र महिन्यात सूर्याचे राशी संक्रमण होत नाही .म्हणजेच अधिकमासात संक्रांत नाही. शिवाय हा अधिक मास विशिष्ट महिन्यात पण येत नाही. प्रत्येक महिन्याला त्याची एक देवता असते. पण या महिन्याची कोणतीच देवता नसल्यामुळे तो अशुभ ठरला.

या महिन्यात कोणतेही सणवार येत नाहीत. लग्नकार्याचे मुहूर्त सुद्धा नाहीत. अगदी श्राद्धपक्षही केले जात नाही. त्यामुळेच याला 'मलमास' असे म्हणतात. श्रीकृष्णाने मात्र या मलमासाची व्यथा जाणून त्याच्यावर कृपा केली. आणि स्वतःचे 'पुरुषोत्तम' असे नाव त्याला दिले. म्हणून अधिकमासाला 'पुरुषोत्तम मास' असे म्हणतात. या महिन्यात जो जप-तप, होम- हवन, उपवास, पुण्य नदीस्नान करेल, दानधर्म करेल, पूजा अर्चना करेल, त्याच्यावर श्रीकृष्णाची कृपा होईल. त्यांची इच्छापूर्ती होईल.आणि पुण्य प्राप्त होईल. भगवान पुरुषोत्तमाच्या कृपेने मुक्ती मिळेल .त्यामुळे अधिक मासाचे महत्त्व आहे असे शास्त्र सांगते.

यावर्षी हा अधिक मास ज्येष्ठ महिन्यात आला आहे.अधिकमासात महिनाभर देवाजवळ तुपाचा दिवा लावणे ,एकभूक्त राहणे,तसेच भागवत, रामायण, विष्णुसहस्त्रनाम ऐकावे किंवा वाचावे. तसेच अधिक महिन्यात श्रीविष्णूला ३३ अनारसे किंवा बत्तासे यांचे तांब्याचा दिवा लावून दान देतात. तसेच जावायालाही विष्णू स्वरूप मानून, तुपात तळलेले ३३ अनारसे दान देतात. हल्ली चांदी- सोन्याची भांडी, अलंकार पण काही लोकं लेक- जावायला देतात. यावर्षी सोन्या- चांदीचे भाव आभाळाला टेकल्यामुळे जावयांचा हिरमोड होऊ शकतो. हे दान एकादशीला उपास करून, अधिकमास महात्म्य वाचून दुसऱ्या दिवशी द्वादशीला देतात.


एकंदरीत काय तर पुण्य संचय होणारा हा महिना आहे. खूप सारं करण्यापेक्षा श्रीकृष्णाचे अखंड नामस्मरण करावे. म्हणजे सर्वच केल्याचे पुण्य मिळते.द्वापार युगात श्रीकृष्णाचा अवतारच अधर्माचा नाश आणि धर्माच्या स्थापनेसाठी झाला.'दुष्टांचा संहार आणि सज्जनांचे रक्षण' हे ब्रीदच त्या अवताराचे प्रयोजन होते. मग आपणही भगवान श्रीकृष्णाला आवडेल असेच आपल्या हातून काहीतरी चांगले कर्म करू या. साधना करूया.साधना केल्याने मन शांत राहते. आपल्या हातून चुकीचे कर्म घडत नाही. वृत्ती समाधानी राहते. मनाला आणि चित्ताला नामाची सवय व गोडी लागते. आणि यामुळे पुरुषोत्तमाची म्हणजे श्रीकृष्णाची आपल्यावर कृपा निश्चितच होईल .

**माधवी पत्की**

# 'वर्क फ्रॉम होम'काळाची गरज

जागतिक राजकारणाच्या पटावर इराण आणि इस्त्रायल यांच्यात पेटलेला संघर्षाचा वणवा आता केवळ पश्चिम आशियापुरता मर्यादित राहिलेला नाही. या युद्धाचे पडसाद जागतिक अर्थव्यवस्थेवर आणि प्रामुख्याने भारतासारख्या विकसनशील देशावर पडू लागले आहेत. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कच्च्या तेलाच्या किमतींनी गाठलेली उच्चांकी पातळी आणि पुरवठा साखळीत निर्माण झालेला अडथळा पाहता, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'वर्क फ्रॉम होम'चा पर्याय अवलंबण्याचे केलेले आवाहन हे केवळ सोयीचे नसून ते एक 'आर्थिक संरक्षण धोरण' आहे.

भारत आपल्या गरजेच्या ८० टक्क्यांहून अधिक कच्चे तेल आयात करतो. इराण-इस्त्रायल युद्धामुळे 'हॉर्मुझची सामुद्रधनी' हा महत्त्वाचा सागरी मार्ग धोक्यात आला आहे. जर या मार्गावरून होणारा तेलपुरवठा विस्कळीत झाला, तर भारतात इंधनाचे दर गगनाला भिडू शकतात. इंधन महागले की वाहतूक खर्च वाढतो आणि पर्यायाने महागाईचा भडका उडतो. हे चक्र थांबवण्यासाठी इंधनाचा वापर कमी करणे, हाच एकमेव तात्कालिक उपाय आहे.



कोविड-१९ च्या काळात जगाने 'वर्क फ्रॉम होम'ची ताकद अनुभवली आहे. आज पुन्हा एकदा त्याच मॉडेलचा वापर करण्याची वेळ आली आहे, पण यावेळी कारण महामारी नसून 'इंधन सुरक्षा' आहे. आयटी आणि कॉर्पोरेट क्षेत्रातील लाखो कर्मचारी दररोज खासगी वाहनांनी किंवा सार्वजनिक वाहतुकीने प्रवास करतात. जर हे कर्मचारी घरून काम करू लागले, तर दररोज लाखो लिटर इंधनाची बचत होऊ शकते. हा केवळ वैयक्तिक पैशांचा प्रश्न नाही, तर देशाचे परकीय चलन वाचवण्याचा हा एक मार्ग आहे.

इंधन बचतीचा थेट फायदा पर्यावरणालाही होतो. रस्त्यांवरील वाहनांची संख्या कमी झाली की प्रदूषणात घट होते. शिवाय, कर्मचाऱ्यांचा प्रवासाचा वेळ वाचल्याने त्यांची कार्यक्षमता वाढू शकते, असे अनेक अभ्यासातून सिद्ध झाले आहे. मात्र, हे करताना केवळ आयटी क्षेत्रच नव्हे, तर ज्या ज्या ठिकाणी शक्य आहे तिथे 'हायब्रीड मॉडेल' राबवणे आवश्यक आहे.अर्थात, 'वर्क फ्रॉम होम' लागू करणे ही केवळ सरकारची जबाबदारी नाही. खासगी कंपन्यांनीही नफ्या-तोट्याच्या पलीकडे जाऊन राष्ट्रहितासाठी या निर्णयाला पाठिंबा देणे गरजेचे आहे. तसेच, इंटरनेट पायाभूत सुविधा अधिक भक्कम करणे आणि सायबर सुरक्षेची काळजी घेणे हे सरकारपुढील आव्हान असेल.

इराण-इस्त्रायल युद्ध कधी थांबेल हे आज सांगणे कठीण आहे. मात्र, या युद्धाच्या झळा आपल्या स्वयंपाकघरापर्यंत आणि खिशापर्यंत पोहोचू नयेत, असे वाटत असेल तर आपल्याला जीवनशैलीत बदल करावाच लागेल. 'वर्क फ्रॉम होम' हे केवळ कामाचे स्वरूप नसून, ते संकटकाळात देशाला साथ देण्याचे एक माध्यम आहे. पंतप्रधानांच्या या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देऊन इंधनाची बचत करणे, हीच आजच्या काळातील खरी देशभक्ती ठरेल.

**विरेंद्र सोनवणे**
मो.८८८८२४४८८३

# नर्सेस आरोग्यसेवा व्यवस्थेचा कणा

नर्सेस जीवन वाचवण्यात, रुग्णांचे परिणाम सुधारण्यात आणि समुदायांना बळकट करण्यात निर्णायक भूमिका बजावतात. दरवर्षी १२ मे रोजी साजरा केला जाणारा आंतरराष्ट्रीय परिचारिका दिन हा त्यांच्या करुणा आणि समर्पणाचा सन्मान करण्याबरोबरच त्यांना योग्य कौशल्ये, पाठबळ आणि संसाधनांनी सक्षम करण्याच्या अत्यंत महत्त्वाला ओळख देण्याची संधी आहे. आंतरराष्ट्रीय परिचारिका दिनाची कहाणी १९७४ मध्ये सुरू झाली. जेव्हा इंटरनॅशनल कौन्सिल ऑफ नर्सेसने दरवर्षी १२ मे रोजी हा दिवस साजरा करण्याचा अधिकृतपणे निर्णय घेतला. ही तारीख फ्लॉरेन्स नाइटिंगेल यांच्या सन्मानार्थ निवडण्यात आली, ज्यांच्या कार्यामुळे आरोग्यसेवेत कायमस्वरूपी बदल झाला.

इंटरनॅशनल कौन्सिल ऑफ नर्सेस यांनी १२ मे २०२६ रोजी साजरा होणाऱ्या आंतरराष्ट्रीय परिचारिका दिन २०२६ साठीची थीम 'आमच्या परिचारिका. आमचे भविष्य. सशक्त/ सक्षम परिचारिका जीव वाचवतात' अशी घोषित केली आहे.ही थीम जागतिक आरोग्यसेवेचे परिणाम सुधारण्यासाठी परिचारिका व्यवसायात गुंतवणूक करण्याची आणि त्यांना सक्षम बनवण्याची अत्यंत महत्त्वाची गरज अधोरेखित करते. आरोग्यसेवा पुरवठ्याचा कणा असूनही, परिचारिका (नर्सेस) अनेकदा आर्थिक अडचणींचा सामना करतात आणि त्यांच्या भूमिकेचे वारंवार अवमूल्यन केले जाते. या वर्षीचा आंतरराष्ट्रीय दिवस नर्सिंगविषयीच्या समजुतींमध्ये बदल घडवण्याचा उद्देश ठेवतो, तसेच दाखवतो की नर्सिंगमध्ये धोरणात्मक गुंतवणूक केल्यास मोठे आर्थिक आणि सामाजिक फायदे मिळू शकतात.

२०२६ च्या थीमचे मुख्य पैलू: सक्षमीकरणावर भर: या विषयात यावर भर दिला आहे की जेव्हा परिचारिकांना शिक्षण, नेतृत्वाच्या संधी आणि सुरक्षित कार्यपरिसराद्वारे पाठिंबा, सन्मान आणि सक्षमीकरण दिले जाते, तेव्हा त्या रुग्णांना अधिक चांगली सेवा देऊ शकतात.संरचनात्मक बदल: हे सरकारे आणि नेत्यांना न्याय्य मोबदला, मानसिक आरोग्य सहाय्य आणि सुरक्षित कामकाजाचे वातावरण प्रदान करण्याचे आवाहन करते, काळजीच्या आर्थिक शक्तीविषयीच्या पूर्वीच्या विषयांवर आधारित.महत्त्व: हा दिवस फ्लॉरेन्स नाइटिंगेल यांच्या जयंतीचे स्मरण करतो आणि आरोग्यसेवा कर्मचाऱ्यांना समर्थन देऊन आरोग्यसेवा व्यवस्था मजबूत करण्यासाठी 'एकत्र येण्याची हाक' म्हणून कार्य करतो.सर्व परिचारिकांनी संवाद, सहकार्य आणि सहकर्मीभाव कौशल्यांमध्ये तज्ज्ञता मिळवणे, ती टिकवून ठेवणे आणि तिचा सराव करणे हे सुरक्षित आणि प्रभावी प्रॅक्टिससाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. लोकांना प्राधान्य द्या, प्रभावीपणे प्रॅक्टिस करा, सुरक्षितता जपा आणि व्यावसायिकता व विश्वास वाढवा.

'फ्लोरेन्स नाइटिंगेल यांच्या कार्याचा वारसा चालवणाऱ्या आरोग्यदूत परिचारिकांचे अभिनंदन!'

**तारा शर्मा**
अमरावती



# नर्सेस-जीवनाच्या लढाईच्या खऱ्या 'वॉरियर्स'

परिचर्येचा (नर्स) उगम आरोग्याच्या मुलभूत आणि सार्वत्रिक गरजांमध्ये सापडतो. आरोग्या बाबतची सर्वात महत्त्वाची आणि अत्यावश्यक गरज म्हणजे सेवा शुश्रूषा. योग्य शुश्रुषेमुळेच आजारपणात व्यक्तीस आधार मिळतो.जगात सर्व ठिकाणी शुश्रुषा हा परिचर्येतील प्राथमिक घटक असून रुग्णाची सेवा (शुश्रुषा) हा हजारो वर्षापासुन चालत असलेला, आपल्याला ज्ञात नसलेल्या काळापासुन रुढ असलेला आणि माणुसकीची कास धरुन माणसाला जगवणारा, इतिहासाच्या पानांमधुन स्त्रवणारा सुमधुर द्रव आहे. जगातला पहिला माणुसहाच पहिला डॉक्टर व पहिली माता हिच पहिली परिचारीका होय असे म्हटल्यास अयोग्य ठरणार नाही. वैद्यकशास्त्राप्रमाणेच परिचर्या हे शास्त्रही आहे व एक कला देखील आहे. परिचर्याशास्त्र हे एक सुघटित आणि व्यवस्थापित ज्ञान आहे आणि त्या ज्ञानाचा वापर लोकांच्या आजारपणात तसेच निरोगी अवस्थेत चांगल्या प्रकारे करणे ही एक कला आहे.

उदात्त नर्सिंग सेवेची सुरुवात करणाऱ्या फ्लोरेन्स नाईटिंगेल यांचा आज २०६ वा जन्मदिन जगभरात आंतरराष्ट्रीय नर्सिंग दिन म्हणुन साजरा केला जात आहे. आंतरराष्ट्रीय परिचारीका (२०२६) दिनाची अधिकृत थीम 'आमच्या परिचारीका, आमचे भविष्य, सक्षम परिचारीका जीव वाचवतात'ही आहे. १२ मे १८२० रोजी इटलीच्या फ्लोरेन्समध्ये नाईटिंगेल आणि फेनी यांच्या घरात फ्लोरेन्स यांचा जन्म झाला. सुखवस्तु कुटुंबातील असलेल्या फ्लोरेन्स यांच पालनपोषण इंग्लडमध्ये झाले. त्यांना वयाच्या १६ व्या वर्षी जाणीव झाली की आपला जन्म सेवेसाठी झाला आहे.गणित, सांख्यिकी,विज्ञान आणि इतिहासात निपुण असलेल्या फ्लोरेन्स यांना नर्स बनायच होते. रुग्ण,गरीब आणि पिडीतांची त्यांना मदत करायची होती. परंतु वडील त्यांच्या इच्छेच्या विरोधात होते.त्यावेळी नर्स पेशाकडे सन्मानाने पाहिले जात नसे. फ्लोरेन्स यांनी आपली जिद्द कायम ठेवली आणि १८५१ मध्ये त्यांनी नर्सिंगच्या शिक्षणाला सुरुवात केली. १८५३ मध्ये त्यांनी लंडनमध्ये महिलांसाठी रुग्णालय सुरु केले.

१८५४ मध्ये क्रिमीयाच युद्ध झाल तेव्हा ब्रिटीश सैनिकांना रशियातील क्रीमीयामधे लढण्यासाठी पाठवत होते. ब्रिटन, फ्रान्स आणि तुर्कीचं युद्ध रशियासोबत होत. युद्धात सैनिक जखमी झाल्याचे आणि मृत पावल्याच वृत्त समजताच फ्लोरेन्स परिचारीकांच पथक घेऊन तिथे पोहचल्या, परिस्थिती अतिशय बिकट होती. अस्वच्छता, दुर्गंधी,साधनांचा तुटवडा,पिण्याच पाणी नसल्याने आजार वेगाने वाढला आणि प्रादुर्भावामुळे सैनिकांचा मृत्यू झाला.फ्लोरेन्स यांनी रुग्णालयाची परिस्थिती सुधारण्यासोबतच रुग्णांच्या आंघोळीकडे, खाण्यापिण्याकडे,जखमीच्या ड्रेसिंगवर लक्ष दिले.त्यामुळे सैनिकांच्या परिस्थितीत अतिशय सुधारणा झाली.युद्धकाळात फ्लोरेन्स नाईटिंगेल यांनी जखमी आणि आजारी सैनिकांच्या सेवेसाठी दिवसरात्र एकत्र केले. सैनिकांच्या वतीने त्यांच्या कुटुंबाला त्या पत्र पाठवत असत. रात्रीच्या वेळी हातात लालटेन घेऊन त्या रुग्णांची विचारपुस करत असते, त्यांची देखभाल करायच्या. यामुळे सैनिक प्रेम आणि आदराने त्यांना 'लेडी विथ द लॅम्प' म्हणायचे.१८५६ मध्ये युद्धानंतर परतल्यानंतर याच नावाने त्या प्रसिद्ध झाल्या. १३ ऑगष्ट १९१९ रोजी फ्लोरेन्स नाईटिंगेल यांचे निधन झाले.

मानवाच्या आयुष्याच्या सुरुवातीच्या आणि शेवटच्या क्षणांच्या साथीदार म्हणजे परिचारीका.

परिचारिका दिनाच्या शुभेच्छा !

**डॉ.विजय बाबर,** वर्धा
मो.९४२३११८८०६

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला जिल्हा विशेष

# बाळासाहेब आंबेडकरांचा वाढदिवस ‘स्वाभिमानी दिन’ म्हणून उत्साहात साजरा

## रक्तदान शिबिर, साडीचोळी वाटप, रुग्णांना फळवाटपासह विविध सामाजिक उपक्रम

■ प्रतिनिधी | अकोट ■

वंचित बहुजन आघाडीचे प्रणेते तथा ज्येष्ठ नेते ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या वाढदिवसानिमित्त अकोट तालुका व शहर वंचित बहुजन आघाडीच्या वतीने ‘स्वाभिमानी दिन’ विविध सामाजिक उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. ‘जननायकाचा वाढदिवस, जनसेवेचा संकल्प’ हे ब्रीद समोर ठेवून दिवसभर सेवाभावी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात आदिवासी बांधवांना साडीचोळी वाटपाने करण्यात आली. त्यानंतर अकोट रेल्वे स्थानक परिसरात रक्तदान शिबिर घेण्यात आले. तसेच रुग्णांना फळवाटप करून सामाजिक बांधिलकी जपण्यात आली. या उपक्रमांना कार्यकर्ते व नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

ग्रामीण भागातील देवरी फाटा येथे सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकत्र येत केक कापून वाढदिवस साजरा



केला. यावेळी सामूहिक भोजनाचे आयोजनही करण्यात आले होते. ‘वंचित बहुजन आघाडीचा विजय असो’, ‘बाळासाहेब आंबेडकर तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ है’ अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. या कार्यक्रमाला तालुकाध्यक्ष चरण इंगळे, महासचिव रोशन पुंडकर, संजय पुंडकर, सरपंच सुनीतताताई कासदे, संजय कासदे, सुनिताताई हिरोळे, डॉ. ज्ञानेश्वर मानकर, नगरसेविका लताताई कांबळे, नगरसेवक इम्रान खान पठाण, दिगंबर कासदे, गोपाल ढोरे, आशिष रायबोले, अमन गवई, ललिता तेलगोटे, कल्पना भटकर, सचिन सरकटे, संभा थोरात, विकी वानखडे, मंगेश कांबळे, लखन इंगळे, दादू निताळे, नितीन वाघ, ज्ञानेश्वर येरोकार, प्रमोद सोनोने, तुषार पाचकोर, रंजित सरकटे, इक्बाल, प्रदीप वानखडे, प्रसिद्धीप्रमुख स्वप्निल सरकटे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## बाळापूर पोलिसांच्या नाकावर टिच्चून पेट्रोल-डिझेलचा काळाबाजार



- जिल्हा पुरवठा विभागाची धाड - इथेनॉल सदृश पदार्थासह हजारो लिटर ज्वलनशील साठा जप्त
- वन स्टॉप हॉटेल परिसरात अवैध इंधन विक्रीचा पर्दाफाश

**बाळापूर :** बाळापूर–खामगाव रोडवरील वन स्टॉप हॉटेलच्या शेजारी सुरू असलेल्या पेट्रोल–डिझेलच्या अवैध विक्रीवर अखेर जिल्हा पुरवठा विभागाने धडक कारवाई करत मोठा काळाबाजार उघडकीस आणला. बाळापूर पोलिसांच्या नाकावर टिच्चून सुरू असलेल्या या अवैध धंद्यावर अचानक छापा टाकत पथकाने अंदाजे ६०० लिटर पेट्रोल, ४०० लिटर डिझेल तसेच तब्बल १६५० लिटर इथेनॉलसदृश ज्वलनशील पदार्थ जप्त केला. या कारवाईमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बाळापूर–खामगाव रोडवरील वन स्टॉप हॉटेल परिसरात अनेक दिवसांपासून खुलेआम पेट्रोल–डिझेलची अवैध विक्री सुरू असल्याची माहिती जिल्हा पुरवठा विभागाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे मा. जिल्हा पुरवठा अधिकारी रवींद्र येंनावार यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक तयार करण्यात आले. पथकाने अचानक धाड टाकत संपूर्ण परिसराची तपासणी केली असता मोठ्या प्रमाणात ज्वलनशील पदार्थांचा साठा आढळून आला.

कारवाईदरम्यान विविध ड्रम, कॅन आणि टाक्यांमध्ये साठवलेले इंधन जप्त करण्यात आले. प्राथमिक तपासात हा साठा कोणत्याही अधिकृत परवानगीशिवाय साठवून विक्रीसाठी ठेवण्यात आल्याचे समोर आले आहे. विशेष म्हणजे, मोठ्या प्रमाणावर इथेनॉलसदृश ज्वलनशील पदार्थ आढळल्याने या प्रकरणाचे गांभीर्य अधिक वाढले आहे. अशा प्रकारचा साठा कोणत्याही क्षणी मोठ्या दुर्घटनेला कारणीभूत ठरू शकला असता, अशी चर्चा परिसरात सुरू आहे. या प्रकरणी शेख रिजवान शेख इमरान (रा. अकोला) याला ताब्यात घेण्यात आले असून त्याच्याविरुद्ध बाळापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. अवैध इंधन साठा नेमका कुठून आणला जात होता, त्याची विक्री कुणाला केली जात होती आणि या रॅकेटमध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे, याचा तपास आता सुरू करण्यात आला आहे. सदर कारवाई जिल्हा पुरवठा अधिकारी रवींद्र येंनावार, निरीक्षण अधिकारी विनीत ताले, योगेश सातव, अमोल पवार तसेच पोलीस कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत करण्यात आली. दरम्यान, बाळापूर शहर आणि परिसरात अनेक दिवसांपासून पेट्रोल–डिझेलचा काळाबाजार सुरू असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून होत होत्या. मात्र स्थानिक यंत्रणा याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप आता अधिक तीव्र झाला आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर अवैध इंधन साठा सुरू असताना स्थानिक पोलिसांना याची माहिती नव्हती का? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. या धाडीनंतर जिल्ह्यातील अवैध इंधन विक्रीच्या साखळीचा मोठा भंडाफोड होण्याची शक्यता व्यक्त होत असून पुरवठा विभाग आणखी काही ठिकाणी कारवाई करण्याच्या तयारीत असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

## दहीहंडा पोलिसांची पहाटे गोमांस तस्करांवर धडक कारवाई; १३५ किलो गोमांसासह तीन दुचाकी जप्त

■ प्रतिनिधी | अकोला ■

*दहीहंडा पोलीस स्टेशन हद्दीत गोमांस वाहतुकीविरोधात पोलिसांनी रविवारी पहाटे धडक कारवाई करत तीन आरोपींना ताब्यात घेतले. या कारवाईत १३५ किलो गोमांस व तीन दुचाकींसह एकूण २ लाख ७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.*

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दि. १० मे रोजी पहाटे चार वाजताच्या सुमारास गोमांस वाहतुकीबाबत गोपनीय माहिती मिळाल्यानंतर दहीहंडा पोलिसांनी विशेष पथक तयार करून वेगवेगळ्या ठिकाणी सापळा रचला.

पहिली कारवाई ग्राम कुटासा येथील स्मशानभूमीजवळ करण्यात आली. यामध्ये अब्दुल बशीर शेख अखिल (वय ५५, रा. दहीहंडा) याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून अंदाजे ५० किलो गोमांस व एमएच



३० एडी ८२८८ क्रमांकाची होंडा शाईन मोटारसायकल असा सुमारे ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

दुसरी कारवाई ग्राम कुटाचा बसस्टॉप परिसरात करण्यात आली.

मोहम्मद शहजाद अब्दुल बशीर (वय २४, रा. दहीहंडा) याच्याकडून अंदाजे ४० किलो गोमांस व एमएच २७एजे २७७५ क्रमांकाची हिरो होंडा स्प्लेंडर मोटारसायकल असा सुमारे ६८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

तिसरी कारवाई कावसा प्राथमिक आरोग्य केंद्राजवळ करण्यात आली. शेख राजा शेख अमीर (वय ३१, रा. पिंपळद, ता. दर्यापूर, जि. अमरावती) याच्याकडून अंदाजे ४५ किलो गोमांस व एमएच ३० वाय १४०२ क्रमांकाची हिरो होंडा स्प्लेंडर मोटारसायकल असा सुमारे ६९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या तिन्ही कारवायांमध्ये पोलिसांनी एकूण १३५ किलो गोमांस, तीन मोटारसायकली असा एकूण २ लाख ७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी संबंधित आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून पुढील तपास दहीहंडा पोलीस करीत आहेत.

## विविध क्षेत्रांमधील बदलत्या संधींनुसार पोर्टफोलिओ राहतो अद्ययावत

**अकोला :** मोठ्या आणि मध्यम आकाराच्या व आकर्षक मूल्यांकन असलेल्या कंपन्यांमध्ये गुंतवणुकीची संधी देत, दीर्घकालीन संपत्तीनिर्मिती करण्याच्या उद्देशाने फंड तयार करण्यात आला आहे. आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाइफ इन्शुरन्सने आपल्या युनिट लिंक्ड इन्शुरन्स प्लॅन्स अंतर्गत आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाइफ बीएसई एन्हान्स्ड व्हॅल्यू ३० इंडेक्स फंड सादर केला आहे. याबाबत बोलताना मुख्य गुंतवणूक अधिकारी मनीष कुमार म्हणाले, या फंडामुळे ग्राहकांना इक्विटी बाजारात गुंतवणूक करण्यासाठी एक संरचित आणि पारदर्शक पर्याय मिळतो. मूलभूतपणे चांगली आर्थिक स्थिती असलेल्या आणि आकर्षक मूल्यांकन असलेल्या कंपन्यांवर या फंडाचा भर आहे. या फंडाची गुंतवणूक धोरणे काही महत्त्वाच्या आधारस्तंभांवर आधारित आहेत. विविध आर्थिक निकषांच्या आधारे मूल्याधारित शेअर्सची निवड, वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये आणि बाजार भांडवलाच्या विविध गटांमध्ये गुंतवणूक करून त्यामध्ये विविधीकरण, तसेच ठराविक नियमांवर आधारित शिस्तबद्ध गुंतवणूक प्रक्रिया असे हे आधारस्तंभ आहेत. यासोबतच ठराविक कालावधीनंतर फंडाचा आढावा घेऊन आवश्यक ते बदल आणि संतुलनही राखले जाणार आहे.’

## विदर्भ चेंबरच्या वार्षिक स्मरणिकेसाठी साहित्य पाठविण्याचे आवाहन

**अकोला :** विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स एंड इंडस्ट्री ची वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २८ जून २०२६ रोजी आयोजित करण्यात आली आहे. या सभेत चेंबरच्या वार्षिक कार्याचा आढावा घेण्यात येणार असून आगामी योजनांची घोषणा करण्यात येणार आहे. या निमित्ताने चेंबरचे मुखपत्र असलेल्या विदर्भ चेंबर पत्रिकेचा वार्षिक अंक प्रकाशित करण्यात येणार आहे. या पत्रिकेत व्यापार, उद्योग क्षेत्रातील घडामोडी, यशस्वी उपक्रम तसेच व्यापारी समुदायासाठी उपयुक्त माहिती समाविष्ट करण्यात येणार आहे. या वार्षिक स्मरणिकेसाठी उद्योजकानी उद्योग क्षेत्राशी संबंधित व्यापार, उद्योग, अर्थव्यवस्था, नवकल्पना तसेच सामाजिक विषयांवरील उपयुक्त, माहितीपूर्ण व प्रेरणादायी लेख पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. इच्छुकांनी आपले लेख दि ३१ मे २०२६ पर्यंत विदर्भ चेंबर कार्यालय, श्रावगी टॉवर, जुने कॉटन मार्केट येथे पाठवून यात सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन करण्यात आले.

## एच.पी.समर्थ गॅस एजन्सीचे गॅस ग्राहक डाटा दुसऱ्या ४ एच.पी.गॅस एजन्सीमध्ये वर्ग

**अकोला :** एच.पी.समर्थ गॅस एजन्सी अकोला शहर, जि.अकोला, एच.पी.सी.एल. कंपनीचे श्री. अथर्व पानसरे, गॅस विक्रि अधिकारी अकोला यांचे मार्फत बंद केलेली आहे. त्यामुळे गॅस ग्राहक नागरिकांची गैरसोय होऊ नये त्याकरीता आवश्यक उपाय योजना करून गॅस सिलेंडर पुरवठा, उपलब्धता, गॅस वितरण सुरळीत होणे आवश्यक आहे. त्याकरीता (समर्थ गॅस एजन्सीचा customertransferonline data ) दुस-या एच.पी.गॅस एजन्सींना सर्व गॅस ग्राहक ऑनलाईन डाटा वर्ग करण्यात आलेले आहे.

दि.११/०५/२०२६ रोजी पासून एच.पी.समर्थ गॅस एजन्सीतील गॅस ग्राहक नविन क्रमांकासह ऑनलाईन डाटा (gas customer transfer online data ) वर्ग करण्यात आलेला असून एजन्सी निहाय डाटा वर्ग करण्यात आलेला आहे. तो खालिलप्रमाणे –

एच.पी. गॅस एजन्सीचे नाव पत्ता १ एच.पी.यदुराज गॅस सर्विस, गोरक्षण रोड, शॉप नं.७ बी., आय.टी.स्केअर, टायटन शो रूम जवळ, अकोला शहर २ एच.पी.पटेल गॅस सर्विस, शासकीय आय.टी.आय.कॉलेज समोर, नविन बस स्टॅन्ड मागे, महसूल कॉलनी जवळ, अकोला शहर, ३ एच.पी.विजय गॅस सर्विस, सिंधी कॅम्प, अकोला शहर, ४ एच.पी. अकोला गॅस सर्विस रतनलाल प्लॉट चौक, अजहर हुसैन कॉलेज, सॅमसंग मोबाईल गॅलरी जवळ, अकोला शहर.

गॅस ग्राहक नागरिकांना याद्वारे आवाहन करण्यात येते की, नमुद गॅस एजन्सीमध्ये गॅस ग्राहक डाटा पुरविण्यात आलेला असून कार्यालयात कोणीही गर्दी करू नये, गॅस सिलेंडर बुकींग करीता नमुद गॅस एजन्सीमध्ये संपर्क करावा.

### चौकशीची जाहिर नोटीस
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय अकोला विभाग अकोला**

नेमता तारिख :- १०.०६.२०२६

चौकशी क्रमांक :- १२/२०२६ कलम 50A(I) नुसार जाहिर नोटिस

**मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम 50A(1)**

**न्यासाचे नाव :-** जय हनुमान संस्थान पैलपाडा, ता.जि. अकोला.ए. १५८८

**अन्वये अर्जदार :-** १) श्री. रविंद्र बापुराव देशमुख सचिव २) श्री. राजु पंजाबराव देशमुख - उपाध्यक्ष

**विरूध्द**

**गैरअर्जदार :- कुणीही नाही.**

१) सर्व संबंधितांना या जाहीर नोटीसदवारे कळविण्यात येते की, जय हनुमान संस्थान पैलपाडा, ता.जि.अकोला. ए.१५८८ या न्यासाचा कारभार व्यवस्थित व योग्य रितीने चालावा या द्रष्टीने अर्जदार यांनी वरील अर्ज या कार्यालयात केला आहे.

२) हयाअर्थ या नोटिसीने जाहिर करण्यांत येते की, सदरहु न्यासाचे हितसंबंध असणाऱ्या ज्या लोकांना सदर न्सासाचे योजनेविषयी काही निवेदन/हरकत करावयाची असेल तर त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० (तीस) दिवसाच्या आंत तशा प्रकारचे लेखी निवेदन/हरकत योजनेच्या मसुद्यावरील चौकशी क्रमांक देउन मुंबई सार्वजनिक विश्वस्थ अधिनियम १९५० चे कलम ७३ (अ) नुसार दहा रुपयांचा कोर्ट फी लावून अर्ज धर्मादाय उप आयुक्त १, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला येथे दाखल करावा.

तसे न केल्यास सदरहु बाबतीत कोणासही काहीही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरुन कार्यवही एकतर्फी चालवुन निकाल देण्यात येईल. ही नोटीस आज दिनांक -०६ /०५ / २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व मा.धर्मादाय उप आयुक्त, अकोला यांच्या शिक्यानिशी दिली.

शिक्का | **अधिक्षक** सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय अकोला विभाग अकोला

### चौकशीची जाहिर नोटीस
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय अकोला विभाग अकोला**

अर्ज क्रमांक :- ४६/२०२६-कलम १९

**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक -** गोकुलधाम गोसेवा व अनुसंधान चॅरिटेबल ट्रस्ट, तेल्हारा ता. तेल्हारा जि. अकोला

**अर्जदार :-** श्री. अनुज सुशील इंगळे रा. साईशिल्प, माधव नगर, शेगाव रोड, तेल्हारा ता.तेल्हारा जि.अकोला

संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहायक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकाला हे वर नमुद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ / १९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

(१) वर नममद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

अ) जंगम मिळकत (वर्णन) :- रोख रक्कम रु.५०००/- श्री. सुशील भारतराव इंगळे यांचे ताब्यात आहे. (आ) स्थावर मिळकत (वर्णन) :- निरंक

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकाला. यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक- ०८/०५/२०२६ रोजी दिली.

शिक्का | **अधिक्षक** सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय अकोला विभाग अकोला

### चौकशीची जाहिर नोटीस
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय अकोला विभाग अकोला**

अर्ज क्रमांक :- ५२/२०२६-कलम १९

**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक -** श्री माय माऊली आनंद दत्त मठ चॅरिटेबल ट्रस्ट, जुने गावठाण . सांगवा मेळ, ता. मुर्तीजापूर जि. अकोला

**अर्जदार :-** श्री. बाबुराव व्यंकटराव सोळंके रा.मु. सांगवा मेळ, पो. घुंगशी, ता.मुर्तीजापूर जि. अकोला

संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहायक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकोला हे वर नमुद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२/१९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

(१) वर नममद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

अ) जंगम मिळकत (वर्णन) :- रोख रक्कम रु.१००१/- श्री. बाबुराव व्यंकटराव सोळंके यांचे ताब्यात आहे. (आ) स्थावर मिळकत (वर्णन) :- निरंक

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्तयावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुर केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला. १ यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक-०८/०५/२०२६ रोजी दिली.

शिक्का | **अधिक्षक** सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय अकोला विभाग अकोला

### जाहीर नोटीस
**वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ७०३/२०२६ — प्रोसेस नं.६२३८/२०२६

चौ.ता. २२/०६/२०२६ — दिनांक : ०४/०५/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती शकुंतला राजाराम पाल २. योगेश राजाराम पाल १ व २ रा. कापशी रोड, ता. जि. अकोला. ३. श्रद्धा दुर्गेश पाल रा. सावली खेडा, ता. धारणी, जि. अमरावती.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.

**मयताचा पत्ता :-** मयत : राजाराम ठाकूरदीन पाल

**पत्ता :-** रा. कापशी रोड, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत राजाराम ठाकूरदीन पाल यांचे दि. १२/०८/२०२५ रोजी विघ्नहर्ता हॉस्पिटल, अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २२/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी.आज दिनांक ०४/०५/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का | **आदेशानुसार** अधिक्षक दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### चौकशीची जाहिर नोटीस
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय अकोला विभाग अकोला**

अर्ज क्रमांक :- ५०/२०२६-कलम १९

**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक -** श्री. स्वयंभू श्यामल नरेश सेवा समिती, बोरगाव मंजू, ता. जि. अकोला

**अर्जदार :-** श्री. केतन गोपाल दायमा रा.अकोला ता.जि.अकोला

संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहायक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकोला हे वर नमुद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२/१९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

(१) वर नममद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? (२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**(अ) जंगम मिळकत (वर्णन) :-** रोख रक्कम रु.९००९/-

**आ) स्थावर मिळकत (वर्णन) :**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला. १ यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक-०८/०५/२०२६ रोजी दिली.

शिक्का | **अधिक्षक** सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय अकोला विभाग अकोला

### "Public Notice"

**IN THE COURT OF HON.'BLE DISTRICT-2 & SESSIONS JUDGE, AKOLA**

[MAHARASHTRA] "Public Notice" (05, R 20)

Civil M.A. No. 214/2026 — Fixed For: 09/06/2026

**Satish +Others... Vrs... Nil**

**To,**

1) Satish S/o Nanhkau Sahu, 2) Sau. Nitu W/o. Satish Sahu, Both R/o Gadge Nagar, Hariharpeth, Old City Akola Tq. and Dist. Akola 3) Sachin S/o Nanhkau. Sahu, 4) Sau. Komal W/o. Sachin Sahu, Applicant No. 3 & 4 R/o Gadge Nagar, Hariharpeth, Old City Akola Tq. and Dist. Akola 5) Kashish (Father) - Sachin Sahu, (Mother) - Komal Sahu, R/o Hariharpeth, Old City Akola Tq. and Dist. Akola

**-Vrs- Nil**

Whereas, it is hereby notified that the applicant has filed an application in the court of the "District Judge - 2 and Sessions Judge Akola" Under the Code of Civil Procedure "AN APPLICATION UNDER SECTION 8 OF HINDU ADOPTIONS AND MAINTENANCE ACT, 1956 FOR GRANT OF PERMISSION FOR ADOPTION OF THE MINOR DAUGHTER NAMELY KASHISH D/O SACHIN SAHU AND SAU. KOMAL SACHIN SAHU. The next date of inquiry in the said case is 09/06/2026.

Accordingly, you are here by informed that if you or your attorney or person acting on your behalf is required to appear in the District Court on the date of inquiry on "09/06/2026" at 11:00 A.M. if none of you are present then a legal order will be issued in your absence in this matter. Given under my hand and the seal of the Court Date 04/05/2026.

By Order,
**Superintendent**
**District Court**
**(Judl. Branch), Akola**

### चौकशीची जाहिर नोटीस
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय अकोला विभाग अकोला**

अर्ज क्रमांक :- ४०/२०२६-कलम १९

**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक -** श्री. गजानन महाराज संस्थान, कापशी रोड, ता.जि. अकोला

**अर्जदार :-** श्री. अंबादास गजानन उमाळे रा. कापशी रोड, ता.जि. अकोला

संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहायक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकोला हे वर नमुद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२/१९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

(१) वर नममद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**अ) जंगम मिळकत (वर्णन) :** रोख रक्कम रु. १०००/- श्री श्री. अंबादास गजानन उमाळे यांचे ताब्यात आहे. **आ) स्थावर मिळकत (वर्णन) :-** मौजे कापशीरोड, ता.जि. अकोला येथील मालमत्ता क्र. १३३ ऐकूण क्षेत्रफळ ४४०० चौ.फुट या जागेवर 15x15=225 चौ.फुट जागेवर श्री.गजानन महाराज मंदिराचे बांधकाम, व खुली जागा. चतुःसीमा पूर्वेस - ग्रा. पंचायत रस्ता पश्चिमेस - ग्रा. पंचायत रस्ता उत्तरेस सर्विस नाला दक्षिणेस- ग्रा. पंचायत रस्ता अंदाजे किमत रु.२८६८८४/-

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला. १ यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक-०८/०५/२०२६ रोजी दिली.

शिक्का | **अधिक्षक** सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय अकोला विभाग अकोला

### जाहीर नोटीस
**वि. यह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), पातुर यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ७३/२०२६ — प्रोसेस नं.५३३/२०२६

चौ.ता. १७/०६/२०२६ — दिनांक : २९/०४/२०२६

**अर्जदार :** १. वच्छलाबाई किसन चव्हाण वय ६७ वर्ष धंदा - घरकाम २. गजानन किसन चव्हाण वय ५३ वर्ष धंदा - शेती ३. माणिक किसन चव्हाण वय ४३ वर्ष धंदा - शेती नं. १ ते ३ रा. मलकापुर ता. पातुर जि. अकोला ४. छाया श्रावण राठोड वय ३३ वर्ष धंदा - घरकाम रा. तिवसा बु. ता. बार्शिटाकळी जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** संजय किसन चव्हाण वय ४६ वर्ष धंदा- शेती रा. मलकापुर ता. पातुर जि. अकोला

**मयताचा पत्ता :-** मयत : किसन रतन चव्हाण

**पत्ता :-** रा. मलकापुर ता. पातुर जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की,

मयत किसन रतन चव्हाण यांचा मृत्यु दि. ०७/०३/२०२५ रोजी मलकापुर ता. पातुर जि. अकोला येथे झाला. मयत यांची आई नामे धर्मीबाई रतन चव्हाण हया दि. ०२/०१/२००८ रोजी मलकापुर ता. पातुर जि. अकोला येथे मयत झाल्या. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १७/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत उपरोक्त न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी.आज दिनांक २७/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

दिनांक :- २७/०४/२०२६
पातुर

शिक्का | **आदेशानुसार** **सहा अधिक्षक** दिवाणी न्यायालय (क. स्तर), पातुर

जनमाध्यम — जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १५७**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

# मते घेताना 'विकास'च्या आरोळ्या... आता विद्यार्थ्यांच्या भविष्यावर कुलूप

## हिंगणघाटच्या हजारो विद्यार्थ्यांचा संताप; 'शुभेच्छांचे पोस्टर नको, हक्काचे इंजिनिअरिंग कॉलेज द्या

## कामगार नगरीतील गुणवंत विद्यार्थ्यांची शिक्षणासाठी वणवण; लोकप्रतिनिधींवर जनतेचा हल्लाबोल

**हिंगणघाट/जनमाध्यम**

दहावी-बारावीचा निकाल लागला की सोशल मीडियावर शुभेच्छांचा पाऊस, अभिनंदनाचे बॅनर आणि उज्ज्वल भविष्यास हार्दिक शुभेच्छा'च्या पोस्टांनी शहर भरून जाते. पण या दिखाऊ शुभेच्छांच्या आड दडलेली हिंगणघाटच्या विद्यार्थ्यांची वेदना मात्र कोणीच पाहत नाही. कारण, आजही या औद्योगिक आणि कामगार नगरीत एकही शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय किंवा शासकीय तंत्रनिकेतन (पॉलिटेक्निक) नसल्याने गरीब आणि मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांचे भविष्य अक्षरशः अंधारात ढकलले जात आहे.



मतं मागताना विकासाच्या गप्पा आणि निवडून आल्यानंतर फक्त शुभेच्छांचे पोस्टर असा प्रश्न आता विद्यार्थी आणि पालक थेट लोकप्रतिनिधींना विचारू लागले आहेत. अनेक दशकांपासून हिंगणघाटमध्ये उच्च तांत्रिक शिक्षण संस्था उभारण्याची आश्वासने दिली जात आहेत; मात्र प्रत्यक्षात एक विटही रचली गेली नाही. परिणामी, हजारो विद्यार्थ्यांना इंजिनिअरिंग किंवा पॉलिटेक्निक शिक्षणासाठी नागपूर, वर्धा किंवा इतर शहरांकडे धाव घ्यावी लागत आहे.कामगार नगरी म्हणून ओळख असलेल्या हिंगणघाटमध्ये गिरणी कामगार, शेतमजूर, अल्प पगारदार कर्मचारी आणि सामान्य कुटुंबांची संख्या मोठी आहे. या कुटुंबातील विद्यार्थी गुणवंत असूनही आर्थिक परिस्थितीमुळे उच्च शिक्षणाचे स्वप्न पूर्ण करू शकत नाहीत. खासगी महाविद्यालयांची लाखोंची फी, राहण्याचा खर्च, प्रवासाचा बोजा आणि वाढती महागाई यामुळे अनेक पालक अक्षरशः हतबल झाले आहेत.

मुलगा ८५-९० टक्के गुण घेऊन पास होतो, पण पुढे शिकवायचं कसं हा प्रश्न प्रत्येक सामान्य पालकाच्या डोळ्यात दिसत आहे. काही विद्यार्थी आर्थिक तंगीमुळे शिक्षण अर्धवट सोडतात, तर काही जण नाईलाजाने कमी दर्जाच्या अभ्यासक्रमांकडे वळतात. ही परिस्थिती बदलण्यासाठी लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेणे अपेक्षित असताना ते मात्र शुभेच्छांच्या बॅनरमध्ये व्यस्त असल्याची संतप्त प्रतिक्रिया जनतेतून उमटत आहे.

प्रेस नोटमधून लोकप्रतिनिधींवर जोरदार हल्लाबोल करण्यात आला आहे. जनतेने तुम्हाला संसदेत आणि विधानसभेत केवळ अभिनंदनाचे पोस्टर लावण्यासाठी पाठवलेले नाही, तर हिंगणघाटच्या विद्यार्थ्यांसाठी हक्काचे शासकीय इंजिनिअरिंग कॉलेज आणि पॉलिटेक्निक उभारण्यासाठी पाठवले आहे, असा टोला लगावण्यात आला आहे. विदर्भातील महत्त्वाच्या शहरांपैकी एक असलेल्या हिंगणघाटमध्ये आजही उच्च तंत्रशिक्षणाच्या सुविधा नसणे ही अत्यंत लाजिरवाणी बाब असल्याचे मत शिक्षणप्रेमींनी व्यक्त केले आहे. विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्याच्या शुभेच्छा देण्याआधी त्यांच्यासाठी शिक्षणाची दारे उघडा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

दरम्यान, जोपर्यंत शासकीय तांत्रिक शिक्षण संस्था उभ्या राहत नाहीत, तोपर्यंत शुभेच्छांचा हा दिखावा बंद करा, असा इशारा देत विद्यार्थ्यांचा आणि पालकांचा उद्रेक रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही, असा संतप्त इशाराही देण्यात आला आहे.हिंगणघाटच्या जनतेने आता हार-तुरे आणि अभिनंदनाच्या पोस्टरपलीकडे जाऊन आमच्या मुलांच्या शिक्षणाचं काय हा थेट प्रश्न विचारण्याची वेळ आली असल्याची भावना शहरभर व्यक्त होत आहे.

# गरिबीला हरवून जिद्दीची सुवर्णभरारी; दोन बहिणींनी दहावीत पटकावले पहिले-दुसरे स्थान

**वायगाव (नि.)/जनमाध्यम**

अभाव, संघर्ष आणि गरिबीच्या चटके सहन करत शिक्षणाच्या जोरावर मोठे यश मिळविणाऱ्या दोन बहिणींनी वायगावमध्ये कर्तृत्वाचा नवा इतिहास घडविला आहे. यशवंत विद्यालय येथील वर्ग दहावीच्या परीक्षेत दोन सख्ख्या बहिणींनी प्रथम व द्वितीय क्रमांक पटकावत जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या बळावर यशाला गवसणी घातली.



विद्यालयातील विद्यार्थिनी अमिषा वाळके हिने ९२.४० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला, तर तिची बहीण निखुंज वाळके हिने ९१.२० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला. तसेच आरती बेंडे हिने ९०.८० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक प्राप्त केला. या तिन्ही विद्यार्थिनींच्या यशामुळे यशवंत विद्यालयाची उज्ज्वल परंपरा कायम राहिली आहे.विशेष म्हणजे, अत्यंत प्रतिकूल आर्थिक परिस्थितीतून शिक्षण घेत असतानाही वाळके भगिनींनी अभ्यासात सातत्य ठेवत हे घवघवीत यश संपादन केले. त्यांच्या या यशामुळे परिसरात कौतुकाचा वर्षाव होत असून अनेक विद्यार्थ्यांसाठी त्या प्रेरणास्थान ठरत आहेत.विद्यार्थिनींच्या या यशाचा गौरव करण्यासाठी विद्यालयाच्या शिक्षकांनी थेट त्यांच्या घरी जाऊन अभिनंदन केले. यावेळी प्राचार्य चंद्रकांत ठाकरे यांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ आणि पेढे देऊन दोन्ही विद्यार्थिनींचा सत्कार करण्यात आला.या प्रसंगी दिनेश भगत, सुनील ढाले, समीर वडतकर, धीरज चव्हाण यांच्यासह गावातील मान्यवर, विद्यार्थिनींचे आई-वडील आणि नातेवाईक उपस्थित होते.गरिबी अडथळा नसून जिद्द आणि मेहनत असेल तर यश नक्की मिळते, हे वाळके भगिनींनी आपल्या कर्तृत्वातून सिद्ध करून दाखविले आहे.

## संक्षिप्त

### सट्टापट्टी चालकावर गुन्हा

**वर्धा-** आदिवासी कॉलनी परिसरात सुरू असलेल्या सट्टापट्टीच्या अड्ड्यावर रामनगर पोलिसांनी छापा टाकून कारवाई केली. या कारवाईत सट्टापट्टीचा जुगार खेळविताना दोघांना ताब्यात घेण्यात आले. संजय विठ्ठल भोयर व विनोद रामदास जुगनाके (रा. इंदिरानगर) अशी आरोपींची नावे आहेत. पोलिसांना गुप्त माहिती मिळाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. घटनास्थळावरून आकडे लिहिलेले कागद, सट्ट्याच्या नोंदी व रोख रक्कम असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. परिसरात उघडपणे सुरू असलेल्या या प्रकारामुळे नागरिकांत नाराजी व्यक्त होत होती. पोलिसांनी दोघांविरुद्ध जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे. शहरात वाढत्या सट्टापट्टीमुळे युवकांमध्ये व्यसनाधीनतेचे प्रमाण वाढत असल्याची चर्चा नागरिकांत होत आहे.

### संशयित इसमाला अटक

**समुद्रपूर-** तालुक्यातील वाकसूर येथे संशयास्पदरीत्या फिरणाऱ्या एका इसमाला नागरिकांनी पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले. गस्तीवर असलेल्या पोलिसांना याबाबत माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळ गाठले. चौकशीदरम्यान संबंधिताने आपले नाव शांताराम उईके असे सांगितले. मात्र तो समाधानकारक माहिती देत नसल्याने पोलिसांनी त्याची अंगझडती घेतली. अंधाराच्या वेळी संशयास्पद हालचाली करत असल्याने तो एखादा दखलपात्र गुन्हा करण्याच्या तयारीत असल्याचा संशय पोलिसांना आला. त्यानुसार त्याच्याविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली. गावात रात्रीच्या वेळी वाढत्या संशयित हालचालींमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलिसांनी नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले असून संशयास्पद व्यक्ती दिसल्यास तातडीने माहिती देण्याचे सांगितले आहे.

### अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळला

**वर्धा-** शहरातील आरती चौक परिसरात एका अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली. सायकल दुकानालगत



सुमारे ५२ वर्षीय व्यक्ती बेशुद्ध अवस्थेत पडून असल्याची माहिती नागरिकांनी पोलिसांना दिली. घटनास्थळी पोहोचलेल्या शहर पोलिसांनी संबंधिताला उठविण्याचा प्रयत्न केला असता तो मृतावस्थेत असल्याचे स्पष्ट झाले. मृताची ओळख अद्याप पटलेली नाही. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी जिल्हा रुग्णालयात पाठविला. प्राथमिक माहितीनुसार मृत्यूचे नेमके कारण समोर आले नसून आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू असून मृत व्यक्तीची ओळख पटविण्याचे प्रयत्न पोलिसांकडून सुरू आहेत. या घटनेमुळे परिसरात काही काळ नागरिकांची गर्दी झाली होती.

# 'ऑपरेशन सिंदूर' म्हणजे नव्या भारताची ताकत, समर्पण व देशभक्ती-रामदास तडस

**वर्धा/जनमाध्यम**

'आपल्या देशाचा मूळ स्वभावच आहे की आपण कधीही दुसऱ्या देशावर आक्रमण केलेले नाही किंवा शत्रुत्व सुद्धा ठेवले नाही. पण जेव्हा जेव्हा देशावर संकट आले तेव्हा तेव्हा आपण शत्रूला आपली ताकत सुद्धा दाखवलेली आहे. ऑपरेशन सिंदूर म्हणजे नव्या भारताची ताकत, सैन्य दलाचे समर्पण व देशभक्ती होय, असे प्रतिपादन माजी खा. रामदास तडस यांनी स्थानिक यशवंत महाविद्यालयाच्या सभागृहात २१ महाराष्ट्र एनसीसी बटालियन अंतर्गत देवळीच्या एस एस एन जे महाविद्यालयातील एनसीसी युनिट च्या वतीने आयोजित 'ऑपरेशन सिंदूर वर्षगाठ' कार्यक्रमात १० मे रोजी केले.

याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी खासदार रामदास तडस तर प्रमुख अतिथी म्हणून २१ महाराष्ट्र एनसीसी बटालियनचे कमान अधिकारी कर्नल एस के सिंग, यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष समीर देशमुख, विदर्भ साहित्य संघाचे माजी अध्यक्ष प्रदीप दाते, सुबेदार मेजर टुला सिंग, यशवंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ गिरीश ठाकरे व एनसीसी अधिकारी कॅप्टन मोहन गुजरकर उपस्थित होते.ऑपरेशन सिंदूर विजय दिन समारंभाची सुरुवात भारतीय सैन्य दलातील शहिदांना पुष्प चक्र प्रदान करून झाली. याप्रसंगी प्रहार समाज जागृती संस्थेचे संस्थापकीय अध्यक्ष स्वर्गीय कर्नल सुनील देशपांडे व यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेचे संस्थापकीय अध्यक्ष शिक्षण महर्षी स्वर्गीय बापूरावजी देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यानिमित्त 'ऑपरेशन सिंदूर-भारताचा अभिमान' या विषयावर वक्तृत्व स्पर्धा व पोस्टर मेकिंग स्पर्धेचे भव्य आयोजन करण्यात आले होते. यात वकृत्व स्पर्धेत बजाज सायन्स कॉलेजचा मंथन वानखेडे, एस एस एन जे महाविद्यालयाची कॅडेट आरती मरघडे व जी एस कॉलेज ऑफ कॉमर्स ची कॅडेट फौजिया खान यांनी अनुक्रमे प्रथम द्वितीय व तृतीय पारितोषिके पटकावली. चन्नावार विद्यामंदिर ची हृदया कोहचाडे, जी. एस कॉलेज ऑफ कॉमर्सची काजल वैद्य, एस एन जे महाविद्यालयाच्या सलोनी अजमीरे व प्रियदर्शनी महिला महाविद्यालयाची सिमरन नट यांना प्रोत्साहन पर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.पोस्टर मेकिंग स्पर्धेत एस एस एन जे महाविद्यालयाची सार्जंट वैष्णवी कन्नाके, यशवंत महाविद्यालयाची दिव्याणी विरूळकर व एस एस एन जे महाविद्यालयाची साक्षी पारिसे यांना अनुक्रमे प्रथम द्वितीय व तृतीय पुरस्कार व प्रोत्साहन पर पुरस्काराने गुरुकुल कॉन्व्हेंट ची वेदश्री कामडी, एस एस एन जे महाविद्यालयाच्या रश्मी मडावी व पूर्वा कापटे यांना सन्मानित करण्यात आले.

### एनसीसी यूनिटचा प्रशंसनीय उपक्रम



नागपूर विभाग स्तरावर निशानेबाजी स्पर्धेकरीता निवड झाल्याबद्दल कॅडेट यामिनी पारधी हिला यावेळी स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.याप्रसंगी एनसीसी चे कमांडंट कर्नल एस के सिंग म्हणाले देशभक्तीची भावना लहानपणापासूनच मुला-मुलींच्या मनात निर्माण करण्याचे खरे काम शाळा महाविद्यालयातच होऊ शकते. या दृष्टिकोनातून एनसीसीचा उपक्रम प्रशंसनीय आहे तर युवा नेते समीर देशमुख म्हणाले आजच्या युवक युवतींना योग्य दिशा मिळाल्यास देशाकरीता सर्वकाही ही भावना त्यांच्यात निर्माण होऊ शकते. ज्याकरिता सैनिकी प्रशिक्षण तरुण-तरुणींना मिळणे नितांत गरजेचे आहे. विदर्भ साहित्य संघाचे प्रदीप दाते म्हणाले एनसीसी प्रशिक्षणातून आदर्श पिढी घडवली जात आहे ही बाब प्रशंसनीय असून अशाच प्रकारचे प्रशिक्षण इतर तरुण-तरुणींना मिळणे गरजेचे आहे तर प्राचार्य गिरीश ठाकरे म्हणाले सैनिकी मानसिकता निर्माण करणारे प्रशिक्षण युवक युवतींना दिल्यास एक मजबूत भारत देश निर्माण होऊ शकतो. आपण आपल्या महाविद्यालयात अशाच प्रकारच्या प्रशिक्षणाला प्राधान्य देणार आहोत.

आपल्या प्रास्ताविक भाषणात कॅप्टन मोहन गुजरकर यांनी 'ऑपरेशन सिंदूर' व 'ऑपरेशन महादेव' या यशोगाथा उपस्थितांसमोर मांडून 'देश प्रथम' यावर जोर दिला. यावेळी सैन्य दलातील प्रशिक्षक सुबेदार प्रमोद घोरपडे, सुबेदार विजय कुमार, सुबेदार जसवंत सिंग, नायब सुबेदार अजय कुमार, नायब सुबेदार निरज सिंह, अश्विन सिंग, रणजित सिंग, हवालदार सतिश पुरकर, योगेश पानसरे, नारायण कदम, संतोष घोडके व गजेंद्र इंगळे यांना पुष्प देऊन सन्मानित करण्यात आले.

पोस्टर मेकिंग स्पर्धेचे परीक्षण प्रहार इंग्लिश मीडियम स्कूलच्या माजी प्राचार्या वैशाली गुजरकर व सुबेदार विजय कुमार यांनी तर वक्तृत्व स्पर्धेचे परीक्षण सुबेदार टुला सिंग यांनी केले.कार्यक्रमाचे संचालन अंडर ऑफिसर कोमल शितळे व सीनियर अंडर ऑफिसर कल्याणी लिखार यांनी तर अंडर ऑफिसर रितेश बुटे याने आभार मानले. साक्षी बोरसरे, कुंदन कावडे, विपुल पेंदाम, प्रवेश किटे, पुनम डांगरे, सोमेश्वर पोराटे, राम देशमुख, जानवी झोड, सप्तेश्वरी सावरकर, साहिल गेडाम, दर्शना कदम, पायल चौके, साटोणे, दुर्गेश पोटे व एनसीसी छात्र सैनिकांनी अथक प्रयत्न केले.कार्यक्रमाची सांगता 'हम सब भारतीय है... या एनसीसी गीताने झाली.

# तप्त उन्हातही ९७ रक्तदात्यांनी दिला जीवनदानाचा संदेश

**आर्वी/जनमाध्यम**

जागतिक रेडक्रॉस दिनानिमित्त इंडियन रेडक्रॉस सोसायटी यांच्या वतीने माहेश्वरी भवन, आर्वी येथे आयोजित भव्य रक्तदान शिबिराला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मानवतेचा जिवंत संदेश दिला. कडक उन्हाची पर्वा न करता तब्बल ९७ रक्तदात्यांनी रक्तदान करून अनेकांना नवजीवन देण्याचा संकल्प साकारला.



या रक्तदान शिबिरात रक्त संकलनासाठी आलेल्या चमूने 'तप्त उन्हातही एवढ्या मोठ्या प्रमाणात नागरिकांनी रक्तदानासाठी पुढाकार घेणे ही अत्यंत सकारात्मक आणि प्रेरणादायी बाब आहे, अशी भावना व्यक्त केली. शिबिरात डॉ. हेडगेवार रक्त केंद्र तसेच जिल्हा सामान्य रुग्णालय रक्तपेढी यांच्या चमूंनी रक्त संकलनाचे कार्य पार पाडले.विशेष म्हणजे, इंडियन रेडक्रॉस सोसायटी शाखा आर्वीचे पदसिद्ध अध्यक्ष तथा उपविभागीय अधिकारी विश्वास शिरसाट यांनी स्वतः रक्तदान करून समाजासमोर आदर्श निर्माण केला. उदय बाजपेयी यांनी ४५ वेळा, सुशील लाठीवाला यांनी ४० वेळा, निलेश कडू यांनी ३० वेळा तर डॉ. विनय देशपांडे यांनी २५ वेळा रक्तदान केले आहे. तसेच ५० पेक्षा अधिक वेळा रक्तदान करणारे सुधीर गुल्हाने, नितीन टावरी, रवी शहा आणि रविंद्र साखरे यांचा पुष्पगुच्छ देऊन विशेष सत्कार करण्यात आला.या सन्मान सोहळ्यावेळी रेडक्रॉसचे संस्थापक अध्यक्ष डॉ. अरुण पावडे, उपाध्यक्ष राजाभाऊ तेलरांधे, सचिव अभिलाष धरमठोक, कोषाध्यक्ष रवी शहा यांच्यासह अनेक सदस्य उपस्थित होते.मदर्स डेचे औचित्य साधत रेडक्रॉसच्या महिला आघाडीच्या डॉ. प्रतिभा पावडे, अरुणा देशपांडे आणि ज्योती भट्ट यांनी रक्तदान करणाऱ्या महिलांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.शिबिराला सुमित वानखेडे, दादाराव केचे, चंद्रशेखर ढोले, गौरव जाजू यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी भेट देऊन उपक्रमाचे कौतुक केले.रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी इंडियन रेडक्रॉस सोसायटी शाखा आर्वीच्या सदस्यांनी अथक परिश्रम घेतले.

# समतेचा विचाररथ १३ मे रोजी वर्धा येथे

## फुले-शाहू-आंबेडकर विचारांचा जागर

**वर्धा/जनमाध्यम**

क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती महोत्सवानिमित्त अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद यांच्या वतीने राज्यभर फिरणारा भव्य चित्ररथ १३ मे रोजी वर्धा जिल्ह्यात दाखल होणार असून वर्धा व हिंगणघाट येथे त्याचे उत्साहात स्वागत करण्यात येणार आहे. समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष तथा मंत्री छगन भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली, माजी खासदार समीर भुजबळ व आमदार पंकज भुजबळ यांच्या संकल्पनेतून हा विशेष चित्ररथ तयार करण्यात आला आहे. या चित्ररथात महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळे साकारण्यात आले आहेत. तसेच महात्मा फुले लिखित साहित्य, पुस्तक व पेन या ज्ञानप्रतीकांची आकर्षक मांडणी करण्यात आली आहे. पुण्यातील ऐतिहासिक भिडेवाड्याची प्रतिकृतीही या चित्ररथाचे खास आकर्षण ठरणार आहे.समता, बंधुता, न्याय आणि शिक्षणाचा संदेश देणारा हा चित्ररथ महाराष्ट्रभर समाजप्रबोधनाचे कार्य करत आहे. प्रत्येक ठिकाणी महामानवांच्या पुतळ्यांना अभिवादन करून सामाजिक एकात्मतेचा संदेश दिला जात आहे.या उपक्रमाला शिव-शाहू-फुले-आंबेडकर विचारधारेवरील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाध्यक्ष विशाल हजारे, संघटक विनय डहाके व महिला जिल्हाध्यक्ष कविता मुंगळे यांनी केले आहे.



# खत माफियांना पाठीशी घालणाऱ्यांना सोडणार नाही;शेतकऱ्यांच्या घामाशी खेळ थांबवा

## कमी पावसाच्या संकटात बी-बियाणे, युरिया टंचाई रोखा; प्रशासनाला खा. अमर काळेंचा इशारा

**वर्धा/जनमाध्यम**

एकीकडे आभाळ कोरडे पडण्याची भीती, तर दुसरीकडे बोगस बियाणे, खतटंचाई आणि प्रशासनाच्या ढिसाळ कारभाराने आधीच होरपळलेल्या शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळले जात असताना खासदार अमर काळे यांनी अखेर प्रशासनाला थेट इशाराच दिला आहे. शेतकऱ्यांच्या आयुष्याशी खेळ करणाऱ्यांना माफ केले जाणार नाही. बी-बियाणे, युरिया आणि रासायनिक खतांचा पुरेसा साठा तात्काळ उपलब्ध करा, अन्यथा शेतकऱ्यांच्या संतापाला प्रशासनालाच सामोरे जावे लागेल, असा दम त्यांनी खरीप आढावा बैठकीत भरला

दि. ९ मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात कृषी विभागाच्या वतीने आयोजित खरीप आढावा बैठकीत खासदार काळे यांनी प्रशासनाच्या अनेक त्रुटींवर थेट बोट ठेवत अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. यंदा हवामान खात्याने केवळ ९२ टक्के पर्जन्यमानाचा अंदाज व्यक्त केला असून त्यातही ६ ते ७ टक्क्यांची घट होण्याची शक्यता आहे. म्हणजेच प्रत्यक्षात जिल्ह्यावर दुष्काळाचे सावट गडद होण्याची चिन्हे आहेत. अशा परिस्थितीत प्रशासन मात्र निवांत असल्याचे चित्र बैठकीत दिसून आले.पाऊस कमी पडल्यास कोणते पीक घ्यायचे? दुबार पेरणीची वेळ आली तर बीयाणे कुठून आणायचे? याबाबत शेतकऱ्यांना आजपर्यंत स्पष्ट मार्गदर्शन का झाले नाही, असा प्रश्न खासदार काळे यांनी अधिकाऱ्यांना केला. कृषी विभागाने गावोगावी तातडीने जनजागृती मोहीम राबवून शेतकऱ्यांना योग्य सल्ला द्यावा, अशा सूचना त्यांनी दिल्या.दरवर्षी खरीप हंगामात खतांचा कृत्रिम तुटवडा निर्माण करून काही मोजक्या व्यापाऱ्यांचे खिसे भरले जातात, तर शेतकरी रांगेत उभा राहून हेलपाटे मारत असतो. यंदा हा प्रकार चालणार नाही, असा स्पष्ट इशारा खा. काळे यांनी दिला. वर्धा आणि हिंगणघाट येथे रेल्वे रॅक पॉईंट असल्याने आर्वी, आष्टी आणि कारंजा भागात नेहमी खतटंचाई निर्माण होते. त्यामुळे जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात समतोल वितरण करावे आणि शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीच्या क्षेत्रानुसार खत उपलब्ध करून द्यावे, असे आदेशच त्यांनी प्रशासनाला सुनावले.बोगस बियाण्यांच्या वाढत्या सुळसुळाटावरही खा. काळे यांनी संताप व्यक्त केला. निकृष्ट आणि बनावट बियाण्यांमुळे शेतकरी उद्ध्वस्त होतो, पण कारवाई मात्र कागदावरच राहते.



उत्कृष्ट प्रतीच्या बियाण्यांचा पुरेसा साठा ठेवा, जेणेकरून बोगस बियाणे विकणाऱ्यांना जिल्ह्यात पाय रोवता येणार नाही, असे त्यांनी ठणकावून सांगितले.शेतकरी आणि शेतमजुरांच्या अपघाती मृत्यूच्या प्रकरणातही प्रशासनाच्या संवेदनाहीन कारभारावर त्यांनी जोरदार टीका केली. अपघातानंतर कृषी सहाय्यक घटनास्थळी किंवा मृतकाच्या घरी जात नसल्याने कुटुंबांना मदतीसाठी महिनोने महिने दारोदारी भटकावे लागते. मृतकाच्या कुटुंबाला मदतीसाठी हेलपाटे मारायला लावणाऱ्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करा, अशा शब्दांत त्यांनी अधिकाऱ्यांचे कान उपटले.पीएम किसान योजनेतील प्रलंबित प्रस्तावांचाही मुद्दा बैठकीत चांगलाच तापला. हजारो शेतकऱ्यांचे प्रस्ताव फाईलमध्ये धूळ खात पडले असताना कृषी विभागाने नेमकी किती कार्यवाही केली, याचा हिशेब मागत खा. काळे यांनी केंद्राकडे पाठविलेल्या प्रस्तावांची संपूर्ण माहिती सादर करण्याचे निर्देश दिले.पोखरा योजनेअंतर्गत झालेल्या कामांबाबतही त्यांनी प्रशासनाला आरसा दाखवला. कागदावर लाखो रुपये खर्च दाखवले, पण गावे खरंच पाणीदार झालीत का असा प्रश्न करत त्यांनी लोकप्रतिनिधींना प्रत्यक्ष पाहणी दौरे आयोजित करण्याचे आदेश दिले.दरम्यान, खरीप हंगाम अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असताना प्रशासनाने अजूनही नियोजनात ढिलाई केल्यास शेतकऱ्यांच्या संतापाचा उद्रेक अटळ असल्याची चर्चा बैठकीनंतर कृषी वर्तुळात रंगली आहे.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक १६४
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com


# वाढत्या बाष्पीभवनाने पाणीटंचाईचे सावट

## प्रकल्पामध्ये ४४.९६ टक्के जलसाठा शिल्लक

**अमरावती/का.प्र.**

जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून तापमानात कमालीची वाढ झाली आहे. पारा ४७ अंश सेल्सिअसपर्यंत पोहचला. त्यामुळे उन्हाची तीव्रता आणखी वाढली. परिणामी जिल्ह्यातील प्रकल्पांमधील पाणीसाठा झपाट्याने कमी होत आहे. आजघडीला संपूर्ण प्रकल्पामध्ये ४४. ९६ टक्के जलसाठा शिल्लक आहे. तसेच यातील २२ च्या वर लघु प्रकल्प पूर्णतः कोरडे पडले आहेत. त्यामुळे या प्रकल्पांवर अवलंबून असलेल्या गावांना पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. तसेच येत्या काळात प्रकल्पांची पाणी पातळी आणखी खाली गेल्यास तीव्र पाणीटंचाईची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे पिण्याच्या पाण्यासह सिंचनाचा प्रश्न निर्माण होईल.

गतवर्षी पावसाळ्यात जोरदार पावसाने हजेरी लावली. परतीचा पाऊसही चांगला झाला. त्यामुळे जिल्ह्यातील धरण, तलावांमध्ये मुबलक जलसाठा उपलब्ध झाला होता. मात्र, सध्या राज्यासह जिल्ह्यात काही दिवसांपासून तापमानात वाढ होत आहे. मध्यंतरी ढगाळ वातावरण आणि अवकाळी पावसाने वातावरणात बदल झाला होता. मात्र, पुन्हा उन्हाची तीव्रता वाढत चालल आहे. उन्हाचा तडाका जाणव लागल्याने त्याचा परिणाम ह पाण्याच्या पातळीवर होत आहे यावेळी होणाऱ्या बाष्पीभवामुळे पाणीसाठी कमी होत चाललेला आहे परिणामी जिल्ह्यातील अनेक प्रकल्प कोरडे पडले असून काहींचा जलसाट खोलवर गेला आहे. जिल्ह्यात ५६ प्रकल्पांमध्ये ४४.९६ टक्के जलसाठ आहे. तसेच सात मध्यम प्रकल्पात ४२.५५ टक्के जलसाठा आहे. यातील एक गर्गा प्रकल्प हा पूर्णता कोरडा पडला आहे.



याशिवात ४८ लघु प्रकल्पांमध्ये ३७.५६ टक्केच पाणीसाठा आहे. यामध्ये २२ प्रकल्प कोरडे पडले आहेत. त्यामुळे या प्रकल्पावर अवलंबून असलेल्या गावांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे.

### जिल्ह्यातील ५६ प्रकल्पांची स्थिती

| प्रकल्प पाणीसाठा | टक्के |
|---|---|
| अप्पर वर्धा | ४८.८४ |
| शहानूर | ४४.९२ |
| चंद्रभागा | ८१.५९ |
| पूर्णा | ६५.९८ |
| स्वप्न | ४९.१५ |
| पंढरी | २३.१७ |
| बोर्डी नाला | २.८९ |
| गर्गा | ०.०० |
| ४८ लघु | ३७.५६ |

## श्री गुरुदेव सेवा मंडळ शिराळा ग्रामजयंती उत्साहात

**शिराळा -** श्री गुरुदेव सेवा मंडळ शिराळा येथे ग्रामजयंती निमित्त कार्यक्रमाचे आयोजन यावली शहिद येथे ग्रामजयंती निमित्त गुरुदेव सेवा मंडळ शिराळा चे महिलांचा दिंडी सोहळा झाला.श्री रामनिवास दादा देशमुख यांचे हस्ते पादूका पुजन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली नंतर ह भ प प्रभुजि मदनकर महाराज यांचे प्रमुख उपस्थितीत महिलांनी पाळणा गीत सादर करून जन्मोत्सव सोहळा पार पडला कार्यक्रमाचे सत्कार मुर्ती म्हणून वैद्यकीय अधिकारी डॉ.हर्षा गोहत्रे ह्या लाभल्या होत्या.प्रथम :तहा सर्व जेष्ठ मान्यवरांचा सत्कार करण्यात आला वैद्यकीय अधिकारी डॉ हर्षा गोहत्रे चा सत्कार लता कडु ,सरला ऊमके, मंदा वानखडे, रेखा खाडे, सूनिता तळखंडकर सर्व महिलांनी पुष्प गुच्छ शाल श्रीफळ देऊन सत्कार केला. ग्रामजयंती निमित्त वैद्यकीय अधिकारी डॉ हर्षा गोहत्रे राष्ट्र संतांचे जीवन चरित्र आणि महीलांचे आरोग्य विषयी आपले विचार मांडले उत्कृष्ट संबोधन केले.संचलन राजेंद्र बिजागरे आणि आभार प्रदर्शन प्रभुजी महाराज मदनकर यांनी केले.

## अखेर राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाच्या आक्रमक भूमिकेमुळे जीवघेणा खड्डा बुजला

**मोर्शी/वार्ताहर**

मोर्शी ते वरूड राष्ट्रीय महामार्गावरील हजारो नागरिकांना जखमी करून अनेकांचे बळी घेणारा मायवाडी येथील पुलाजवळ रस्ता दबल्यामुळे निर्माण झालेला जीवघेणा खड्डा अखेर राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष रुपेश वाळके यांच्या आक्रमक भूमिकेमुळे अवघ्या २ तासांच्या आत दुरुस्त करण्यात आला.



या ठिकाणी रस्त्याची अवस्था अत्यंत धोकादायक बनली होती. दररोज शेकडो दुचाकी, चारचाकी तसेच मालवाहू वाहनांची या मार्गावरून मोठ्या प्रमाणावर वाहतूक होत असताना रस्ता दबून मोठे खड्डे निर्माण झाल्याने अपघातांची मालिका सुरू होती.या गंभीर समस्येकडे राष्ट्रवादी युवक कॉँग्रेस पक्षाचे मोर्शी तालुकाध्यक्ष रुपेश प्रकाशराव वाळके यांनी लक्ष वेधले. त्यांनी घटनास्थळी भेट देत रस्त्याची पाहणी केली व नागरिकांच्या तक्रारी जाणून घेतल्या. त्यानंतर राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांशी संपर्क साधून तातडीने रस्ता दुरुस्ती न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला. राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाच्या आक्रमक पवित्र्यानंतर प्रशासन तत्काळ खडबडून जागे झाले. संबंधित यंत्रणेने त्वरित कर्मचारी व यंत्रसामग्री घटनास्थळी पाठवून अवघ्या २ तासांच्या आत रस्त्याची दुरुस्ती पूर्ण केली. खड्डा बुजवून डांबरीकरण करण्यात आल्याने वाहतूक सुरळीत झाली असून वाहनचालकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

## पत्रकार रूपाली हटवार यांना ‘ग्लोबल सक्सेस बेस्ट जर्नलिस्ट’ पुरस्कार प्रदान

**शिराळा/वार्ताहर**

अमरावती जिल्ह्यातील ग्रामीण भागातून पत्रकारितेचा प्रवास सुरू करणाऱ्या रूपाली ना. हटवार यांना नवी दिल्ली येथे आयोजित ‘न्यु ईरा प्रेस’चा प्रतिष्ठेचा ’ग्लोबल सक्सेस बेस्ट जर्नलिस्ट अवॉर्ड २०२६’ देऊन गौरविण्यात आले.

रूपाली हटवार या गेल्या ५ वर्षांपासून मराठी वृत्तपत्रांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विविध प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम सातत्याने करत आहेत. स्थानिक पातळीवर काम करत असतानाच त्यांची पावले राष्ट्रीय स्तरावरही पडली असून, सध्या त्या ‘भारत सुर्खिया’ व जुल्म से जंग या दैनिक राष्ट्रीय वृत्तपत्रामध्येही आपले योगदान



देत आहेत. त्यांच्या याच कार्याची दखल घेत शनिवार २में२०२६ रोजी स्थळ इफोरीया मेंन्शन मोतीनगर बेनकेंट हॉल दिल्ली येथे ‘न्यु ईरा प्रेसचा वतीने ‘ग्लोबल सक्सेस बेस्ट जर्नलीस्ट अवार्ड २०२६’ने त्यांची या पुरस्कारासाठी निवड केली.हा मानाचा पुरस्कार प्रसिद्ध टी. व्ही. अभिनेत्री मिताली नाग आणि राष्ट्रीय समाचार पत्राचे संपादक राजीवजी ढिंगरा यांच्या हस्ते पुरस्कार प्रमाणात व ट्रॉफी प्रदान करण्यात आली. ग्रामीण भागातून येऊन पत्रकारितेच्या क्षेत्रात राष्ट्रीय पातळीवर स्वतःची ओळख निर्माण करणाऱ्या रूपाली हटवार यांचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे. तसेच या जर्नलीस्ट अवार्डाकरीता कार्यक्रमामध्ये विविध क्षेत्रातील व राज्यांतील अनेक महिला -पुरुष पत्रकार उपस्थित होते.तसेच या कार्यक्रमामध्ये ‘तेज खबर चॅनल’ भारत सुर्खिया , फॅशन फीव्हर, जुल्म से जंग’ यांसारख्या नामांकित मिडिया संस्थांचे सहकार्य लाभले. रुपाली ना.हटवार यांचे दुसरे आवार्ड असुन पहीला सत्कार २०२३ मध्ये ‘नारी शक्ती को सलाम २०२३’ चे सत्कार तर दुसरे ‘ग्लोबल सक्सेस बेस्ट जर्नलीस्ट अवार्ड २०२६’चा अवार्ड प्रदान करण्यात आले.या पुरस्कारामुळे ग्रामीण भागातील पत्रकारांच्या संघर्षाला आणि मेहनतीला नवी ओळख मिळाली असल्याची भावना व्यक्त होत आहे.

## नियम मोडणाऱ्यांवर हजार रुपयांचा दंड,सिग्नलला कॅमेरे लावा !

### नागरिकांची मागणी;वाहतूक पोलिसांना निवेदन

**अमरावती/का.प्र.**



शेगाव नाका तसेच शेगाव-रहाटगाव रोड परिसरात बरेचदा मोठ्या प्रमाणात ट्रॅफिक जाम होत असल्याने नागरिक हैराण झाले आहेत. या गंभीर समस्येकडे लक्ष वेधत तेजस्विनी पाटील व स्मिता टाले, यांनी नियम मोडणाऱ्यांवर हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात यावा, सिग्नलला कॅमेरे लावा, अशा मागणीचे निवेदन पोलिस आयुक्त कार्यालयात दिले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, विशेषतः सकाळी व सायंकाळी शाळा, कार्यालय आणि बाजारपेठेच्या वेळेत वाहनांची मोठी गर्दी होते. त्यामुळे नागरिकांना प्रचंड त्रास होतो आणि अपघात होण्याची शक्यताही वाढली आहे. या कोंडीमुळे रुग्णवाहिकांनाही बरेचदा अडकून पडावे लागते. ज्यामुळे रुग्णांचे जीव धोक्यात येतात. या ट्रॅफिक जामचे मुख्य कारण नियमांचे पालन न करणे, सिग्नल व्यवस्थेत अडचणी आणि अनधिकृत पार्किंग आहे, असे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे सिग्नल व्यवस्था व्यवस्थित करावी, सिग्नलजवळ कॅमेऱ्याची व्यवस्था असावी, अशी मागणी करण्यात आली आहे.नियमांचे पालन न करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला हजार रुपये दंड ठोठावावा. वाहतूक व्यवस्था सुरळीत व नियंत्रित राहण्यासाठी गरज असल्यास वॉलेंटियर्सची मदत घ्यावी, अशी ठोस मागणी तेजस्विनी पाटील व स्मिता टाले यांनी दिलेल्या निवेदनातून केली आहे. या निवेदनावर प्रशासनाने तातडीने योग्य उपाययोजना कराव्यात, अशी नागरिकांची अपेक्षा आहे.

## मातेने दिलेली किडनी ठरली लेकीसाठी ‘जीवनदान’

### आईच्या प्रेमाचा ‘पुनर्जन्म’: पीडीएमसीमध्ये शस्त्रक्रिया यशस्वी

**अमरावती/क्रा.प्र.**

आईचे प्रेम आणि ममता काय असते, याचा प्रत्यय अमरावतीतील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालयात आला. पथ्रोट येथील ७० वर्षीय उषा साहेबराव महल्ले यांनी आपल्या ३८ वर्षीय मुलीला किडनी दान करून तिला नवीन आयुष्य दिले आहे. विशेष म्हणजे, ही महागडी शस्त्रक्रिया ‘महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत पूर्णपणे मोफत पार पडली.

अकोला जिल्ह्यातील बाळापूर येथील रहिवासी अनुश्री विनोद गोळे (३८) या गेल्या सहा महिन्यांपासून किडनीच्या आजाराने त्रस्त होत्या.दोन्ही किडन्या निकामी झाल्यामुळे त्यांना श्वास घेण्यास त्रास होणे आणि बीपी वाढणे अशा समस्या उद्भवल्या होत्या. खासगी रुग्णालयातील उपचारांचा आणि किडनी प्रत्यारोपणाचा खर्च अनुश्री यांच्या कुटुंबाला झेपण्यापलीकडे होता. अशा कठीण प्रसंगी त्यांच्या ७० वर्षांच्या वृद्ध मातेने वयाची पर्वा न करता किडनी दान करण्याचा निर्णय घेतला आणि यशस्वी शस्त्रक्रिया पार पडली. सध्या आई आणि मुलगी दोघींचीही प्रकृती स्थिर असून ते डॉक्टरांच्या देखरेखीखाली आहेत. एका वृद्ध मातेने आपल्या अपत्यासाठी केलेला हा त्याग समाजासमोर अवयवदानाचा एक प्रेरणादायी आदर्श ठेवणारा ठरला आहे.

**तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाचे यश**

नेफ्रोलॉजिस्ट डॉ. हितेश गुल्हाने आणि युरोलॉजिस्ट डॉ. राहुल पोटोडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही जटिल शस्त्रक्रिया ५ ते ६ तास चालली. श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख आणि वैद्यकीय अधीक्षक डॉ. पवन टेकाडे यांच्या नेतृत्वाखालील तज्ज्ञ डॉक्टरांच्या टीमने हे आव्हान यशस्वीपणे पेलले.

**शासकीय योजनेचा मोठा आधार**

किडनी प्रत्यारोपणासारखी खर्चिक शस्त्रक्रिया महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेमुळे मोफत झाली. तसेच शस्त्रक्रिया पूर्व अनेक चाचण्याही रुग्णालय स्तरावर मोफत करण्यात आल्याने रुग्णाला मोठा आर्थिक दिलासा मिळाला. ट्रान्सप्लांट कॉर्डिनेटर सतीश वडनेरकर यांनी कायदेशीर प्रक्रिया आणि पोलीस व्हेरिफिकेशनच्या कामात महत्त्वाची भूमिका बजावली.

## दहावीच्या परीक्षेत यश

**मोर्शी -** शिवाजी उच्च माध्यमिक शाळेने दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन करत गुणवत्तेची उज्वल परंपरा कायम राखली आहे. शाळेचा एकूण निकाल ९७.९१ टक्के लागला आहे. ३७विद्यार्थी ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवून उत्तीर्ण झाले आहेत. कोमल गावंडे हिने ९७.४० टक्के गुण प्राप्त करून मोर्शी तालुक्यात प्रथम क्रमांक पटकाविला आहे. तसेच लावण्या जाणे, राधा ढोमणे, सृष्टी काकडे, गार्गी चिखले, हिमानी जाणे, कृष्णा दाते, कल्याणी बोराखडे, कश्यप वाहाणे, अक्षरा झोटिंग, आनंदी चौधरी, यश संभावित, कृष्णप्रसाद ठाकरे, सम्यक पटिले, अंश इंगळे, प्रसाद पाथरे, ईश्वरी लाडूकार, आर्या दाणे, श्रावणी भांगे, उन्नती डांगोरे, श्रावणी जंवजाळकर, मृदुला पुसलेकर, समृद्धी भड, शौर्य सातपुते, अविष्का भदे, संस्कृती काळे, सर्वेश तायवाडे, विधी कडू, उन्नती राऊत, सानवी शिरभाते, सिद्धी ढाकुलकर, गौरी गुल्हाने, गायत्री बडासे, मृण्मयी काटोलकर, ईश्वरी काळे, कृष्णा निमजे, अनुष्का टाकोडे यांनी या परीक्षेत यश मिळविले आहे.

# १४ तारखेनंतर विवाह सोहळे थांबतील

## अधिक मास १७ मे ते १५ जून पर्यंत चालेल

**अमरावती/का.प्र.**

सनातन धर्मात, कोणत्याही शुभ कार्यासाठी ग्रहांची स्थिती आणि शुभ मुहूर्ताला सर्वोच्च प्राधान्य दिले जाते. सध्या विवाह सोहळ्यांचा अंतिम टप्पा सुरू आहे, कारण ज्योतिषीय गणनेनुसार १४ मे नंतर शुभ मुहूर्त संपणार आहे. यानंतर, विवाह सोहळ्यांसाठी बराच काळ प्रतीक्षा करावी लागेल. धार्मिक श्रद्धा आणि पंडितांनुसार, १४ मे पर्यंत फक्त आठ दिवस शिल्लक आहेत. शहरातील आणि आसपासच्या परिसरातील शेकडो जोडपी या तारखांना विवाहबंधनात अडकण्याची योजना आखत आहेत. भक्तगण या अंतिम शुभ मुहूर्तांना प्राधान्य देत आहेत, जेणेकरून पारंपरिक विधींनुसार संस्कार पार पाडता येतील. पंचांगानुसार, १७ मे ते १५ जून या कालावधीत अधिक मास (अतिरिक्त महिना) असेल, ज्या दरम्यान सर्व शुभ आणि मंगल कार्यक्रमांना मनाई आहे. १९ जून रोजी शहनाईचा आवाज पुन्हा सुरू होईल. जून आणि जुलैमध्ये लग्नासाठी एकूण १८ शुभ दिवस उपलब्ध असतील, या हंगामातील शेवटचा शुभ मुहूर्त १२ जुलै रोजी असेल.



### विधी आणि परंपरांचे पालन

या हंगामात विवाह समारंभादरम्यान भक्तगण प्राचीन परंपरा आणि धार्मिक चालीरीतींकडे अधिकाधिक झुकत आहेत. हळदी, मेहंदी आणि इतर विवाह विधी पूर्ण पवित्रतेने आणि विधीपूर्वक पार पाडले जात आहेत. ज्योतिषांच्या मते, शुभ तारखांच्या अभावामुळे शुभ ऊर्जा क्षीण होते, त्यामुळे १४ मे पर्यंतचा कालावधी आध्यात्मिक दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचा मानला जातो.

यानंतर, चातुर्मासाच्या सुरुवातीसह मोठा खंड पडेल आणि २० नोव्हेंबर रोजी देवूठनी एकादशीच्या शुभ मुहूर्तावर शुभ समारंभ पुन्हा सुरू होतील.

## संक्षिप्त

### जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालया दहावीचा निकाल ७५.८०%



**अंजनगाव बारी -** जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने फेब्रुवारी–मार्चमध्ये झालेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेत यंदाही घवघवीत यश संपादन केले आहे. विद्यालयाचा एकूण निकाल ७५.८०% लागला असून ग्रामीण भागातील मर्यादित सोयी–सुविधा आणि शासनाच्या कॉपीमुक्त अभियानांतर्गत शिस्तीत परीक्षा देत विद्यार्थ्यांनी प्रामाणिक प्रयत्नांनी प्राप्त केलेले हे यश सर्वत्र कौतुकास्पद ठरत आहे.विद्यालयातील गुणवत्ता यादीत प्रथम क्रमांक : प्रिया भीमराव चुटे – ८८.४०% , द्वितीय क्रमांक : धनश्री विनोद दारोकार – ८६.८०% , तृतीय क्रमांक : भावेश प्रशांत फुसे – ८३.८०% यावर्षी एकूण १११ विद्यार्थी परीक्षेला बसले होते, त्यापैकी ८४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. निकालाचे वर्गीकरण विशेष प्राविण्य : ११ विद्यार्थी, प्रथम श्रेणी : २५ विद्यार्थी, द्वितीय श्रेणी : ३१ विद्यार्थी, उत्तीर्ण श्रेणी : १७ विद्यार्थी विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. हेमंतजी देव, उपाध्यक्ष राजेश टारपे, आनंदरावजी इंगोले, शाळा समिती सभापती महादेवरावजी चकुले, सदस्य सोमेश्वरावजी इंगोले तसेच सर्व कार्यकारिणी सदस्य, प्राचार्य विनोद मुगल आणि पर्यवेक्षक गजेंद्र अवघड यांनी विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.शाळेतील सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनीही विद्यार्थ्यांचा गुणगौरव करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय आपल्या शिक्षक आणि पालकांना दिले.

### दोन महिने अभ्यास विसरा, आता नि:संकोच व्यक्त व्हा!



**चांदूर रेल्वे -** वर्षभर शाळा, गृहपाठ, अभ्यास आणि परीक्षा यामध्ये गुंतलेल्या विद्यार्थ्यांना आता मोकळेपणाने स्वतःला व्यक्त करण्याची संधी मिळाली आहे. त्यामुळे पुढील दोन महिने आनंदाने जगा, धम्माल करा आणि या आपल्या छंदांना वाव द्या. नि:संकोचपणे शिबिरात सहभागी होऊन स्वतःला व्यक्त करा, असे आवाहन गटशिक्षणाधिकारी प्रसाद संकपाळ यांनी केले.पीपल्स कला मंच व गटसाधन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित उन्हाळी शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी गटशिक्षणाधिकारी बोलत होते. स्थानिक गटसाधन केंद्र येथे पार पडलेल्या या सोहळ्याला नाट्य क्षेत्रातील तज्ज्ञ विशाल तराळ, नगरसेवक हर्षल वाघ, प्रावीण्य देशमुख, चांदूरवाडी शाळेच्या मुख्याध्यापिका रेखा वडतकर, पीपल्स कला मंचचे विवेक राऊत यांची प्रमुख उपस्थिती लाभली. शिबिराची सुरुवात पहाटे सहा वाजताच झाली. योगा, थिएटर गेम्स आणि विविध उपक्रमांनी पहिल्याच दिवशी वातावरण रंगतदार झाले. पहिल्या दिवशीच साठपेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सहभागी होते.

### सिद्धनाथपूर ग्रामपंचायत परिसरात घाणीचे साम्राज्य



**नांदगाव खंडेश्वर -** गट ग्रामपंचायत सिद्धनाथपूर येथे गेल्या दोन वर्षांपासून अंडरग्राउंड सांडपाण्याची पाइपलाइन ब्लॉक झाली आहे.या सांडपाण्याची विल्हेवाट होत नसल्यामुळे आठ ते दहा कुटुंबांचे आरोग्य धोक्यात आले आहे. साचलेल्या घाण पाण्याची विल्हेवाट लावण्याबाबत ग्रामपंचायतीकडे व पंचायत समिती यांना पत्राद्वारे वारंवार तक्रार केल्या आहेत. सिद्धनाथपूर येथील संतप्त ग्रामस्थांनी जिल्हा परिषदेत धाव घेऊन सीई ओंना तक्रार दिली होती. यावेळी स्थानिक प्रशासनाला पत्राद्वारे त्वरित या सांडपाण्याची व पावसाच्या पाण्याची विल्हेवाट लावण्याचे आदेश दिले होते. तरीसुद्धा आतापर्यंत कुठलीही कारवाई झाली नाही. सिद्धनाथपूर येथील ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात आले आहे. साचलेल्या सांडपाण्यापासून घाण, दुर्गंधी व मच्छरामुळे प्रादुभाव वाढला आहे. त्यामुळे या कुटुंबातील लहान मुले व वयोवृद्धांना याचा त्रास सहन करावा लागत आहे.

### हरम येथील श्रीकृष्ण कॉन्व्हेंटमध्ये बक्षीस वितरण सोहळा



**अचलपूर-** हरम येथील श्रीकृष्ण कॉन्व्हेंटमध्ये बक्षीस वितरण सोहळा नुकताच पार पडला. यावेळी यशस्वी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीसांचे वितरण करण्यात आले. नर्सरी केजी १ आणि केजी २ मध्ये प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांना बक्षीस देण्यात आले. सांस्कृतिक कार्यक्रमात कौतुकास्पद कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचाही मान्यवरांच्या हस्ते गुणगौरव करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष संदीप भोरे, संचालिका शुभांगी भोरे, प्रशांत दखणे, भूषण अंबाडकर, आशिष डोंगरे, अनुप डांगरे, सचिन काळमेघ, रितेश राणे, पुंडलीक काजे, ललित बद्रटीये आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता मुख्याध्यापिका दळणकर, शिक्षिका फुले, उभाड, भोरे, सहसचिव सुरेश भोरे, व्यवस्थापक मोहन कुले व अमोल बोबडे यांनी सहकार्य केले.

# दोन मोजण्या-दोन निष्कर्ष... अन् महसूल यंत्रणेची 'मौनसंमती'?

## गाजीपूर-रुदाळी खाण प्रकरणात आता संशयाच्या भोवऱ्यात अधिकारीच

## अरबोंच्या दंडवसुलीवर पडदा टाकण्याचा प्रयत्न?

**ॲड.समीर ठाकूर**

**अकोला** : गाजीपूर-रुदाळी गौण खनिज उत्खनन प्रकरणात आता केवळ अतिरिक्त उत्खननाचा मुद्दाच राहिलेला नाही, तर संपूर्ण महसूल प्रशासनाच्या भूमिकेवरच गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. एका बाजूला सरकारी संयुक्त मोजणीत लाखो ब्रास अतिरिक्त उत्खनन उघड होत असताना, दुसऱ्या बाजूला ETS पुनर्मोजणीत परिस्थिती अचानक बदलते आणि संबंधित खाणधारकांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता निर्माण होते. यामुळे हा केवळ तांत्रिक वाद नसून, 'दंडवसुली वाचविण्याचा संगनमताने रचलेला प्रशासकीय खेळ' तर नाही ना, अशी चर्चा आता उघडपणे रंगू लागली आहे.

विशेष म्हणजे, या अत्यंत गंभीर प्रकरणी प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी अकोटचे उपविभागीय अधिकारी (SDO) आणि तहसीलदार यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र दोन्ही अधिकाऱ्यांनी फोन उचलला नाही. परिणामी या प्रकरणात प्रशासन जाणीवपूर्वक मौन बाळगत आहे का, असा प्रश्न अधिक तीव्र झाला आहे.

### महसूल विभागातील 'मौन' अधिक संशयास्पद

संपूर्ण प्रकरणात सर्वात धक्कादायक बाब म्हणजे संबंधित अधिकाऱ्यांचे मौन. शासनाच्या महसुलाशी संबंधित गंभीर आरोप, दोन सरकारी अहवालांतील विरोधाभास, अतिरिक्त उत्खननाचे आरोप, पर्यावरणीय नुकसान आणि संभाव्य संगनमत. या सर्व मुद्द्यांवर प्रशासनाकडून अद्याप स्पष्ट भूमिका समोर आलेली नाही. सामान्यतः अशा प्रकरणात प्रशासन तत्काळ पत्रकार परिषद घेऊन तथ्य स्पष्ट करत असते. मात्र येथे उलट चित्र दिसत आहे. फोन न उचलणे, प्रतिक्रिया टाळणे आणि अधिकृत स्पष्टीकरण न देणे, यामुळे संशय अधिकच बळावत आहे. स्थानिक पातळीवर तर 'वरून दबाव आहे का?' अशीही चर्चा सुरू झाली आहे.

विशेषतः शासनाच्या संभाव्य अरबो रुपयांच्या महसुलाशी संबंधित विषयावर संबंधित अधिकारी माध्यमांपासून दूर राहत असतील, तर त्यामागे नेमके काय दडले आहे, याबाबत संशय अधिकच गडद होत आहे.

सन २०२४ मध्ये भूमी अभिलेख विभाग आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संयुक्त पथकाने केलेल्या मोजणीत मोठ्या प्रमाणावर अतिरिक्त उत्खनन झाल्याचे स्पष्ट संकेत समोर आले होते. या अहवालानंतर महसूल विभागाने संबंधित खाणधारकांना पत्र वजा नोटीसही बजावल्या. म्हणजेच प्रशासनाने स्वतः त्या मोजणीला वैध मानून पुढील कारवाईची प्रक्रिया सुरू केली होती. मात्र अचानक काही खाणधारकांनी पहिली मोजणीच चुकीची असल्याचा दावा पुढे करत ETS पुनर्मोजणीचा आग्रह धरला आणि आश्चर्य म्हणजे महसूल विभागातील काही अधिकाऱ्यांनीही त्यास तातडीने अनुकूलता दर्शवली. प्रश्न असा की, जर पहिली मोजणी इतकीच त्रुटीपूर्ण होती, तर त्या आधारे पत्र वजा नोटिसा का बजावण्यात आल्या? आणि जर पहिली मोजणी योग्य होती, तर पुनर्मोजणीची एवढी घाई का करण्यात आली?

याच मुद्द्यावर आता प्रशासनाची भूमिका संशयाच्या केंद्रस्थानी आली आहे.

या प्रकरणात आता स्वतंत्र उच्चस्तरीय चौकशीची मागणी जोर धरू लागली आहे. दोन सरकारी अहवालांतील तफावत, पुनर्मोजणीची घाई, अधिकाऱ्यांचे मौन आणि संभाव्य महसूल नुकसान. या सर्व बाबींची न्यायालयीन किंवा विशेष तपास पथकाकडून चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते करीत आहेत.

कारण प्रश्न केवळ गाजीपूर-रुदाळीचा नाही; प्रश्न आहे शासनाच्या महसुलाचा, प्रशासनाच्या विश्वासार्हतेचा आणि नैसर्गिक संपत्तीच्या संरक्षणाचा. जर या प्रकरणात सत्य दडपले गेले, तर भविष्यात राज्यातील कोणत्याही गौण खनिज घोटाळ्यावर प्रशासनाच्या कारवाईवर विश्वास ठेवणे कठीण होईल, अशी प्रतिक्रिया आता उमटू लागली आहे.

### ETS अहवालात नेमके काय बदलले?

ETS ही आधुनिक तांत्रिक मोजणी पद्धत असली, तरी ती वापरणाऱ्यांच्या प्रामाणिकतेवरच तिची विश्वासार्हता अवलंबून असते, असे तज्ज्ञांचे मत आहे. कारण मोजणीदरम्यान घेतले जाणारे बेस पॉइंट्स, उत्खननाची मूळ पातळी, संदर्भ नकाशे आणि क्षेत्रीय नोंदी यामध्ये फेरफार झाल्यास अंतिम निष्कर्ष पूर्णपणे बदलू शकतात.

गाजीपूर-रुदाळी प्रकरणात नेमका हाच मुद्दा आता उपस्थित होत आहे. पहिल्या मोजणीत जिथे मोठ्या प्रमाणावर अतिरिक्त उत्खनन दिसून येत होते, तिथे ETS अहवालामुळे अनेक खाणींना संभाव्य दिलासा मिळण्याची चर्चा आहे. त्यामुळे 'तंत्रज्ञानाचा वापर सत्य उघड करण्यासाठी झाला की सत्य झाकण्यासाठी?', हा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे.

### खनिज संपत्तीचा 'सुवर्णमार्ग' की महसूल लूट?


सातपुड्याच्या पायथ्याशी असलेला हा भाग पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील मानला जातो. गेल्या दीड दशकात येथे मोठ्या प्रमाणावर उत्खनन झाले. डोंगर पोखरले गेले, नैसर्गिक जलप्रवाह बदलले आणि अनेक भागांतील भू-संतुलन धोक्यात आले, भूगर्भातील पाणी लागेपर्यंत खाणकाम / उत्खनन करण्यात आल्याच्या तक्रारी ग्रामस्थ सातत्याने करीत आहेत. मात्र प्रशासनाने महसूल आणि पर्यावरण या दोन्ही मुद्द्यांकडे सोयीस्कर दुर्लक्ष केल्याचा आरोप होत आहे. स्थानिकांच्या मते, जर पहिल्या मोजणीनुसार अतिरिक्त उत्खनन सिद्ध झाले, तर शासनाकडे कोट्यवधी नव्हे तर अरब रुपयांचा दंड जमा होऊ शकतो. त्यामुळेच आता हा केवळ खाणींचा विषय न राहता 'महसूल वाचविण्याचा मोठा खेळ' असल्याची भावना बळावत आहे.

# महाजनपुरा सुन्न! एकाच वेळी निघाली चौघांची अंत्ययात्रा

## चारही मुलांवर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार

## 'घातखेडा' दुर्घटनेतील मृतांना साश्रू नयनांनी निरोप





**अमरावती/प्रतिनिधीः-** मार्डी रोडवरील घातखेडा धरणात बुडून मृत्यू झालेल्या महाजनपुरा येथील त्या चारही मुलांवर आज, सोमवारी अत्यंत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. एकाच वेळी निघालेल्या या चार अंत्ययात्रांनी उपस्थितांच्या काळजाचा ठोका चुकला. संपूर्ण परिसरातील नागरिकांनी मृतांना साश्रू नयनांनी निरोप दिला.

सोमवारी दुपारी शवविच्छेदन झाल्यानंतर या मुलांचे पार्थिव त्यांच्या निवासस्थानी आणण्यात आले. रुग्णवाहिकेतून जेव्हा हे देह बाहेर काढण्यात आले, तेव्हा पालकांच्या आक्रोशाने परिसर सुन्न झाला होता. हिंदू स्मशानभूमी येथे शेकडो नागरिकांच्या उपस्थितीत या चौघांनाही अंतिम निरोप देण्यात आला. या दुर्दैवी घटनेमुळे स्थानिक प्रशासनाच्या सुरक्षा व्यवस्थेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, धरणांवरील सुरक्षिततेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे.

शहरातील महाजनपुरा परिसरात राहणारे दहा मुले रविवारी पिकनिकसाठी मार्डी रोड मार्गावरील डॉ. राजेंद्र गोडे कॉलेजच्या मागील भागात असणाऱ्या घातखेडा धरणात गेले होते. जेवण झाल्यावर दुपारी सर्व आंघोळीसाठी पाण्यात उतरले होते. या दरम्यान सोनाली नरेंद्र जोशी ( वय १६),आदित्य नरेंद्र जोशी (वय१२), पायल बबलू पंडित (वय २१) यश गजानन काकणे (वय १३, सर्व राहणार महाजनपुरा) यांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. या घटनेमुळे महाजनपुरा परिसरात शोककळा पसरली आहे. आज सोमवार ११ मे रोजी सकाळी पोस्टमार्टम नंतर चौघांना अंतिम निरोप देण्यात आला. एकाच वेळी चौघांची अंत्ययात्रा निघाली. सर्वांचे डोळे यावेळी पणावलेले होते. महाजनपुरा परिसरात दुःखवटा पसरला आहे. चिमुकली मुलं या दुर्घटनेत गमावल्याने आई-वडिलांना धक्का बसला आहे. हिंदू समशान भूमीजवळ चौघांचा दफन विधी करण्यात आला. शेकडो नागरिक अंत्यत्रेमध्ये सहभागी झाले. सोमवारी दुपारी पोस्टमार्टम झाल्यावर मुलांचे पार्थिव त्यांचे महाजनपुरा येथील निवासस्थानावर पोहोचले. ॲम्बुलन्स मधून पार्थिव बाहेर काढत असताना सर्वांच्या अश्रूधारा वाहू लागल्या. साश्रू नयनांनी सर्वांनी चौघांना शेवटचा निरोप दिला. परिसरातील नागरिक नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुरक्षेच्या दृष्टीने पोलिसांचा तगडा बंदोबस्त ही येथे होता.

# विभागीय लोकशाही दिनात चौदा प्रकरणांवर सुनावणी



**अमरावती/प्रतिनिधीः-** विभागीय लोकशाही दिनात दाखल होणाऱ्या प्रकरणांवर विहीत कालमर्यादेत कार्यवाही करुन अंतिम अहवाल सादर करणे तसेच संबंधित अर्जदारास केलेल्या कार्यवाहीबाबत अवगत करणे आवश्यक आहे. यानुसार प्रत्येक विभागाने त्यांच्याकडील प्रलंबित प्रकरणांच्या संदर्भात प्रत्यक्ष स्थळ पाहणी, चौकशी अहवाल आदींची पडताळणी करुन प्रकरणांचा निपटारा होण्याच्या दृष्टीने जाणीवपूर्वक प्रयत्न करावे, असे निर्देश विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी संबंधित विभागप्रमुखांना आज दिले. लोकशाही दिनात दाखल एकूण १४ प्रकरणांवर चर्चा करुन त्यानुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचनाही त्यांनी संबंधित विभागाला दिल्या. विभागीय आयुक्तालयाच्या सभागृहात आयुक्त गुंडे यांच्या अध्यक्षतेखाली ☞(पान २ वर)

# दिव्यांग उद्योजक भावेश भाटिया यांनी अमरावतीकरांना दिली नवी दृष्टी

## अमरावतीत प्रेरणादायी 'नेत्रदीपक' सोहळा संपन्न



**अमरावती/प्रतिनिधीः-** अंधत्वावर मात करून जिद्द, आत्मविश्वास आणि कर्तृत्वाच्या जोरावर जागतिक स्तरावर यश संपादन करणारे सुप्रसिद्ध उद्योजक भावेश भाटिया यांचे प्रेरणादायी व्याख्यान सोमवार दिनांक ११ मे २०२६ रोजी सायंकाळी संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन, अमरावती येथे उत्साहात पार पडले. ☞(पान २ वर

## नांदगाव बाजार समिती सभापती पदी

# डॉ राजेंद्र पांडे अविरोध



**नांदगाव खंडेश्वर /प्रतिनिधीः-** स्थानिक कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती पदासाठी सोमवार ११ मे रोजी झालेल्या निवडणुकीत डॉ. राजेंद्र नानासाहेब पांडे यांची एकमताने अविरोध निवड करण्यात आली. झालेल्या निवडणुकीत सभापती पदासाठी डॉ राजेंद्र पांडे यांचा एकमेव उमेदवारी अर्ज होता. त्यांचे विरोधात उमेदवारी अर्ज नसल्यामुळे डॉ पांडे सभापती पदासाठी अविरोध विजयी ठरले. बाजार समितीचे सभापती प्रभात ढेपे यांनी १० एप्रिल रोजी सभापती पदाचा राजीनामा दिला होता. त्यामुळे बाजार समितीचे सभापती पद ☞(पान २ वर)

# राज्य उत्पादन शुल्क विभागाचा कारभार रामभरोसे

## उंटावरून शेळया हाकलण्याचा प्रकार, -दर्यापूरातील कार्यालय इमारती अभावी अचलपूरला



**खल्लार/प्रतिनिधीः-** अवैध दारू विक्री, हातभट्टी आणि विविध प्रकारचे अवैध व्यवसाय रोखण्याची जबाबदारी असलेल्या राज्य उत्पादन शुल्क विभागाचाच कारभार सध्या प्रश्नचिन्हाखाली आला आहे. दर्यापूर शहरात राज्य उत्पादन शुल्क कार्यालयाला स्वतंत्र कार्यालयीन इमारत नसल्याने विभागाचा कारभार अक्षरशः 'रामभरोसे' सुरू असल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगू लागली आहे.

दर्यापूर येथे कायमस्वरूपी कार्यालयाची सुविधा उपलब्ध नसल्यामुळे प्रशासकीय कामकाज अचलपूर येथून पाहिले जात आहे. यामुळे स्थानिक पातळीवरील कारवाई, तक्रारींवर तत्काळ प्रतिसाद आणि अवैध धंद्यांवरील नियंत्रण यावर परिणाम होत आहे.

विशेष म्हणजे दर्यापूर तालुक्यात अनेक ठिकाणी अवैध दारू विक्री व हातभट्ट्यांबाबत वेळोवेळी तक्रारी होत असतानाही उत्पादन शुल्क विभागाची सक्रियता अपेक्षेप्रमाणे दिसून येत नसल्याची भावना व्यक्त होत आहे. 'उंटावरून शेळ्या हाकलण्याचा प्रकार' अशी उपहासात्मक प्रतिक्रिया काही नागरिकांनी व्यक्त केली आहे.

दर्यापूरसारख्या मोठ्या तालुक्यात स्वतंत्र कार्यालय नसणे ही गंभीर बाब असून, त्यामुळे विभागाच्या कार्यक्षमतेवर परिणाम होत आहे. प्रशासनाने तातडीने स्वतंत्र कार्यालयीन इमारतीची व्यवस्था करून अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियमित उपस्थिती सुनिश्चित करावी, अशी मागणी पुढे येत आहे.

दरम्यान, उत्पादन शुल्क विभागाकडून याबाबत अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नसून, भविष्यात ☞(पान २ वर)

# खरेदी विक्री संस्थेच्या कारभारावर शेतकऱ्यांनी उपस्थित केले प्रश्नचिन्ह

## संतप्त शेतकऱ्यांची तहसील कार्यालयावर धडक

**-हरभरा-तूर खरेदी व पिकविम्यासाठी आक्रमक**

**-व्यवस्थापकावर कारवाईची मागणी**



**तिवसा/प्रतिनिधीः-** गेल्या एक वर्षांपासून खरेदी विक्री संस्थेकडून होत असलेल्या कारभारामुळे व त्रासामुळे वैतागलेल्या शेतकऱ्यांनी आज तिवसा तहसील कार्यालयात तहसीलदारासमोर संस्थेच्या व्यवस्थापकाला चांगलेच धारेवर धरले.येथील व्यवस्थापकाविरुद्ध शेतकऱ्यांचा चांगलाच रोष उफाळून आला होता.ज्वारी खरेदी प्रक्रियेची तसेच अन्य कारभाराची चौकशी करण्याची मागणी तहसीलदार यांचेकडे शेतकऱ्यांनी रेटून धरली.

एकीकडे निसर्गाची अवकृपा आणि दुसरीकडे प्रशासनाची अनास्था अशा दुहेरी संकटात सापडलेल्या तिवसा तालुक्यातील शेतकऱ्यांचा संयम ☞(पान २ वर)

# महसूल सहाय्यक लाच घेताना रंगेहात अटकेत

## अमरावती एसीबीची कारवाई



**अमरावती/प्रतिनिधीः-** तिवसा तहसील कार्यालयातील एका महसुल सहाय्यकाला १ हजार ५०० रुपयांची लाच स्वीकारताना अमरावती लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) सोमवारी रंगेहात अटक केली. प्रलंबित प्रकरण लवकर निकाली काढण्यासाठी आरोपीने ही लाच मागितल्याचे समोर आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदाराविरुद्ध तिवसा तहसील कार्यालयात प्रतिबंधक कारवाईचे प्रकरण सुरू होते. या प्रकरणात वारंवार पुढील तारीख न देता केस लवकर संपवून निकाली काढण्यासाठी महसूल सहाय्यक राहुल शंकरराव निस्वादे (वय ४३, रा. विश्वशांती नगर, शेगाव रोड, अमरावती) याने सुरुवातीला २ हजार ☞(पान २ वर)

# नगरसेविका बीबी बतूल शाह यांना अपात्र घोषित करा



**नामांकनात लपवले तिसरे अपत्य**

**-निवडणूक आयोगाला दिली खोटी माहिती**

**-सामाजिक कार्यकर्ता एजाज अहमद यांचा आरोप**

**अमरावती/प्रतिनिधीः-** जानेवारी महिन्यात झालेल्या महानगरपालिका निवडणुकीमध्ये प्रभाग क्रमांक १६ अलीम नगर - रहमत नगर परिसरातून नगरसेवक म्हणून निवडून आलेल्या एमआयएम च्या बीबी बतूल ताहेर शाह यांना तीन अपत्य असल्यावरही नामांकन पत्रात दोन मुलांचा उल्लेख केला आणि ☞(पान २ वर)

एक कठीण, खडतर, संघर्षपुर्ण परंतु दैदिप्यमान आदर्शमय यशस्वी
जीवन प्रवास आमचे मार्गदर्शक आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त
आदरणीय दादासाहेब लाव्हरे सर
यांना ८८ व्या वाढदिवसानिमित्त
लक्ष-लक्ष हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छूक
प्रा. सुरेशराव रामचंद्रआप्पा मिटकरी अध्यक्ष, वि. प्राथ. व माध्य, शाळा, वाशिम
नंदकिशोर रामचंद्रआप्पा मिटकरी उपाध्यक्ष - वि.प्राथ. व माध्य. शाळा वाशिम
सुमित सुरेशराव मिटकरी संचालक नितेश रमेशराव मिटकरी मुख्याध्यापक
विजय रा. गोटे पर्यवेक्षक

प्रियंका विभुते, कांचन कापसे, प्रतिभा अ. पऱ्हाते, संगीता कि. डहाळे,
कीर्ती व. कुलकर्णी, वृषाली स. नवलकार, भारती भ. तांबेकर, ज्योती अ. शिरसाट, पद्मिनी उ. खराटे,
सुमित्रा व. ठाकरे, धनंजय ह. आंबटवार, मयूर रा. वाडेकर, पवन वि. निमके, महेश रा. लावरवार,
अनिल सं. भिसडे, अमोल व. इंगळे, श्रीकृष्ण मा. गोरे, अर्जुन दि. मुंढे, संतोष पत्रे, श्रीमती शांताबाई गडबडे
तथा समस्त कर्मचारी वृंद विद्याभारती प्राथ. व माध्यमिक शाळा विनायक नगर, वाशिम